नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक २०२ * * नागपूर * शुक्रवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## रील बनवताना ट्रेनला धडकून तरुणाचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, भुवनेश्वर, दि. २३ :

ओडिशाच्या पुरी जिल्ह्यातील जनकदेईपूर रेल्वे स्थानकावर इंस्टाग्राम रील चित्रित करताना एका अल्पवयीन मुलाला ट्रेनने धडक दिली. त्याचा जागीच मृत्यू झाला. अहवालानुसार, घटनेच्या वेळी, मंगलाघाट येथील रहिवासी असलेला मुलगा दक्षिण काली मंदिराचे दर्शन घेतल्यानंतर त्याच्या आईसोबत परतत होता.

परत येताना, त्याने रेल्वे रुळाजवळ त्याच्या मोबाईल फोनने व्हिडिओ काढण्याचा प्रयत्न केला. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, तो रुळाजवळ उभा असताना एका वेगाने येणाऱ्या ट्रेनने त्याला धडक दिली. अपघाताची माहिती मिळताच रेल्वे कर्मचारी आणि स्थानिक रहिवासी तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी मृतदेह ताब्यात घेतला.

अग्रग्रलेख

खरीखरी...

## बिहारची मतसर्कस

बिहारमध्ये आज इंडिया आघाडी किंवा इंडिया गठबंधने जे काही शब्द बाण फेकले. त्यामुळे आता इंडिया आघाडीत प्रचंड मतभेद आहेत, ते आपापसात सतत भांडतात यामुळे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि त्यांचे हितचिंतक अत्यंत आनंदात होते. त्यांच्यासाठी आजची ही घटना विचार करायला लावणारी आहे. बिहारचे सध्याचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे नाव एनडीए कडून मुख्यमंत्री पदासाठी घोषित करावे असे नितीश कुमार यांचे हितचिंतक म्हणा किंवा चेलेचपाटे म्हणा जोरजोराने ओरडून आपला मुद्दा मांडत होते. अमित शहा यांनी आणि त्या पक्षाच्या प्रवक्त्यांनी निवडणूक झाल्यावर निवडून आलेले आमदार आपला नेता ठरवतील असे घोषित केले होते. नितीशकुमार एनडीए मध्ये असले तरी त्यांची यंत्रणा आणि त्यांचे मतदार त्यांच्या मागे पक्के उभे आहेत. दलित आणि अतिदलित यांचे जवळजवळ 18 टक्के मतदार हे नितीश कुमार यांचे अंधभक्त आहेत. बाकीच्या जनतेत नितीश कुमार सुशासनबाबू म्हणून प्रख्यात आहेत. त्यामुळे नितीश कुमार आता संपले, नितीशजी संपले अशा वावड्या उठवून त्यांच्याच पक्षाच्या काही पुढाऱ्यांनी जे वातावरण तयार केले होते ते आता त्यांच्या चांगलेच अंगलट आलेले आहे. एक गोष्ट निश्चित आहे ती म्हणजे बिहारमध्ये भारतीय जनता पक्ष म्हणा किंवा कॉंग्रेस म्हणा या दोन्ही पक्षांची शक्ती जेमतेम आहे. नितीश कुमार आणि लालूप्रसाद यादव हे खूप जुने मित्र आहेत त्याप्रमाणेच लालूप्रसाद आणि राबडी देवी यांचे वारस तेजस्वी किंवा नितीश कुमार या दोन पक्षांशिवाय तिसऱ्या पक्षाचा मुख्यमंत्री होणार नाही याची पक्की खुणगाठ लालूजी आणि नितीशजींनी बांधून घेतलेली आहे. आज सकाळी कॉंग्रेसचे नेते अशोक गेहलोत यांनी पत्रकार परिषदेत सर्व सहकारी पक्षांच्या पुढा?यांना सोबत घेऊन लालू पुत्राला बिहारचे मुख्यमंत्री म्हणून नामित केले. अजय सहानी यांच्याकडे सुद्धा मतांचा मोठा टक्का आहे. ते उपमुख्यमंत्री बनतील परंतु कॉंग्रेसबाबत कॉंग्रेसच्याच या नेत्यांने एकही शब्द उच्चारला नाही. याचाच अर्थ कॉंग्रेसला राज्याराज्यात जे जे त्यांचे सहकारी पक्ष आहेत. त्यांना मुक्तहस्ते मदत करावयाची आहे, हा संदेश यातून दिसून आला. राहुल गांधी यांनी बिहारमध्ये पदयात्रा काढून प्रचार केला, वोट चोर गद्दी छोड वगैरे वगैरे सारख्या घोषणाही देऊन झाल्या परंतु कॉंग्रेस पक्ष बिहारमध्ये अत्यंत कमजोर आहे. त्यांचे संघटन नाही, उमेदवार नाहीत मग एकटे राहुल आणि प्रियंका यांच्या भाषणाने निवडणुका जिंकता येत नाहीत हे कॉंग्रेस पक्षालाही चांगलेच ठाऊक आहे.

▶▶ पान ८ वर

## महाआघाडीचा सीएमपदाचा चेहरा तेजस्वी

■ वृत्तसंस्था, पाटणा, दि. २३ :

बिहार निवडणुकीसाठी महाआघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा राजद प्रमुख तेजस्वी यादव असतील. कॉंग्रेस नेते अशोक गेहलोत यांनी महाआघाडीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत याची घोषणा केली. त्यांनी सांगितले की जर सरकार स्थापन झाले तर मुकेश साहनी उपमुख्यमंत्री असतील. इतर उपमुख्यमंत्री देखील मागासवर्गीय समाजातील असतील.

गेहलोत म्हणाले की तेजस्वी यादव आमचे नेते आहेत. एनडीएने त्यांचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण असेल हे जाहीर करावे. आम्ही नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवू असे म्हणणे पुरेसे नाही.



या घोषणेनंतर तेजस्वी यादव म्हणाले, "तुम्ही माझ्यावर विश्वास दाखवला आहे. मी सर्वांचे मनापासून आभार मानतो. मी सर्वांना सांगू इच्छितो की त्यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाचे मी पालन करेन. मी २० वर्षांचे अकार्यक्षम सरकार उलथवून टाकेन."

महाआघाडीची संयुक्त पत्रकार परिषद ५० मिनिटे चालली. राजद, कॉंग्रेस आणि व्हीआयपीसह सात पक्षांचे १४ नेते उपस्थित होते. सर्व पक्षांच्या नेत्यांना बोलण्याची संधी देण्यात आली. सर्व महा आघाडीतील एकतेबद्दल बोलले.

महाआघाडी २८ ऑक्टोबर रोजी आपला जाहीरनामा प्रसिद्ध करणार आहे. त्यानंतर, राहुल गांधी आणि तेजस्वी यादव बिहारमध्ये संयुक्त रॅली काढणार आहेत. तेजस्वी यादव, अब्दुल बारी सिद्दीकी, मनोज झा आणि संजय यादव यांनी आरजेडीचे प्रतिनिधित्व केले.

## लोकपाल सदस्यांना ७० लाखांची बीएमडब्ल्यू

### अण्णा हजारे यांचा तीव्र आक्षेप

■ महासागर प्रतिनिधी

मुंबई, दि. २३ :

भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी भारतात लोकपाल व्यवस्था लागू करण्यात आली. पण आता लोकपाल अध्यक्ष व त्यांच्या 7 सदस्यांना आलिशान बीएमडब्ल्यू गाड्या घेऊन देण्यात येणार आहेत.



लोकपालसाठी ऐतिहासिकस लढा देणाऱ्या ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आपण भ्रष्टाचार होऊ नये अशी अपेक्षा करतो आणि त्यानंतर भ्रष्टाचार होण्यासाठी कारवाई होत असेल तर ती दुर्दैवी गोष्ट आहे, असे ते म्हणालेत.

लोकपाल अध्यक्ष व सदस्य अशा एकूण 7 जणांसाठी आलिशान BMW 3 Series 330Li मॉडेलच्या कार खरेदी करण्यात येणार आहेत. या सीरिजच्या एका कारची किंमत 70 लाखांच्या घरात आहे. त्यामुळे त्यावर 5 कोटींहून अधिकचा खर्च येण्याची शक्यता आहे.

सरकारने या प्रकरणी एक निविदा जारी केली आहे. पण विरोधकांच्या टीकेमुळे ही निविदा वादात सापडली आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनीही या प्रकरणी नाराजी व्यक्त करत केंद्रातील नरेंद्र मोदी सरकावर टीका केली आहे.













## भाजप संधीसाधू असल्याने....

### दानवेंचा हल्ला



**मुंबई :** रवींद्र धंगेकर यांनी केलेल्या आरोपांची चौकशी झाली पाहिजे. त्याची सत्यता समोर आली पाहिजे. भाजपचे केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर आरोप केले आहेत. सत्तेच्या माध्यमातून संपत्तीसाठी केंद्र आणि राज्यातील सत्तेचा वापर सुरू आहे. धंगेकर हे एक कार्यकर्ता आहेत, ते काही फार मोठे नेते नाहीत. सर्व सामान्य माणूस म्हणून ते आपली भूमिका मांडत आहे, त्यांनी केलेल्या आरोपांची चौकशी केली पाहिजे, असे उबाठाचे नेते अंबादास दानवे यांनी म्हटले आहे.

अंबादास दानवे म्हणाले की, भाजप संधीसाधू आहे मुंबईत ताकद नाही म्हणून अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांना सोबत घेत आहे. ठाणे, पुणे,नाशिक, संभाजीनगर, पिंपरी चिंचवडमध्येही ताकद निर्माण झाली म्हणून त्यांना बाजूला सारायचे काम सुरू आहे. युज ॲंड थ्रो ही भाजपची पद्धत आहे. मुंबईत गरज आहे कारण उद्धव ठाकरेंची शिवसेना मजबूत आहे, जनता त्यांच्यासोबत असल्याने एकत्र यायचे आणि बाकी ठिकाणी दूर व्हायचे ही भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांची दुहेरी निती आहे.

दानवे म्हणाले की, लाडकी बहीण योजना ही व्यावहारिक योजना आहे. बहिणीला 1500 रुपये दिल्याने ती काही लाडकी होत नाही. भाऊ-बहिणीचे नाते जपणारी बहीणच लाडकी बहीण असते. सरकारची योजना ही बोलाची कढी आणि बोलाचा भात आहे. 1500 रुपये दिल्याने बहिणि लाडक्या होत नसतात. शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव नाही. 1500 रुपये देऊन खिशातून 15 हजार रुपये काढतात असे म्हणत दानवे यांनी सरकारवर निशाणा साधला आहे.

## मतांची खरेदी करण्यासाठीचा राजकीय जुगाड : रोहित पवार



**मुंबई :** राज्यात महायुती सरकारकडून फक्त सत्ताधारी आमदारांनाच निधी वाटप केल्याच्या आरोपांवरून विरोधकांचा संताप उसळला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या निर्णयावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांनी सरकारवर लोकशाहीची थट्टा केल्याचा आरोप करत, हा प्रकार म्हणजे मतांची खरेदी करण्यासाठीचा राजकीय जुगाड असल्याचे म्हटले आहे.

रोहित पवार यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमधून सरकारवर थेट निशाणा साधला. ते म्हणाले, सरकारकडे मध्यमवर्गीय मराठी कंत्राटदारांचे तब्बल 80 हजार कोटी रुपये थकित आहेत. त्यांना देण्यासाठी पैसे नाहीत, पण सत्ताधारी पक्षाच्या 54 आमदारांना प्रत्येकी 5 कोटी रुपये देण्यासाठी मात्र पैसा उपलब्ध आहे.

विकासनिधीच्या नावाखाली शासकीय तिजोरीतील पैसा वापरून स्थानिक निवडणुकांमध्ये मतांची खरेदी करणे हे लोकशाहीचा अपमान आहे. शेवटी जात, धर्म असा भेदभाव करून आणि खोक्यातून जन्म घेतलेल्यांकडून समान न्यायाची आणि लोकशाहीचा सन्मान करण्याची अपेक्षा करणं म्हणजे गुंडाकडून सद्वर्तनाचं प्रवचन ऐकण्यासारखं आहे, असा टोलाही रोहित पवार यांनी सरकारला लगावला.

## भुजबळ, करुणा मुंडेंना महाजनांचा टोला



**छत्रपती संभाजीनगर :** आमदार धनंजय मुंडे हे गोपीनाथ मुंडेंचे राजकीय वारसदार असल्याचे वक्तव्य राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी बीडमध्ये झालेल्या ओबीसी एल्गार महासभेत केले होते. त्यांच्या या विधानावर आता प्रकाश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली. आम्ही समीर भुजबळ यांना वारसदार म्हटले तर चालेल का? असा टोला प्रकाश महाजन यांनी छगन भुजबळांना लगावला. तसेच पंकजा मुंडे याच गोपीनाथ मुंडेंच्या खऱ्या वारसदार आहेत असे त्यांनी म्हटले.

छगन भुजबळ यांनी गोपिनाथ मुंडेंच्या वारसाबाबत विधान केल्यानंतर, धनंजय मुंडे यांच्यावर टीका करणाऱ्या करुणा मुंडे शर्मा यांनी दीपावली पाडव्याच्या निमित्ताने त्यांच्यावर स्तुतिसुमने उधळली. छगन भुजबळ 100 टक्के बोललेत. राजकारणात पोटचा नव्हे तर विचारांचा वारसा असतो. आज ते धनंजय मुंडे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. गोपीनाथ मुंडेंचे खरे वारसदार धनंजय मुंडेच असल्याचे करुणा मुंडेंच्या विधानानंतर आता प्रकाश महाजन यांनी फेसबुकवर पोस्ट करत, पंकजा मुंडे याच गोपीनाथ मुंडेंच्या खऱ्या वारसदार आहेत, असे म्हटले आहे.

# राज व उद्धव ठाकरेंची भाऊबीजही एकत्र

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २३ :**

आज देशभरात भाऊबीज उत्साहात साजरी झाली. हा सण भावाबहिणीच्या प्रेम आणि जिव्हाळ्याच्या नात्याचा उत्सव आहे. त्याच पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे यांनी आज शिवतीर्थ येथे बहीण उर्वशी ठाकरेसोबत भाऊबीज साजरी केली. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी त्यांची बहीण जयजयवंती यांच्या घरी भाऊबीज साजरी केली.

उद्धव ठाकरे बुधवारी राज ठाकरे यांचे निवासस्थान शिवतीर्थ येथे गेले होते. उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्या मातोश्री मधुवंती ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त भेट घेत शुभेच्छा दिल्या. अलीकडच्या काही दिवसांत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या भेटी वारंवार होत असल्याने, या संबंधांवर राजकीय वर्तुळात मोठ्या चर्चा सुरू आहेत.



आज पुन्हा एकदा ठाकरे बंधू एकत्र आलेत. आदित्य ठाकरे, तेजस ठाकरे आणि अमित ठाकरे यांना उर्वशी ठाकरे ही एकमेव बहीण आहे. मागील काही महिन्यांपासून ठाकरे कुटुंबीयांची जवळीक वाढल्यामुळे यंदाची भाऊबीज ही शिवतीर्थावर साजरी झाली.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे जयजयवंती ठाकरे-देशपांडे यांच्या घरी दुपारी दाखल झाले. तिथे दोन्ही ठाकरे बंधू बहीण जयजयवंती यांच्यासोबत भाऊबीज साजरी केली.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या गेल्या काही महिन्यांत झालेल्या भेटींची संख्या आता आठवर पोहोचली आहे. या भेटी कौटुंबिक स्नेहबंधांमुळे होत असल्या तरी, प्रत्येक भेटीनंतर राज्याच्या राजकारणात मोठी चर्चा रंगते. दोन्ही ठाकरे बंधूंनी अद्याप राजकीय युतीची कोणतीही औपचारिक घोषणा केलेली नसली, तरी त्यांच्या सलग भेटींमुळे दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते आणि मतदारांमध्ये 'ठाकरे पुन्हा एकत्र येणार का?' या चर्चेने जोर धरला आहे.

भाऊबीजेच्या निमित्ताने ही त्यांची नववी भेट असून, या भेटीतून काही नवे राजकीय संकेत मिळतात का, याकडे महाराष्ट्रासह संपूर्ण देशांचे आणि विशेषत: राजकीय पक्षांचे लक्ष लागून राहिले आहे.

# मनोज जरांगे पुन्हा मैदानात

### मराठा आरक्षणानंतर शेतकऱ्यांच्या न्यायासाठी आंदोलन उभारणार

■ **वृत्तसंस्था, जालना, दि. २३ :** मराठा आरक्षणासाठी राज्यात रान पेटवणारे मनोज जरांगे पाटील आता शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मैदानात उतरले आहेत. अतिवृष्टीमुळे राज्यातील 29 जिल्ह्यांमध्ये झालेल्या मोठ्या नुकसानीनंतरही शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचली नसल्याने, जरांगे पाटलांनी थेट भाऊबीजेच्या मुहूर्तावर शेतकऱ्यांसाठी आंदोलन उभारण्याचा इशारा सरकारला दिला आहे.



अतिवृष्टीमुळे राज्यात अनेक ठिकाणी शेती पाण्याखाली, तर नदीकाठच्या जमिनी वाहून गेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले असून सरकारने जाहीर केलेल्या 3 हजार कोटींच्या मदत पॅकेजचा लाभ अजूनही शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेला नाही. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटलांनी थेट शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा 'नांगर' टाकण्याची घोषणा केली आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले, राज्यात अनेक ठिकाणी अधिकारीच सरकारपेक्षा मोठे झाले आहेत. जे काम करत नाहीत, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले पाहिजेत. दिलेली मदत ही तात्पुरता आनंद आहे, जसा देवेंद्र फडणवीस प्रत्येकाला तात्पुरता आनंद देतात," अशा शब्दांत त्यांनी मदतीच्या पॅकेजवर टीका केली.

ते पुढे म्हणाले की, भाऊबीजेच्या दिवशी नुकसानीच्या याद्या तयार करत आहोत आणि लवकरच बैठक घेऊन राज्यात शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन उभारले जाईल. शेतकऱ्यांसाठी काम करणारे अभ्यासक, तज्ज्ञ आणि नेते यांना एकत्र बोलावून आंदोलनाची दिशा ठरवली जाईल.

**न्याय दिल्याशिवाय शांत बसणार नाही**

सत्ताधारी आमदारांना विकास निधी म्हणून हजारो कोटींची खिरापत वाटली जात असल्याच्या मुद्द्यावर त्यांनी सरकारला धारेवर धरले. "आमदारांकडे हजारो कोटींच्या प्रॉपर्ट्या आहेत, तरी त्यांना ५ कोटी देण्यात येत आहेत. भाऊबीज निमित्त लाडक्या बहिणीला आणि लाडक्या दाजीला न्याय दिल्याशिवाय शांत बसायचे नाही," असे ते म्हणाले. शेतकऱ्यांसाठी हमीभाव, कर्जमुक्ती, कुटुंबातील सदस्यांना नोकऱ्या आणि शेतीला नोकरीचा दर्जा देण्याची मागणी करण्यासाठी हे ऐतिहासिक आंदोलन उभे करणार असल्याचे जरांगे यांनी सांगितले.

**भुजबळ संधी साधू, धनंजय मुंडेंवरही टीका**

मनोज जरांगे यांनी या दरम्यान अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले. "हा संधी साधू आहे. त्या विचारात वाढलेला वंश आहे ना त्यांच्याकडे, त्रास देणारा कसा होऊ शकतो वारस चालवणारा? त्यांचे हात रक्ताने भरलेले आहेत. त्यांनी हयातीत गोपीनाथ मुंडे यांना खूप त्रास दिला आहे. जो खरा वारस आहे तो हे विसरतो तरी कसा काय? असा सवाल जरांगे यांनी केला.

जातीचा म्हणून किंवा तुमच्या घरातलं घर आहे म्हणून विसरताय त्रास दिलेला इतका, ही कुठली परंपरा आहे, असेही जरांगे म्हणाले.

**ओबीसी आरक्षणावरून सरकारला इशारा**

आरक्षण आणि जीआरच्या मुद्द्यावरून जरांगे पाटलांनी फडणवीस आणि सरकारला पुन्हा एकदा इशारा दिला.

"ओबीसींना म्हणायचे तुमच्या आरक्षणाला हात लागला नाही आणि इकडे आम्हाला जीआर द्यायचा, पण प्रमाणपत्र द्यायचे नाहीत. जर आमचा जीआर संविधानापेक्षा मोठा नाही, तर तुमचा सुद्धा जीआर संविधानापेक्षा मोठा नाही हे लक्षात घ्या," असा स्पष्ट इशारा देत, मराठा आरक्षणाच्या जीआरला धक्का लागल्यास आंदोलन कोणत्याही दिशेला जाऊ शकते, असे त्यांनी ठणकावून सांगितले.


# जोगेश्वरीत उंच इमारतीला भीषण आग

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :** मुंबईतील जोगेश्वरीमध्ये एका उंच इमारतीला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. जोगेश्वरी पश्चिममधील जेएनएस बिझनेस पार्क या व्यावसायिक इमारतीला लागलेल्या आगीत चार मजले विळख्यात सापडले.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र, उंच इमारतीला भीषण आग लागल्याने परिसरात मोठी घबराट पसरली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, जोगेश्वरी पश्चिमेकडील बेहराम बाग येथील गांधी शाळेजवळील एस.व्ही. रोडवरील जेएनएस बिझनेस पार्कमध्ये ही आग लागली होती. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाला सकाळी १० वाजून ५१ मिनिटांनी मिळाली. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. ही आग इतकी भीषण होती की इमारतीचे ४ मजले तिच्या विळख्यात सापडले होते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अग्निशमन दलाने या घटनेला लेव्हल-२ ची आग म्हणून घोषित केले.

आग लागल्यानंतर इमारतीच्या वरच्या मजल्यांवर काही लोक अडकले होते.




त्यांनी मदतीसाठी हाका मारल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने धाव घेत एका बाजूला आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू केले, तर दुस?्या बाजूला इमारतीत अडकलेल्यांना सुरक्षितपणे बाहेर काढले. अथक प्रयत्नांनंतर ही आग पूर्णपणे आटोक्यात आणण्यात आली. या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मोठी दुखापत झालेली नाही. दरम्यान, ही इमारत व्यावसायिक असून, आत अनेक कार्यालये आहेत.

इमारतीला लागलेल्या आगीचे कारण अद्याप निश्चित झालेले नाही; मात्र शॉर्ट सर्किटची शक्यता नाकारता येत नाही. आगीमुळे धुराचे लोट पसरल्याने परिसरात काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते.

# अँटॉप हिलमध्ये कौटुंबिक वादातून पत्नीची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :** मुंबईतील अँटॉप हिल परिसरातील प्रतीक्षानगर येथे कौटुंबिक वादातून एका पतीने आपल्या पत्नीची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पतीच्या बेदम मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या 27 वर्षीय चंदादेवी यादव यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण अँटॉप हिल परिसर हादरला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चंदादेवी यादव आणि तिचा पती रामसिंगार यादव हे प्रतीक्षानगरमध्ये राहत होते. विवाहानंतर या दोघांमध्ये किरकोळ कारणांवरून सातत्याने वाद होत असत. रविवारी देखील त्यांच्यात शाब्दिक वाद झाला. मात्र, यावेळी राग अनावर झालेल्या रामसिंगार याने पत्नी चंदादेवी हिला बेदम मारहाण केली. या मारहाणीमध्ये चंदादेवी गंभीर जखमी झाल्या. कुटुंबीयांनी तिला तातडीने सायन रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. परंतु, उपचारादरम्यान डॉक्टरांनी चंदादेवीला मृत घोषित केले. पतीने केलेल्या मारहाणीतच चंदादेवीचा मृत्यू झाल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

घटनेची माहिती मिळताच वडाळा टीटी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा केला. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे.

# सिद्धार्थ जाधवचा धडकी भरवणारा लूक

### महेश मांजरेकर यांच्या 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या बहुप्रतिक्षित चित्रपटाचे पोस्टर लॉन्च

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :** चित्रपट अभिनेते तथा दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या नव्या चित्रपटाची सिनेरसिकांना मोठी प्रतिक्षा आहे. या चित्रपटाचे एक पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले. त्यात अभिनेता सिद्धार्झ जाधव याचा लूक अक्षरशः धडकी भरवणारा आहे.

सिद्धार्थ जाधवच्या वाढदिवसानिमित्त पुन्हा शिवाजीराजे भोसले या चित्रपटाचे पोस्टर लॉन्च करून त्यातील सिद्धार्थचा लूक समोर आणण्यात आला. या लूकमध्ये सिद्धार्थ जाधव हा आपल्या नेहमीच्या लूकपेक्षा फार वेगळा दिसून येत आहे.

चेहऱ्यावर रक्त, जखमांचे व्रण, उरात धडकी भरवणारी नजर आणि नजरेत दडलेले क्रौर्य आदी गोष्टी सिद्धार्थच्या या नव्या लूकमध्ये दिसून येत आहेत. त्याच्या या लूकमुळे त्याची या चित्रपटात नेमकी कोणती भूमिका असेल? याविषयी सिनेरसिकांच्या मनात उत्कंठा निर्माण झाली आहे.



सिद्धार्थ जाधव आपल्या या चित्रपटातील भूमिकेविषयी सांगतो, पुन्हा शिवाजीराजे भोसले या चित्रपटातील माझी भूमिका माझ्या आजवरच्या कारकिर्दीमधील सर्वात वेगळी आहे. या पात्रात एक वेगळीच क्रूरता आहे. ती त्याच्या लूकमध्ये उतरणे गरजेचे होते. माझ्या लूकचे संपूर्ण श्रेय महेश मांजरेकरांचे आहे. त्यांनी मला माझा एक फोटो पाठवायला सांगितला. त्यानंतर त्यांनी त्यावर काम करून माझा हा लूक तयार केला. जेव्हा हा लूक माझ्याकडे आला, तेव्हा मी स्वतःच थक्क झालो. मी असाही दिसू शकतो? असा प्रश्न मला पडला. अशा प्रकारची भूमिका मी यापूर्वी कधीच साकारली नव्हती.

पण माझा महेश मांजरेकरांवर पूर्ण विश्वास असल्यामुळे मी सुद्धा या भूमिकेला योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला. सध्या मी या भूमिकेविषयी फार काही बोलू शकत नाही. पण प्रेक्षकांना माझे हे नवे रूप नक्कीच आवडेल अशी मला खात्री आहे. पुन्हा शिवाजीराजे भोसले हा चित्रपट झी स्टुडिओच्या माध्यमातून येत्या 31 ऑक्टोबरला प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

# ८० रुपयांत १ नाव डिलीट

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :** कर्नाटकातील आळंद मतदारसंघात प्रति मतदार 80 या दराने मतदार यादीतून मतदारांची नावे वगळण्यात आल्याचा दावा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. या प्रकरणी त्यांनी एसआयटी चौकशी व एका इंग्रजी वृत्तपत्राने दिलेल्या वृत्ताचा दाखला दिला आहे.


वडेट्टीवारांचा दावा

विजय वडेट्टीवार म्हणाले की, कर्नाटकात मतचोरीचा घोटाळा उघड. कर्नाटक राज्यातील आळंद मतदारसंघात झालेल्या मतचोरी प्रकरणाची धक्कादायक माहिती समोर आली आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधीजींनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत या घोटाळ्याची संपूर्ण पोलखोल केली होती. रवळ च्या तपासानुसार, प्रत्येक मतदाराचे नाव मतदारयादीतून डिलिट करण्यासाठी फक्त ?80 देण्यात येत होते. एका डेटा सेंटरने तब्बल 6018 अर्ज दाखल करून मतदारांची नावं वगळली, आणि त्याबदल्यात 4.8 लाख रुपये मिळवले.

मतदान हा लोकशाहीचा मूलभूत हक्क असताना त्या हक्काची किंमत फक्त 80 रुपये ठरवली गेली, हीच या प्रकरणातील सर्वात भयावह बाब आहे. काँग्रेस पक्षाने या प्रकरणावर सतत प्रश्न उपस्थित केले, पण निवडणुक आयोगाकडून उत्तर मिळत नाही. आज मतदारांचा मतदानाचा हक्क धोक्यात आला, लोकशाहीच धोक्यात आली आहे. त्यामुळे निवडणुक आयोग कधीपर्यंत अशीच जबाबदारी झटकत राहणार हा प्रश्न संपूर्ण देशवासीयांच्या मनात आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

एसआयटी चौकशीनुसार, आलंद विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीतील मतदारांची नावे हटवण्यासाठी अजामागे 80 रुपये डेटा सेंटर ऑपरेटरला देण्यात आले. या प्रकरणी डिसेंबर 2022 ते फेब्रुवारी 2023 या कालावधीत एकूण 6,018 अर्ज करण्यात आले. त्यासाठी सुमारे 4.8 लाख रुपये इतका खर्च करण्यात आला. कलबुर्गी जिल्हा मुख्यालयातील एका डेटा सेंटरमधून हे सर्व अर्ज पाठवण्यात आले.

निवडणूक आयोगाच्या पोर्टलवर अर्ज करण्यासाठी 75 वेगवेगळे मोबाइल क्रमांक वापरण्यात आले होते. हे नंबर पोल्ट्री फार्म कामगारांपासून ते पोलिसांपर्यंत अनेकांचे होते. अजातील मतदारांचे नाव व पत्ता चुकीचा दाखवण्यात आला होता.

बऱ्याच मतदारांना त्यांच्या नावाने अर्ज केल्याचे माहितीही नव्हते. आलंदमधील निवडणूक अधिका?्यांनी केलेल्या पडताळणीत फक्त 24 मतदार हे प्रत्यक्षात मतदार यादीतून हटवण्यायोग्य असल्याचे आढळले. उर्वरित 5,994 अर्ज फसवणूक करणारे होते, असे तपासात निष्पन्न झाले.

यापूर्वी स्थानिक पोलिस व नंतर सीआयडी सायबर गुन्हे विभागाने या प्रकरणाचा तपास केला होता. त्यात मोहम्मद अशफाक नामक स्थानिक व्यक्तीचा सहभाग आढळून आला. 2023 च्या चौकशीनंतर अशफाकने आपल्याकडील इलेक्ट्रॉनिक उपकरणे जमा करण्याचे आश्वासन दिले. पण नंतर तो अचानक दुबईला पळून गेला.

यामुळे एसआयटीने त्याचे इंटरनेट कॉल रेकॉर्ड तपासून, त्याच्या मोहम्मद अक्रम, जुनैद, असलम व नदीम या सहकाऱ्यांचा शोध घेतला. यापैकी मोहम्मद अक्रम व अशफाक हे डेटा सेंटर चालवत होते, तर बाकी डेटा एंट्री ऑपरेटर होते. एसआयटीने या सर्वांचे लॅपटॉप जप्त केले. याच लॅपटॉपद्वारे मतदार हटवण्याचे अर्ज पाठवण्यात आले होते.

याच विषयावर गेल्या अनेक दिवसांपासून विरोधक आवाज बुलंद करीत असून, निवडणूक आयोग अद्यापही उत्तर देण्यास तयार नाही. मतचोरीचे आरोप होत असताना भाजपाकडून सातत्याने उत्तर देत निवडणूक आयोगाची बाजू घेतली जात आहे.

# मंत्री प्रताप सरनाईकांनी घेतली शरद पवारांची भेट

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेचे नेते तथा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली.

सरनाईक यांनी आपण ही भेट दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी घेतल्याची पुस्ती जोडली. पण प्रत्यक्षात सरनाईक यांचा मुलगा विहंग हा मुंबई क्रिकेट असोशिएशनच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत असल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे या संघटनेतील शरद पवारांचे असणारे राजकीय वजन पाहता सरनाईकांच्या आजच्या भेटीला महत्त्व आले आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी सकाळी शरद पवार यांची त्यांच्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे सुपुत्र तथा मुंबई प्रीमियर लीगचे अध्यक्ष विहंग सरनाईकही हजर होते. यावेळी उभय नेत्यांत बराच वेळ चर्चा झाली. त्यानंतर तेथून बाहेर पडताना प्रताप सरनाईक यांनी आपण दिवाळीच्या



शुभेच्छा देण्यासाठी शरद पवारांची भेट घेतल्याचे स्पष्ट केले. पण राज्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राजकीय मोर्चेबांधणी सुरू असताना ही भेट झाल्यामुळे वेगवेगळे राजकीय तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, प्रताप सरनाईकांनी घेतलेली शरद पवारांची भेट ही केवळ दिवाळीच्या शुभेच्छा देण्यापुरती मर्यादित नव्हती. या भेटीला मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदाच्या आगामी निवडणुकीची किनार आहे. या निवडणुकीच्या शर्यतीत विहंग सरनाईक यांच्यासह अनेकजण प्रयत्नशील आहेत. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून प्रताप सरनाईक यांनी आपल्या सुपुत्रासह शरद पवारांची भेट घेतली. कारण, शरद पवार यांचे मुंबई क्रिकेट असोसिएशनवर मोठी पकड आहे.

या संघटनेतील अनेक मोठ्या नियुक्त्यांत त्यांचा शब्द अंतिम मानला जातो. त्यामुळे प्रताप सरनाईक यांनी विहंग यांच्यासमवेत घेतलेली पवारांची भेट या अनुषंगाने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे जागतिक क्रिकेटमध्ये अनेक दिग्गज खेळाडूंचे योगदान देणाऱ्या मुंबई क्रिकेट असोसिएशनवर आतापर्यंत अनेक राजकारण्यांचे वर्चस्व राहिले आहे. शरद पवार यांच्यासह दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनीही या संघटनेचे अध्यक्षपद भूषवले आहे. भाजप नेते तथा राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनीही या संघटनेचे अध्यक्षपद भूषवले आहे.

# सुरक्षा कठडे तोडून भरधाव कार पुलाखाली कोसळली

अपघातात पाच जखमी



■ महासागर प्रतिनिधी
मोताळा , दि. २३ :

मलकापूर कडून मोताळ्याकडे येत असलेली भरधाव कार पुलावरील सुरक्षा कठडे तोडून विरुद्ध दिशेने पुलाखाली कोसळल्याची घटना सकाळी नऊ वाजेच्या सुमारास मोताळा ते मलकापूर मार्गावर न्यायालयाजवळील वळणावरील पुलावर घडली या अपघातात पाच जण जखमी झाले आहे.

गुजरात मध्ये राहत असलेले एक कुटुंब दिवाळी साजरी करण्यासाठी कारने चिखली येथील नातेवाईकांकडे जात होते सकाळी नऊ वाजेच्या सुमारास मोताळा ते मलकापूर मार्गावरील न्यायालयाजवळील पुलाजवळ त्यांची भरधाव कार अनियंत्रित होऊन पुलावरील सुरक्षा कठडे तोडून विरुद्ध दिशेने पुलाखाली कोसळली.

या घटनेत कार मधील पाच जणांपैकी चार जणांना जबर मार लागला असून एका युवतीला किरकोळ मार लागल्याची माहिती मिळत आहे त्यामध्ये रमाबाई शाम वानखेडे (वय ४५) वर्ष यांचा एक पाय फ्रॅक्चर झाला, निखिल शाम वानखेडे (वय १६) वर्ष याचा एक पाय फ्रॅक्चर झाला असून संदिप शिरसाट वय २६ वर्ष याचा सुद्धा एका पायाला गंभीर दुखापत झाली तसेच नेहा शाम वानखेडे (वय १७) वर्ष या युवतीस किरकोळ मार लागलेला असून राहुल पाटील (वय २३) वर्ष या युवकाच्या मानेला जबर मार लागला आहे.

घटनेची माहिती मिळताच बोराखेडी पोलीस आणी आसपासच्या नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत अपघातातील जखमींना १०८ रुग्णवाहिकेचे चालक अंकुश वाघ आणि डॉ. मुसीफ अहेमद यांच्या मदतीने रुग्णवाहिकेतुन उपचारासाठी बुलडाणा येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

# 'बौद्धिक श्रीमंती वाढवण्याकरीता युवकांनी पुस्तकांशी मैत्री करावी'



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. २३ :

माणसाने आपली आर्थिक श्रीमंती वाढवली, तर जगातील सर्व भौतिक सुखे त्याच्या दाराशी हात जोडून उभे राहतील, मात्र बौद्धिक श्रीमंती वाढवण्यासाठी त्यांना विविध बौद्धिक भांडार असलेल्या पुस्तकांशीच मैत्री करावी लागेल. त्यामुळेच आजच्या डिजिटल युगातही पुस्तकांचे महत्त्व आकाशातील ध्रुव बाळा सारखे अढळ आहे, असे प्रतिपादन नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंडचे जिल्हाध्यक्ष प्रदीप खाडे यांनी केले. ते लेखक व कवी प्रा. डॉ. दिलीप इंगोले यांनी लेखन केलेल्या 'जिनेन्द्र अर्चना' नामक पुस्तक प्रकाशन सोहळ्यात बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून रा.ल. तो. विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य राजकुमार चवरे उपस्थित होते. प्रारंभी भगवान महावीर व आचार्य जिनेंद्र महाराज यांच्या प्रतिमांचे अतिथींच्या हस्ते पूजन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रामुख्याने राजकुमार उखळकर, ॲड. रितेश जैन, अक्षत जैन, वैशाली जैन, छायाताई इंगोले, शोभा इंगोले यांनी प्रथम मंगलाचरण सादर केले. प्रास्ताविक लेखक डॉ. दिलीप इंगोले यांनी केले. कार्यक्रमाला नेमीचंद इंदाने, पुष्पा इंदाने, ऋचा इंगोले, निर्मल भोंगाडे, पंडित अशोकराव कानडे, संगीता कानडे, यांच्यासह इतरही गणमान्य नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. दिलीप इंगोले यांनी व आभार विशाल इंगोले यांनी मानले.

# पाडवा पहाटमध्ये भारतीय संस्कृतीचा जागर



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २३ :

तापडीया नगरातील भारत विद्यालयात दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पाडवा पहाटमध्ये भारतीय संस्कृतीचा जागर करीत कलावंत व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यांना सादर केलेल्या कलामध्ये सर्वजण मंत्रमुग्ध झाले. सध्या शाळांना दिवाळीच्या सुट्या आहेत. सुट्यांमध्येही भारतीय संस्कृतीचा जागर करण्यात येत आहे. यातून विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळत असून, त्यांचा आत्मविश्वासतही वाढत आहे. दिवाळी पहाट पाहवी हा एक पारंपारिक भारतीय सांस्कृतिक कार्यक्रम आहे. ज्याचे विशेष महत्व आहे. दिवाळीच्या पवित्र सणाच्या दिवशीच्या होणारा हा सण होय. यामध्ये संगीत, भावना आणि एकत्रित आनंदाचा मिलाफ आहे. याच अनुषंगाने भारत विद्यालय पाडव्याचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. भारत वि?द्यालयाचे शाळेचे मुख्याध्यापक संजय घोगरे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. व्यवस्थापन शाळेचे उपमुख्याध्यापक योगेश मल्लेकर यांनी केले.

यावेळी गाण्याची सुरेल रंगत येथे पाहण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा आभार प्रदर्शन अनिरुद्ध शिरसाळकर यांनी केले. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष अनिल पिंपरखेडे , ज्येष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र पाठक, संस्थेचे सचिव रवींद्र अभ्यंकर, निशिकांची पुजारी अनिरुध्द खरे, मुख्याध्यापक संजय घोगरे, पर्यवेक्षिका देवयानी खेडकर, शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी हे उपस्थित होते. कार्यक्रमात योगेश मल्लेकर, निलेश ठाकरे, कनिष्ठ महाविद्यालयातील विनोद सोनोने, विनय जकाते तसेच शालेय विद्यार्थी हिमांशु देशमुख यांनी गाण्यांचा आस्वाद करून दिला.

उत्साला उधाण दिवाळीची सुरुवात ही पाडव्याच्या कार्यक्रमाने होती. भारतीय संस्कृतीमध्ये हिंदू संस्कृतीमध्ये दिवाळी हा सण सर्वात मोठा मानण्यात येतो. यामध्ये गरिबापासून श्रीमंतापर्यंत सर्वजण उत्साही असतात. या उद्देशाने भारत विद्यालयात पाडवा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात उत्साह द्विगुणीत झाल्याचे दिसून आले.

## तरुण शेतकऱ्याची आत्महत्या



**मोर्शी:** सततच्या नापिकी व कर्जबाजारीपणामुळे निंभी येथे एका तरुण शेतकऱ्याने ऐन दिवाळीच्या दिवशी आत्महत्या केली. राहुल यशवंत छापाने असे या शेतकऱ्याचे नाव आहे. ऐन दिवाळीच्या दिवशी विषारी औषध प्राशन करून त्यांनी आत्महत्या केल्याने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. एकीकडे गावातील नागरिक व घरातील कुटुंब दीपावलीचा सण साजरा करण्यात मग्न असताना राहुल छापाने यांनी राहत्या घरी मंगळवारी दुपारी ३ वाजता विषारी औषध प्राशन केले. ही बाब कुटुंबीयांच्या लक्षात येताच त्यांनी तातडीने त्यांना मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. दरम्यान प्रकृती गंभीर असल्यामुळे पुढील उपचारासाठी त्यांना अमरावतीच्या जिल्हा सामान्य रुणालयात आले.

# सात वर्षांनंतर मोताळ्यात जिल्हास्तरीय धम्म महोत्सव





■ महासागर प्रतिनिधी
मोताळा , दि. २३ :

भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने येथील मलकापूर मार्गावरील बुलडाणा अर्बन बँकेजवळ जिल्हास्तरीय धम्म महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

सात वर्षानंतर प्रशांत वाघोदे यांच्या संकल्पनेतून भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने जिल्हास्तरीय धम्म महोत्सव मोताळ्यात पार पडले. रॅलीतील पाचशे फूट लांबीचा पंचशील ध्वज हे सर्वांचे आकर्षण ठरले त्यानंतर सभेच्या ठिकाणी रॅली पोहोचल्यावर धम्म महोत्सव कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख मार्गदर्शक भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्यासह मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. सुरुवातीला धम्म चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन यु. जी. बोराळे यांच्या हस्ते पार पडले. त्यानंतर भन्ते विनाचार्य, भन्ते संघपाल यांची धम्मदेसना झाली शेवटी मेघानंद जाधव यांच्या भीम गीतांनी कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाला भीमराव तायडे, के. के. शेगोकार, साहेबराव तायडे, भीमराव जाधव, आतिश खराटे, विशाखा सावंग, छायाताई बांगर, इंगळे, डॉक्टर अनिल वानखेडे, दिलीप मेढे, धम्मपाल वाघ, पी. आर. इंगळे, प्रकाश दांडगे, नितीन सूर्यवंशी, के बी इंगळे, संघपाल पनाड, समाधान डोंगरे, बी. एन. सुरवाडे, संघपाल अहिरे, निवृत्ती वानखेडे, डी. एस. वले, डी. एन. सुरवाडे, गोकर्ण तेलंग, संजय गुरचवडे, आर.सी. भटकर, नवनीत शिरसाठ उपस्थित होते. या धम्म महोत्सवात धम्माच्या खऱ्या तत्त्वांची जनमानसात ओळख निर्माण करणे, युवकांना करुणा, प्रज्ञा व समतेचा मार्ग दाखवणे, समाजात ऐक्य आणि मैत्रीची भावना दृढ करणे ही या कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे होती. दुपारी चार वाजेच्या सुमारास राजगृह बुद्धविहार येथून सचित्र धम्म महोत्सव रॅली काढून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ही रॅली आठवडी बाजार परिसरातून स्टेट बँक चौकातून मार्गक्रमण करत आंबेडकर चौकात पोहोचली.

# फटाक्यांमुळे अडीचपट वाढले प्रदूषण



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १० : हवेच्या गुणवत्ता निर्देशांकावरून (एक्यूआय) एखाद्या शहराचे वायू प्रदूषण किती आहे, हे ठरवले जाते. अमरावती शहराचा एक्यूआय सरासरी १२५ असतो. पण दिवाळीच्या दिवशी फोडल्या गेलेल्या फटाक्यांमुळे रात्री आठ ते दहा या वेळात तो तब्बल अडीचपट वाढून ३१४ वर पोहोचला होता. ही बाब (शास्त्रीयदृष्ट्या 'व्हेरी पुअर' या व्याख्येत मोडते. त्यामुळे त्या दोन तासांत आजारी नागरिकांना श्वास (घेण्यासाठी काहीसा त्रास जाणवला असेल, असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे (एमपीसीबी) म्हणणे आहे. या वर्षीच्या दिवाळीला मंगळवारी रात्री शहराच्या अनेक भागात धुराचे लोट उठताना दिसले. हे लोट फटाके फोडल्यामुळे निघालेल्या धुरांचे होते. त्यामुळे रात्रीच्या वेळी वायू प्रदूषणात बऱ्यापैकी वाढ झाली होती. येथील शिवाजी महाविद्यालयाच्या हवामान केंद्राने या वायू प्रदूषणाची नेमकी मोजदाद केली आहे. दरम्यान नागपूर येथील हवामान खात्याचे वैज्ञानिक अधिकारी आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने देखील या आकड्यांना दुजोरा दिला असून, मंगळवारच्या रात्री अमरावतीचे आकाश काही काळासाठी ३०१ ते ४०० च्या दरम्यानच्या 'व्हेरी पुअर' या व्याख्येत पोहोचले होते. शहराचा मुख्य परिसर असलेल्या अंबागेटच्या आतील जुने शहर आणि कॅम्पसह विद्यापीठ रोड, बडाळी, श्रीकृष्ण पेठ, राजकमल चौक, साईनगर, गाडगेनगर आदी भागांमध्ये हीच आकडेवारी कायम होती, असे एमपीसीबीचे म्हणणे आहे. एरव्ही अमरावती शहराचा रोजचा हवा गुणवत्ता निर्देशांक हा १०१ ते २०० या मॉडरेट व्याख्येत मोडणारा असतो. याची मोजदाद सरासरी १२५ ते १३० असते.

# पाडव्याला पशुपालकांतर्फे गुराख्यांचा सन्मान



■ महासागर प्रतिनिधी
अकोट , दि. २३ :

पशुपालकांनी गुराख्यांचा सन्मान करून त्यांना बिदागी, बक्षिसे देण्याची शेकडो वर्षांची परंपरा यावर्षी सुद्धा पाळण्यात आली. या उत्सवाला झेंडवाई उत्सव असे म्हणतात. दरवर्षी लक्ष्मी पूजनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणून पाडव्याला हा झेंडवाई उत्सव साजरा करण्यात येतो. लाकडी काठ्यांपासून एक पालखी बनवली जाते त्यामध्ये गोपालकृष्ण आणि गोमतेचा फोटो ठेवला जातो ही पालखी झेंडूच्या फुलांनी सजवली जाते. पालखीसोबत गुराखी आणि गवळ च्या वेशातील स्थानिक कलाकार असतात ते पशुपालन करणाऱ्याच्या घरी जाऊन तिथे कृष्णाची गाणी म्हणतात, गवळण नृत्य करते. मग पशुपालन करणाऱ्या घरातील गृहिणी पालखीची पूजा करतात व गुराख्यांचा सत्कार करून त्यांना रोख रक्कम तसेच कपड्यांची बिदागी व फराळ देतात. प्राचीन परंपरा: झेंडवाई उत्सवाची परंपरा प्राचीन आहे.

सध्याच्या यंत्र युगात पशुधन पाळणारे कमी होत आहेत. पण तरीही हा उत्सव आम्ही सुरुच ठेवण्याचा प्रयत्न करत आहोत, असे गुराखी संजय पालसपगार यांनी सांगितले.

**कृष्णाची स्तुती करणारी गीते**

**माझा किसन देव सावळा ग**
**करितो जगाचे कल्याण ग**
**तुझ्या घरात राहू दे बरकत ग**
**हेच मागणे देवाच्या पायाशी ग**

अशी स्वरचित साधी व मनाला भिडणारी गाणी गाऊन गवळण नृत्य करते तिला डफफ,घुंगरू आणि बासरीच्या सुरांची साथ असते बाळबोध पण मनाला भिडणारी ही गाणी प्राचीन परंपरा कायम ठेवत आहे. या उत्सवात गवळण म्हणून गोपाल मलीये, गणेश बुंदेले, संजय पळसपगार, ज्ञानेश्वर तायडे, विष्णू नरोडे, नितेश अंभोरे, विक्की तेलगोटे यांनी भाग घेतला.

## रस्त्याच्या मध्यभागी असलेली डीपी हटवा

**वाशीम , दि. २०:** तालुक्यातील अनसिंग येथील जिजामाता शाळेजवळ इंदिरा आवास गल्लीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या मध्यभागी उभारण्यात आलेली वीज वितरण केंद्राची डीपी नागरिकांसाठी मोठा धोका ठरत आहे. या रस्त्यावरून दररोज शाळकरी विद्यार्थी, महिला व वाहनधारकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. आशा गर्दीच्या ठिकाणी रस्त्याच्या मध्यभागी असलेली ही डीपी वाहतुकीस अडथळा निर्माण करत असून अपघाताची शक्यता वाढवत आहे. या गंभीर धोक्याकडे लक्ष वेधत सामाजिक कार्यकर्ता यश चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या सहाय्यक अभियंत्यांना निवेदन देऊन सदर डीपी तातडीने हटवण्याची मागणी केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले की, रस्त्याच्या मध्यभागी उभारलेली डीपी शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी अत्यंत धोकादायक ठरत आहे. स्थानिक नागरिक, महिला वर्ग तसेच दोन आणि चारचाकी वाहनधारकांना दररोज या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

# आरोग्य भारतीतर्फे धन्वंतरी जयंती साजरी



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २३ :

आरोग्य भारती अकोला, दीनदयाल शैक्षणिक व बहुउद्देशीय संस्था, स्वरादिती गायन वर्गातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळी पहाट आणि धन्वंतरी जयंती साजरी करण्यात आली. जुने शहरातील भाऊसाहेब गोडबोले उद्यानात झालेल्या या कार्यक्रमास भल्या पहाटे रसिकांनी उस्फूर्तपणे प्रतिसाद दिला. संगीतमय कार्यक्रमात अकोल्यातील प्रख्यात गायक निखिल देशमुख आणि त्यांचे सुपुत्र हिमांशू देशमुख यांनी श्रोत्यांना आपल्या मधाळ स्वरांनी मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाची सुरुवात धन्वंतरी आणि सरस्वती पूजन करून करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीरराव देशपांडे आणि डॉ. राहुल पुराडउपाध्ये यांनी केले. कार्यक्रमात ज्येष्ठ धन्वंतरी डॉ. सुशील अग्रवाल, डॉ. अशोकराव झाडे, डॉ. दिनेश राठी यांचा प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. विनायक देशमुख यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. उपक्रमास दीनदयाल शैक्षणिक व बहुउद्देशीय संस्था आणि अर्णव एज्युकेशनल अँड वेलफेअर ट्रस्टने सहकार्य केले.

नरेंद्र दहीकर, सूजय दांदळे, संदीप मोरे, दिनेश दहीकर, प्रणव वाडकर, प्रा. नीलेश पाकदूने, पुरुषोत्तम बाबर, ऋग्वेद रानडे, आनंद जागीरदार, प्रविण वाणी, तसेच स्वरादिती गायन वर्गाचे विद्यार्थी या सर्वांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला प्रामुख्याने विलास जोशी, ज्येष्ठ योग शिक्षक डॉ. गजानन कर्हे, रूजुता रानडे, प्रतिभा ठणगण उपस्थित होते.

आभार मदन खुणे यांनी मानले. यांनी दिली साथ-संगत लहानग्या हिमांशूने 'वेढा वेढा रे पंढरी, अबीर गुलाल' या सारखी भक्ति गीते लीलया गाऊन श्रोत्यांना आपल्या तयारीची चुणूक दाखवली. रसिकांनीही त्याच्या गायनाला भरभरून दाद दिली. अनिकेत अंबुसकर (पखवाज), राम देशपांडे (तबला), गजानन रत्नपारखी (संवादिनी), ऋग्वेद रानडे आणि खुणे यांनी साथसंगत केली.

# महिलांनी धर्मांधतेच्या गुलामगिरीचे जोखड फेकून बुध्दीप्रामाण्यवादी व्हावे : समाजभुषण प्रा.श्रीकृष्ण बनसोड

## मातोश्री सावित्रीबाईच्या लेकींचा गौरव व ग्रंथ पुजन करुन दिवाळी साजरी



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २३ :

स्थानिक वऱ्हाड विकास व फू ले - शा हू - आं बे ड क रां च्य अनुयायांच्या वतीने दरवर्षी नुसार लक्ष्मी पूजन ऐवजी ग्रंथ पुजन व मातोश्री सावित्रींच्या लेकींचे औक्षण व गौरव करुन दिपावली उत्सव साजरा करण्यात आला. सामाजिक क्रांतिचे आद्यप्रणेते महात्मा जोतीराव फुले, बहुजन हिताय - बहुजन सुखाय राजे छत्रपती शाहु महाराज, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना आदरांजली अर्पण केल्यानंतर समतेची ज्योत प्रज्वलित करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली.

याप्रसंगी भारताचे संविधान, महात्मा फुले लिखित समग्र वाडब.मय, डॉ. बी.आर. आंबेडकर लिखित समग्र वाडब.मय, मराठीतील आद्य चरित्र ग्रंथ लीळाचरीत्र , ग्रामगीता, सावित्रीबाई फुले रचित बावनकशी सुबोध रत्नाकर आदी ग्रंथांचे पुजन करुन त्यातील बुध्दीप्रामाण्यवादी विचार आचरणात आणण्याचा संदेश देण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा.श्रीकृष्ण बनसोड अध्यक्षस्थानी होते. डॉ. सौ. उज्वला सुरेशराव मेहरे, सौ. सुनंदा बनसोड, पोलीस पाटील सौ. कविता नरेंद्र पाचघरे, म.रा.वखार महामंडळच्या असि. अधिक्षक सौ. किर्ती निलेश म्हसकर, प्रा. डॉ. सौ. अस्मिता सागर बनसोड, सर्वशाखीय माळी समाज ऋणानुबंधचे उपाध्यक्ष इंजि. भरतराव खासबागे, कोषाध्यक्ष ओमप्रकाश अंबाडकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी प्रा. सौ. सुप्रिया आल्हाद मेहरे यांना नुकतीच पी.एच.डी. पदवी मिळाल्याबद्दल त्यांना पुष्पगुच्छ, विद्रोही महात्मा हे विचारपुष्प देवुन सत्कार करण्यात आला तसेच जि.प. शाळा शेकापूर येथील विद्यार्थ्यांना दिपावलीची भेट म्हणून स्वेटर व मिष्ठान्न दिल्याबद्दल डॉ. अस्मिता बनसोड यांचे सामाजिक दातृत्वा बद्दल अभिनंदन करण्यात आले. सेवानिवृत्त शिक्षक श्री. सतिश मेहरे यांना वाढदिवसानिमित्य शुभेच्छा देण्यात आल्या. लक्ष्मीपूजन ऐवजी दिवाळी सणाचे औचित्य साधुन सावित्रीच्या लेकी कु. मृण्मयी बनसोड, स्वरा वानखडे, हर्षिता पुंड, साक्षी गावंडे, कृतिका अनेरकर, कुंजल म्हसकर, संस्कृती गावंडे, जिगीशा मोघे, रचना चांदेकर, खुशी इंगळे, साक्षी चुटके, सृष्टी बनसोड आदींचे औक्षण करुन त्यांना सावित्रीबाई चरित्र ग्रंथ भेट देवुन दिवाळी साजरी करण्यात आली. तसेच विधवा मातांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणातुन समाजभुषण प्रा. श्रीकृष्ण बनसोड म्हणाले, ङ्गमहिलांनी धर्मांधतेच्या गुलामगिरीचे जोखड फेकुन विज्ञाननिष्ठ व्हावे, क्रान्तिज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांना स्वाभिमानाने जगण्याचे बळ दिले. महिलांचे सबलीकरण व सक्षमीकरणासाठी संघर्ष केला. ब्राम्हण विधवा महिलांना आधार दिला. त्यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य सदैव प्रेरणा देणारे आहे. याप्रसंगी सर्वश्री राजेंद्र कांडलकर, अशोक बाठोडकर, सुरेशराव मेहरे, नंदकुमार नाखले, गुणवंत राऊत, धम्मपाल रामटेके, सौ. कल्पना मेहरे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा स्मिता संजय घाटोळ, आल्हाद मेहरे, अशोकराव भोगे, सौ. मालती इंगळे पाटील, एम.बी. मेहरे, सौ. विजया खासबागे, निलेश म्हसकर, नरेंद्र पाचघरे, रामकुमार खैरे, रजनी दिपक आमले, रेखा खैरे, इंजि. आचल मेहरे, कृष्णा मेहरे, श्रीमती कुमुद अपाले सह फुले- शाहू- आंबेडकरांचे अनुयायी बहुसंख्येने उपस्थित होते.

# दुचाकी खरेदीला ग्राहकांची पसंती

## दोन दिवसांतच विक्रीत झाली वाढ



■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. २३ :

यंदाची दिवाळी अतिवृष्टीच्या संकटाने वाईट जाण्याची स्थिती असतानाच कर्ज काढून दुचाकी खरेदी घेण्यास लोकांनी चांगलीच पसंती दर्शवल्याने बुलडाण्यात दोन दिवस दुचाकी विक्रीच्या दुकानात ग्राहकांची मोठी गर्दी दिसून आली. कपड्यांच्या दुकानात रेडीमेड कपडे खरेदीला जेमतेम प्रतिसाद मिळाला असला तरी त्यात उद्या वाढ होण्याची शक्यता आहे. दिवाळीच्या दिवशी फटाके फोडण्यात लोकांनी रुची दाखवली नाही. त्यामुळे फटाक्यांची दुकाने पुढील वर्षी लावावे की नाही, या विवंचनेत फटाके विक्रेते दिसून आले. दीपावलीच्या दिवशी कमीत कमी फटाके मुलांच्या आग्रहास्तव विकत घेतले. त्यामुळे जिल्ह्यातील १५० ते २०० दुकानांमधील फटाक्यांच्या वाती पेटवून उच्चांक विक्रीचा धमाका हा व्यवसाय करु शकला नाही. भविष्यातही जनजागृतीमुळे या व्यवसायाला मोठे स्वरुप प्राप्त होणार नसल्याचे दिवसेंदिवस दिसू लागले आहे. पणती व बोळके हे पूजेत ठेवावे लागत असल्याने त्याचा खप अधिक असला तरी लक्ष्मीच्या मूर्ती खरेदीला प्रतिसाद मिळू शकला नाही. दिवाळीच्या दिवशी सायंकाळी बहुतांश दुकानात मूर्ती मोठ्या प्रमाणात पडून होत्या. रस्त्यावर देवीच्या मूर्तीची विक्री करणारेही हवालदिल झाले होते. मात्र ग्राहकांनी त्याकडे दुर्लक्ष केले. पण, कागदावर असलेल्या देवीचा फोटो खरेदी करण्यास नागरिकांनी प्राधान्य दिले. पूर्वीही अनेकजण कागदावरच्या फोटोचीच पूजा करत होते. मात्र गेल्या काही वर्षांपूर्वी मूर्तीची क्रेझ आली.

तर काहींनी ही क्रेझ चांदीच्या स्वरुपात स्वीकारली. त्यामुळे घरात चांदीच्या मूर्तीची पूजा घरात मांडणी करत आहेत. मूर्ती विक्रीचा व्यवसाय बऱ्यापैकी झाला, असे म्हणता येईल.

झेंडूची फुले वीस रुपये किंमतीत दिवाळीच्या पूर्वसंध्येला विक्री करण्यात आले. त्यामुळे लोकांनी भरभरुन फुलांची खरेदी केली. दहा क्विंटलहून अधिक फुले बुलडाण्यात विकली गेली. फुलांचा सडा अनेकांनी घरासमोर यावेळी टाकलेला बघावयास मिळाला. झेंडूची फुले लक्ष्मीच्या पावलांचे स्वागत करतानाचे चित्र उभारले गेले होते.

त्यामुळे झेंडूना कमी भाव मिळाल्याने शेतकऱ्यांचे मात्र नुकसान झाले होते.

# संयुक्त राष्ट्र दिन : जागतिक शांतता, सामाजिक समता आणि मानवतेसाठीचे प्रतिबिंब

दरवर्षी २४ ऑक्टोबर रोजी जागतिक स्तरावर साजरा होणारा संयुक्त राष्ट्र दिन हा केवळ एका संस्थेच्या स्थापनेचा वर्धापनदिन नाही, तर मानवी जीवनाच्या मूलभूत मूल्यांचा, जागतिक शांततेचा, सामाजिक समतेचा आणि सहअस्तित्वाचा दिन आहे. १९४५ साली स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाने (United Nations Organization – UNO) जगभरातील राष्ट्रांना एकत्र आणून जागतिक संघर्ष कमी करणे, मानवाधिकारांचे रक्षण करणे, सामाजिक व आर्थिक न्याय सुनिश्चित करणे, आणि मानवीकल्याण वाढवणे यासाठी पायाभूत काम केले.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, संयुक्त राष्ट्रसंघ हा केवळ राजकीय संस्था नसून, विविधता असलेल्या जगात सहअस्तित्व, सामाजिक न्याय, समान संधी आणि मानवतेच्या मूल्यांचे पालन सुनिश्चित करणारे एक जागतिक प्रतीक आहे. भौगोलिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक व सामाजिक भिन्नता असूनही, प्रत्येक व्यक्तीस समान अधिकार व संधी उपलब्ध करून देण्याचे हे एक आदर्श उदाहरण मानले जाते.

संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना हे फक्त राजकीय गरजेने नव्हे, तर जागतिक सामाजिक गरजेने देखील झालेले होते. १९४५ पूर्वीच्या काळात दोन महायुद्धांनी संपूर्ण जगाला व्यापले होते, ज्यामुळे मानवी जीवनावर, आर्थिक व्यवस्था, सामाजिक रचना, आणि सांस्कृतिक मूल्यांवर गंभीर परिणाम झाले.

युद्ध, जातीय संघर्ष, धार्मिक द्वेष, वसाहतवाद आणि सामरिक झुंज यामुळे संपूर्ण मानवजातीला असीम हानी पोहोचली. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अशा परिस्थितीत जागतिक संस्था तयार करणे गरजेचे होते जे संघर्षांना शांततापूर्ण मार्गाने सोडवू शकेल, राष्ट्रांमध्ये संवाद आणि सहयोग वाढवेल, आणि मानवतेसाठी सामान्य नियम व मूल्ये स्थापित करेल. याचा अर्थ असा की जागतिक संस्था फक्त आर्थिक किंवा राजकीय दृष्ट्या नव्हे, तर सामाजिक बदल घडवण्यासाठीही महत्त्वपूर्ण ठरतात.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेपासून मानवी हक्कांचे संरक्षण हे त्याचा गाभ्याचे उद्दिष्ट राहिले आहे. मानवाधिकार घोषणापत्र (Unfiversal Declaration of Human Rights – 1948) द्वारे प्रत्येक व्यक्तीस जीवन, स्वातंत्र्य, प्रतिष्ठा, सुरक्षितता, आणि समानतेचा हक्क असल्याचे अधोरेखित केले गेले. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, हे हक्क केवळ कायदेशीर अधिकार नसून, समाजातील दुर्बल घटक, अल्पसंख्यांक समुदाय, महिलांवर, बालकांवर, अपंगांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध सामाजिक जागरूकता निर्माण करण्याचे माध्यम आहेत.

जागतिक स्तरावर हक्कांचे रक्षण करणे म्हणजे समाजातील असमानता कमी करणे, लोकांना न्याय मिळवून देणे, आणि सर्वांसाठी समान संधी निर्माण करणे. याचा परिणाम स्थानिक समाजावरही होतो; उदा. बालकांचे शिक्षण, महिला सक्षमीकरण, अपंगांचा सहभाग, अल्पसंख्यांक समुदायांचे अधिकार यांसारख्या क्षेत्रांमध्ये सुधारणा दिसते.

शांतता स्थापन करणे हे संयुक्त राष्ट्रसंघाचे आणखी एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. इतिहास दर्शवतो की युद्ध आणि संघर्षामुळे फक्त मानवीजीवाचाच नुकसान होत नाही, तर समाजातील कौटुंबिक रचना, सांस्कृतिक मूल्ये, मानसिक आरोग्य, सामाजिक सहभाग, आर्थिक स्थैर्य, आणि सामाजिक न्याय यांवरही दीर्घकालीन परिणाम होतो.



डॉ. राजेंद्र बगाटे
(समाजशास्त्राचे अभ्यासक)
9960103582
bagate.rajendra5@gmail.com

समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून, शांततामय वातावरण हा समाजातील स्थैर्य, सहअस्तित्व आणि समतेसाठी आधारभूत आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांतता स्थापनेच्या कार्यक्रमांमुळे संघर्षांचे समाधान संवाद, मध्यस्थी, शांततापूर्ण उपाय, आणि जागतिक सहकार्याद्वारे साध्य करण्यास प्रोत्साहन मिळाले आहे.

जागतिक समाजात सहअस्तित्वाची भावना निर्माण झाली असून, याचा स्थानिक समाजावरही सकारात्मक परिणाम दिसतो, ज्यामुळे सामाजिक सहकार्य आणि न्याय सुनिश्चित होते.

संयुक्त राष्ट्रसंघाने निर्देशित केलेली शाश्वत विकास उद्दिष्टे (Sustainable Development Goals – SDGs) ही सामाजिक परिवर्तनाची महत्त्वाची साधने आहेत. गरिबी निर्मूलन, सर्वांसाठी शिक्षण, लैंगिक समानता, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, पर्यावरणीय संरक्षण, औद्योगिक व आर्थिक विकास या क्षेत्रांना जागतिक पातळीवर प्राधान्य दिले गेले आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, हे उद्दिष्टे फक्त जागतिक स्तरावर परिणामकारक नाहीत, तर स्थानिक समाजातील असमानता कमी करण्याचे, दुर्बल घटक सशक्त करण्याचे आणि सामाजिक समावेशन वाढवण्याचे प्रभावी माध्यम आहेत. उदा. भारतातील महिला सक्षमीकरण योजना, बालकांचे शिक्षण अभियान, आरोग्य सुविधा वाढविणे, वृद्धांसाठी कार्यक्रम, ग्रामीण विकास योजना या सर्वांवर जागतिक धोरणांचा सकारात्मक परिणाम दिसतो.

संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्य सामाजिक समता आणि आर्थिक समावेशन वाढविण्यावरही केंद्रित आहे. गरीब, अल्पसंख्यांक, अपंग, महिला, वृद्ध आणि बालकांसारख्या समाजातील दुर्बल घटकांसाठी समान संधी निर्माण करणे, जीवनमान सुधारणे, शिक्षण आणि आरोग्याची सुविधा पुरवणे यासाठी जागतिक स्तरावर प्रयत्न केले जातात.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, समाजातील विविध घटकांमध्ये न्याय आणि समानता सुनिश्चित करणे म्हणजे सामाजिक स्थैर्य, विकास आणि लोकशाहीच्या मूल्यांचा प्रत्यक्ष अनुभव घडवणे होय. जागतिक संस्था आणि स्थानिक समाज यांच्यातील सहकार्यामुळे सामाजिक बदल अधिक प्रभावी आणि दीर्घकालीन ठरतो.

संयुक्त राष्ट्रसंघाचे पर्यावरणीय प्रयत्नही अत्यंत महत्त्वाचे आहेत. हवामान बदल, जलसंपदा संरक्षण, जंगल व जीवसृष्टीचे संवर्धन, प्रदूषण कमी करणे, हरित तंत्रज्ञानाचा प्रसार, आणि शाश्वत विकास यांसारख्या कार्यक्रमांमुळे मानव आणि निसर्ग यांच्यात संतुलन राखण्याचा प्रयत्न केला जातो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, पर्यावरणीय टिकाऊपणा म्हणजे समाजातील भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित जीवनमान सुनिश्चित करणे, सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे, आणि स्थानिक तसेच जागतिक स्तरावर पर्यावरणीय धोरणे प्रभावीपणे राबवणे होय. हे सहकार्य मानवतेच्या भल्यासाठी आणि सामाजिक समतेसाठी अपरिहार्य ठरते.

जागतिकीकरणाच्या युगात, संयुक्त राष्ट्रसंघाचे उद्दिष्ट अधिक महत्वाचे झाले आहे. जागतिक आर्थिक असमानता, सामाजिक भेदभाव, मानवी हक्कांचे उल्लंघन, पर्यावरणीय संकट, आपत्ती व्यवस्थापन, आणि सांस्कृतिक संघर्ष यांसारख्या समस्यांवर जागतिक सहकार्याशिवाय प्रभावी उपाय करणे अशक्य आहे. समाजशास्त्र सांगते की जागतिक सहकार्य स्थानिक समाजातही सकारात्मक बदल घडवते. जागतिक उपाययोजनांचा स्थानिक समाजावर परिणाम दिसतो, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, वृद्ध व बालकांचे कल्याण, सामाजिक समावेशन या सर्व क्षेत्रांत सुधारणा होते.

संयुक्त राष्ट्र दिन हा दिवस आपल्याला मानवतेच्या मूलभूत मूल्यांची आठवण करून देतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, हा दिवस फक्त औपचारिक समारंभ नाही, तर जागतिक नागरिक म्हणून आपली सामाजिक जबाबदारी ओळखण्याची आणि जगातील विविध समस्यांवर सहकार्याने उपाय शोधण्याची आठवण आहे. जागतिक शांतता, सामाजिक समता, समानता, मानवाधिकारांचे रक्षण, पर्यावरणीय टिकाऊपणा, महिला, वृद्ध व बालक कल्याण या सर्व क्षेत्रांत जागतिक सहकार्य आवश्यक आहे.

संयुक्त राष्ट्र दिन आपल्याला शिकवतो की भौगोलिक, सांस्कृतिक, धार्मिक किंवा आर्थिक भिन्नता पाहता येऊ नये; एकत्र येऊन मानवतेसाठी, समाजासाठी आणि भविष्यासाठी सकारात्मक बदल घडवणे ही खरी जबाबदारी आहे.

या दिवशी जागतिक नागरिक म्हणून आपण आपली भूमिका ओळखून, सामाजिक न्याय, समानता, सहअस्तित्व, शांतता आणि सहकार्य या मूल्यांची जोपासना करून जागतिक सहकार्याचा भाग होऊ शकतो. मानवतेच्या सेवेसाठी, जागतिक शांततेसाठी आणि सर्वांसाठी समृद्ध भविष्य घडवण्यासाठी संयुक्त राष्ट्र दिन सदैव प्रेरणास्त्रोत राहील.

# संयुक्त राष्ट्रसंघ बघ्याच्या भूमिकेत

जगातील काही भागात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे व याचा गंभीर परिणाम जगातील तळगाळातील देशांवर होत आहे.याबाबी संयुक्त राष्ट्र उघड्या डोळ्यांनी पहात आहे. परंतु यावर तोडगा किंवा कोणतीही कठोर अॅक्शन घेतांना दिसत नाही ही जगासाठी अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.

२०२० मधील अजरबैझान-आर्मेनिया युद्ध, २०२१ चे अफगाणिस्तान-तालिबान युद्ध,२०२२ पासुन आतापर्यंत सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध आणि आता नुकताच सुरू झालेला हमास-हिज्बुल्ला-इराण व इस्त्रायलचा भयावह संघर्ष यामुळे जगात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते. अशा भयावह स्थितीमध्ये परमाणू युध्दाची शक्यता नाकारता येत नाही. कारण हे युद्ध आता हमास - हिज्बुला -इराण व इस्त्रायल युद्ध किंवा रशिया-युक्रेन युद्ध सीमित रहाले नसुन दोन बलाढ्य देश वेगवेगळ्या लढवण्याची दाट शक्यता आहे.

आज रशिया-युक्रेन संघर्षात युक्रेन कडून नाटो पुर्णपणे ताकदीनी रशिया सोबत लढत आहे. तर हमास -हिज्बुल्ला कडून इराण संपूर्ण ताकदीनिशी लढत आहे व इस्त्रायल कडून अमेरिका व मित्र राष्ट्र ताकदीनीशी उभे आहेत. यामुळे जगातील बलाढ्य देश दोन तुकड्यामध्ये वाटल्या जाऊ शकते आणि तशी परिस्थिती निर्माण झाली आहे. हमास व हिज्बुल्लाला इराण संपूर्णपणे खुली मदत करीत आहेत. तर दुसरीकडे इस्त्रायलच्या शेजारच्या राष्ट्रांच्या आतंकवादी संघटना इस्त्रायलवर बंदुक तानुन बसले आहेत. यामध्ये गाजा मधील हमास व इस्लामिक जिहाद आतंकवादी संघटना, लेबनॉन मधील हिजबुल्ला, मिस्त्र मधील मुस्लिम ब्रदरहुड, सीरियामधील आलं नुकसार फ्रंट अलकायदा अशा प्रकारे आतंकवादी संघटना इस्त्रायलवर हल्ला करण्याच्या तयारीत आहे.परंतु इस्त्रायल सर्वांनाच चांगल्याप्रकारे शिकस्त देत आहे. अशा परिस्थितीत तिसऱ्या महायुध्दाची ठिणगी केव्हाही उडु शकते.

चीन-तैवान संघर्ष सुरूच आहे आणि आता अफगाणिस्तान व पाकिस्तान यांचाही संघर्ष टोकाला पोहोचला आहे. अशा भयावह स्थितीत तिसऱ्या महायुद्धाची पुणरावृत्ती होणार नाही याची दक्षता "संयुक्त राष्ट्रसंघाने"घेतली पाहिजे. परंतु सध्याच्या परिस्थितीत संयुक्त राष्ट्र संघाची भूमिका संथ आहे. यामुळे जगात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सध्याच्या परिस्थितीत गेल्या तीन वर्षांपासून रशिया -युक्रेन युद्ध किंवा आता सुरू असलेला हमास-हिज्बुल्ला-इराण-इस्त्रायल संघर्ष किंवा अफगाणिस्तान-पाकिस्तान संघर्ष जगाला केव्हाही हादरा देवू शकतो .सध्या निर्माण झालेली जगातील "विध्वंसकारी" परीस्थिती पहाता "संयुक्त राष्ट्रसंघाने" मानव कल्याणासाठी कठोर पाऊल उचलण्याची गरज आहे. परंतु संयुक्त राष्ट्रसंघाचे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे.

आज संयुक्त राष्ट्रसंघ ८० वर्षांचा झाला असला तरीही जगात संघर्ष कमी न मोठ्या प्रमाणात वाढत आहे ही अत्यंत चिंताजनक व गंभीर बाब आहे. संयुक्त राष्ट्रसंघटना अनेक देशांतील घडामोडीवर नियंत्रण ठेवण्याचे काम करीत असते. पहिल्या महायुद्धानंतर १९२९ मध्ये "राष्ट्र संघाची" स्थापना करण्यात आली. परंतु "राष्ट्रसंघ" प्रभावहीन असल्यामुळे "संयुक्त राष्ट्रसंघटनेची" २४ आक्टोबर १९४५ ला स्थापना करण्यात आली.

यावेळी संयुक्त राष्ट्र अधिपत्रावर ५० देशांच्या सह्यानीशी याची स्थापना करण्यात आली.परंतु आता जगातील अनेक देश संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्य आहेत. यामुळे प्रत्येक देशाला आपापल्या तक्रारी मांडण्याचा अधिकार संयुक्त राष्ट्रसंघटनेने दिलेला आहे. युध्द जन्य परीस्थिती, भुकमरी, कुपोषण, मानवधिकार, अंतराष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक विकास, सामाजिक प्रगती आणि विश्व शांति इत्यादी संपूर्ण बाबींनवर चर्चा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून केली जाते.

दुसऱ्या महायुद्धानंतर विजयी झालेल्या देशांनी एकत्र येऊन संयुक्त राष्ट्राला आंतरराष्ट्रीय संघर्षामध्ये हस्तक्षेप करण्याच्या उद्देशाने संघटनेची स्थापना करण्यात आली. संघटनेचा उद्देश हा आहे की भविष्यात द्वितीय महायुध्दासारखी महाभयानक परीस्थिती उदभवु नये या उद्देशाने याची स्थापना करण्यात आलेली आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेची संरचना शक्तीशाली देश अमेरिका, फ्रांस, ब्रिटन, रूस आणि संयुक्त राजशाही यांनी द्वितीय विश्व युध्दात अत्यंत महत्वाची भूमिका बजावली होती.

सध्याच्या परिस्थितीत संयुक्त राष्ट्रसंघटनेमध्ये १९३ पेक्षा जास्त देश आहेत.जगातील सर्वच आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त देश या संस्थेशी जुडुन आहेत. या संस्थेची संरचना,आम सभा, सुरक्षा परिषद, आर्थिक व सामाजिक परिषद, सचिवालय आणि आंतरराष्ट्रीय न्यायालय या संपूर्ण बाबीं या संस्थेमध्ये आहेत.

संयुक्त राष्ट्र संघटना ही एक चांगली आंतरराष्ट्रीय उपयोगी संघटना आहे. गेल्या २० वर्षापासुन अफगाणिस्तानमध्ये अमेरिका व नाटोची सेना होती.यामुळे अफगाणिस्तानची जनता स्वतःला सुरक्षित समजत होते. परंतु अमेरिकेने २०२१ मध्ये आपले सैन्य माघारी बोलावल्यामुळे अवघ्या १०० दिवसात खुनी तांडव निर्माण होवून लाखो निरपराध्यांचा बळी तालिबानी आतंकवाद्यांनी घेतला व अफगाणिस्तानवर संपूर्ण कब्जा मिळविला आणि अफगाणिस्तानला रक्ताच्या लाथोळ्यात लोटले. परंतु यात संयुक्त राष्ट्र संघाने थोडासाही हस्तक्षेप केला नाही.

संयुक्तराष्ट्र संघटनेच्या माध्यमातून पाकिस्तान नेहमी भारताच्या विरूद्ध चिखल फेक करीत असतांना दीसुन येते.सिरियामधील अत्याचाराच्या घटना संयुक्त राष्ट्रसंघापुढे मांडुन या घटना जम्मु काश्मिरमध्ये घडत असल्याचे सांगून भारत मानवाधिकाराचे उल्लंघन करीत असल्याचा "पोपोगंडा"पाकिस्तान नेहमीच करीत असतो. कारण भारतीय घटनेतील ३७० व ३५ ए कलम हटविल्याचे दुःख पाकिस्तानला जास्तच होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे हा मुद्दासुध्दा पाकिस्तानने संयुक्त राष्ट्रांमध्ये अनेकदा नेलेला आहे. परंतु संयुक्त राष्ट्राने पाकिस्तानचे संपूर्ण आरोप फेटाळून लावले. संघर्ष व कटुता दुर करण्याचे काम संयुक्त राष्ट्र संघटनेने नियमीतपणे करायलाच हवे. तेंव्हाच जगात शांतता नांदेल.



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

## पांडव पंचमी

वाचक लिहितात

कार्तिक शुक्ल पंचमीला पांडव पंचमी साजरी केली जाते. द्यूतात कौरवांकडून हरलेल्या पांडवांनी १२ वर्षे वनवास आणि १ वर्ष अज्ञातवासात काढले. कार्तिक शुक्ल पंचमीला पांडव अज्ञातवासातून प्रकट झाले. म्हणूनच या दिवसाला पांडव पंचमी असे म्हटले जाते.

या दिवशी भगवान श्रीकृष्णाच्या मार्गदर्शनाखाली अत्यल्प संख्याबळ असूनही बलाढ्य कौरवसेनेचा पराभव करणाऱ्या पांडवांच्या धर्मनिष्ठा, संयम, शौर्य आणि आज्ञापालन या गुणांचे स्मरण केले जाते. पांडवांसारखे पुत्र घरात जन्माला यावेत यांसाठी पांडवांची पूजा करण्याची प्रथा आहे. या दिवशी गायीच्या शेणापासून पांडवांच्या आकृती तयार करून त्यांची मनोभावे पूजा केली जाते. त्यानंतर भगवान श्रीकृष्णाच्या चरणी प्रार्थना केली जाते,

हे श्रीकृष्णा, जसे पांडवांनी तुझ्या आदेशाचे पालन करून कौरवांविरुद्ध धर्मयुद्ध करून विजय संपादन केला, तसेच आमच्यातही आज्ञापालन, धैर्य आणि धर्मनिष्ठा या गुणांची वृद्धी होऊ दे. आमच्या दोषांवर विजय मिळवून तुज्यासारखे गुण आमच्यात निर्माण होऊ दे. अशा रीतीने या दिवशी पांडवांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून धर्मनिष्ठा, संयम आणि सदाचाराने जीवन जगण्याचा संकल्प करणे हेच पांडव पंचमीचे खरे महत्त्व आहे.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा

## कधी उजळणार त्यांचे आयुष्य?

दिवाळीचा सण जवळपास संपुष्टात आला आहे . आपापल्या ऐपतीप्रमाणे प्रत्येकाने हा सण साजरा केल्याचे दिसून आले . आता दररोज घराघरासमोर विविध प्रकारचे वाद्य वाजवून गोडधोड, फराळ आणि पैसे मागणाऱ्यांची गर्दी दिसून येत आहे. या लोकांच्या आयुष्यात खरा प्रकाश कधी पसरेल?

भारत हा विविधतेने नटलेला देश आपण म्हणतो. एक वर्ग सधन आहे, प्रचंड संपत्ती आहे आणि दुसरा वर्ग अगदीच निर्धन. गेल्या काही वर्षापासून मी स्वतः पाहतो, दिवाळी आली की काही विशिष्ट लोकं लेकरंबारं घेवून दारोदार हिंडत असतात. हातात भिकेचे कटोरे आणि दिनवाण्या नजरेने ते दारोदारी गोडधोड मागतात. त्यांच्यासह लहान मुलेही असतात. त्यांना नकार द्यायची हिंमत होत नाही. ओझे पेलणार नाही इतक्या मोठ्या पिशव्याभर ते फराळ गोळा करतात. प्रश्न असा पडतो की हे शिळेबासे ते किती दिवस खाणार?

सद्ध्याच्या आणि यापूर्वीच्या सरकारने अशा वंचित आणि गरिबीने ग्रासलेल्या लोकांसाठी आजवर काहीच कसे केले नाही? 140 कोटीपेक्षा अधिकची लोकसंख्या, सरकारचे फसलेले नियोजन, देशात जातीधर्माला अत्याधिक महत्व आणि काही विशिष्ट लोकांच्या हातात एकवटलेले अर्थकारण अशा विविध कारणांमुळे या लोकांना दारोदार फिरण्याची वेळ येते. आपण महासत्ता होण्याच्या वाटेवर आहोत म्हणे. पण, जोवर अशा वंचितांचा विकास होणार नाही, तोवर महासत्ता म्हणजे थोतांड ठरावे.

■ विक्रम जनबंधू, नागपूर.

# नियोजन भवनातून खरी लूट

नियोजन भवन हे जिल्हा स्तरावर असलेले अत्यंत महत्त्वाचे सरकारी कार्यालय.या कार्यालयाकडून जिल्हा नियोजन आणि विकासा संबंधी कामकाज चालते. हे कार्यालय जिल्हा नियोजन समिती आणि जिल्हा नियोजन अधिकारी यांच्या माध्यमातून काम करते. जिल्हाधिकारी यांचे नियंत्रणाखाली या कार्यालयाचे संपुर्ण कामकाज चालते.ते या विभागाचे प्रमुख मार्गदर्शक आणि नियंत्रक असतात.

जिल्हा नियोजन भवनातून चालणारा मुख्य कारभार येणे प्रमाणे - जिल्हा वार्षिक योजना तयार करणे - जिल्ह्यातील सर्व विभागांकडून ग्राम पंचायत,नगर परिषद,नगर पंचायत, महानगर पालिका, जिल्हा परिषद,पंचायत समिती, आरोग्य, शिक्षण,सार्वजनिक बांधकाम,महिला व बालकल्याण, शेती, आमदार- खासदार निधीतून होणारी कामे, केंद्र व राज्य सरकारच्या निधीचा वापर करण्यासाठी विकास योजनांचे प्रस्ताव केंद्र व राज्य सरकार कडून मागवले जातात.त्या प्रस्तावांचा अभ्यास करून वार्षिक जिल्हा विकास योजना तयार केल्या जातात.

या योजनेला जिल्हा नियोजन समिती आणि शासनाची मंजुरी घेतली जाते.

जिल्हा नियोजन निधीचा वापर व वाटप - केंद्र व राज्य शासनाकडून जिल्ह्याला प्राप्त होणारा निधी विविध विकास कामांसाठी वापरला जातो.

यात रस्ते, शाळा, इमारती व पुलांचे बांधकाम,शिक्षण,पाणीपुरवठा योजना,विविध सेवा प्रकल्प,आरोग्य सेवा इत्यादीं साठी हा निधी वापरला जातो.

निधींच्या वापराचे लेखाशास्त्र व अहवाल नियोजन भवनातून तयार केले जातात. यातून खरे अर्थकारणं साधले जात आहे. यातून एकत्रितपणे जनतेचा निधी लाटला जातो आहे. लाखों रूपयांच्या कामांची आकडेमोड करून आकडे फुगवून दाखवून सरकारी कामे केली जात आहेत. यातून मिळणाऱ्या मलीद्यातून, कमिशन मधून राजकीय, अधिकारी लोकांचे घरे भरली जात आहेत. याला चॅलेंज करणारी कुठलीही त्रयस्त यंत्रणा आज अस्तित्वात नाही. यामुळे लाखांमध्ये होणारे काम करोडोंमध्ये केले जात आहे. तरीही कामांचा दर्जा निकृष्ट दर्जाचा आहे. हे खरे दुखने आहे.

खासदार व आमदार निधीमधून होणाऱ्या कामांची नोंद व मंजुरीसाठीची प्रक्रिया नियोजन भवनातून होते.याला मंत्री मंडळाची मंजुरी लागते.स्थानिक स्वराज संस्थांनी आखलेल्या विकास योजनांचा समावेश जिल्हा योजने अंतर्गत केला जातो.ग्रामपंचायत ते जिल्हा परिषद पर्यंतच्या विकासाचा समन्वय यातून साधला जातो आहे.

अंमलबजावणी,परीक्षण व अहवाल सादरीकरण -

मंजूर योजनांची अंमलबजावणी कशी होते आहे ते आता पाहू या- उदाहरणार्थ :- बांधकामासाठी पाच लाख रूपयांचा खर्च,निधी अपेक्षित असतांना तो रुपए पंधरा ते वीस लाख रुपये दाखवून वरील कमिशन हे सर्वांमध्ये वाटले जात आहे. या मंजुरीला कुणाचिही हरकत नसते. कारणं सर्व काही ठरवून केले जात आहे. इतर यंत्रणा ज्यांना या विषयाचे ज्ञान आहे ते या वादात पडू इच्छित नाहीत.याचे कारणं योजनेला मंजुरी देणारे त्यांचीच माणसे आहेत.मंजुर योजनेची अंमलबजावणी करणारे पणं त्यांचीच माणसे, कर्मचारी व अधिकारी वर्ग आहेत. कामाचे परिक्षण करणारी यंत्रणा पण त्यांचीच आहे.

कामाच्या अहवालाचे सादरीकरण करणारी सरकारी व खाजगी माणसे पणं त्यांचीच आहेत.मग कामांमधील चोरी कशी पकडली जाणार? कुणी याबद्दल तक्रार केलीच तर ती तक्रार कशी मार्गी लावायची? याचे पणं नियोजन आधीच झालेले असते. याचा अनुभव मी स्वतः घेतलेला आहे. सरकारी तक्रार पोर्टल हे निव्वळ बनवाबनवीचे साधन ठरले आहे.

मिलिंद गड्डमवार
सामाजिक कार्यकर्ते, मुक्त पत्रकार
राजुरा, जि. चंद्रपूर.
9511215200

या खात्याकडून त्या खात्याकडे केलेली तक्रार वळती केली जाते. एखादा टोल फ्री नंबर तक्रारीचे निवारण करण्यासाठी किंवा पाठपुरावा करण्यासाठी दिला जातो. जो नेहमीच बीजी असतो. चुकून लागलाच तर योग्य माहिती दिली जात नाही.हे सर्व एकतर्फी सुरू असते. यावर योग्य माहिती व उचित मार्गदर्शन मिळत नसल्याने शेवटी फोन करणाराच हतबल ठरत असतो आणि मुकाट्याने गप्प बसतो.मग यावर जनहीतयाचिके शिवाय दुसरा पर्याय शिल्लक रहात नाही.

यासाठी तुम्हांला सर्व माहिती अधिकृतपणे जमा करावी लागते. आपला अमुल्य वेळ,पैसा खर्च करावा लागतो. मानहानी, धमक्यांना सामोरे जावे लागते. अश्यावेळी कुणीही साथ देत नाहीत. एकट्यालाच सरकार विरोधात, प्रस्थापितांविरोधात लढावे लागते. कधी कधी तर जीवावर पणं बेतू शकते. असा सर्व लोकाभिमुख कारभार सुरू आहे. तरीही जनतेची फसवणूक होत नाही आहे असे म्हणायचे ?

विशेष राज्य व केंद्र शासनाच्या योजनांची अंमलबजावणी करणे बाबत -

जलयुक्त शिवार, ग्रामीण रस्ते, स्मार्ट सिटी, स्वच्छ भारत मिशन,प्रधानमंत्री व मुख्यमंत्री सडक योजना, प्रधानमंत्री आवास योजना, घरकुल आवास योजना इ. अशा योजनांच्या नियोजन व समन्वयाची जबाबदारी देखील नियोजन भवनाकडेच असते.

नियोजन भवनातील प्रमुख जिल्हा नियोजन अधिकारी, सहायक नियोजन अधिकारी, सांख्यिकी अधिकारी, विश्लेषक अधिकारी, लेखा अधिकारी, लिपिक वर्गीय कर्मचारी,जिल्हाधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या संगणमताने कामांचे नियोजन केले जाते. सर्वांची टक्केवारी ही ठरलेली असते.यात कुठलाही बदल केला जात नसल्याने सर्वजण मिळून गुण्यागोविंदाने नांदत असतात.याच कारणाने त्यांच्या संपत्तीने पाच वर्षात उच्चांक गाठलेला आढळून येतो आहे.

यावर अंकुश ठेवणे शक्य आहे कां? तर याचे उत्तर होय असे आहे. कुठलेही सरकारी काम हे लोकाभिमुख असावे यासाठी कामाच्या मंजुरीला पेपर मधून प्रसिध्दी दिली जाते. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. तरीही जाणीवपुर्वक कामाचा माहिती फलक लावला जात नाही. निव्वळ पेपर व इतर माध्यमांमध्ये जाहिराती देऊन वृत्तपत्र धारकांचे, पत्रकारांचे तोंड दाबून ठेवले जाते आहे. कामाचे खरे स्वरूप जनते समोर कधीच मांडले जात नाही. जनतेला अंधारात ठेवूनच सर्व सरकारी कामे केली जातात.त्या कामांचा दर्जा कधीच तपासला जात नाही. यासाठी संघटीत इंजिनीअर व जाणकार लोकांनी, वकील मंडळींनी, सामाजिक संघटनांनी या विरोधात एकत्रितपणे आवाज बुलंद केला पाहिजे. सरकारी कामांना,बांधकामाला चॅलेंज केले गेले पाहिजे.

जिल्हाधिकारी या व्यवस्थेचे प्रमुख मार्गदर्शक असल्याने त्यांच्या कानावर ही प्रकरणे जाहिरपणे टाकली गेली पाहिजेत. सामाजिक जाणीवेतून योग्य प्रकारे निवेदने देऊन पुराव्यासह पाठपुरावा केला गेला पाहिजे.तरच अश्या पैसे खाऊ अवाजवी योजनांना आळा बसू शकेल. सरकारी कामांचे योग्य आर्थिक नियोजन करण्यासाठी आणि या कामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा नियोजन पातळीवर शासकीय अधिकाऱ्यां व्यतिरिक्त इतर खाजगी तज्ञ, इंजिनीअर व सामाजिक क्षेत्रातील लोकांची समिती गठीत केली गेली पाहिजे.

या समितीमार्फत जनते कडून आलेल्या योजनांचा, सुचनांचा विचार झाला पाहिजे. त्याला मुर्त स्वरूप दिले गेले पाहिजे.या सबंधाने येणाऱ्या तक्रारींचे स्थानिक पातळीवर निराकरण झाले पाहिजे. तरच जनतेचा कर रूपी पैसा हा सत्कारणी लागू शकेल असे वाटते आहे. योग्य किंमतीत व योग्य प्रकारे बांधकाम व इतर कामे झाल्याने जनतेचा पैसा वाचून यातून इतर कामांना पणं हातभार लागू शकतो. यावर विचार होने गरजेचे वाटते आहे. करीता हा लेखन प्रपंच !

# जर सतत थकवा जाणवत असेल तर, दुर्लक्ष करू नका





सततच्या धावपळीमुळे थकवा जाणवू शकतो. तसेच शरीराला आरम न मिळाल्याने आजारही उद्भवू शकतात. पण जर पुरेशी झोप आणि विश्रांती घेतल्यानंतरही नेहमीच थकवा जाणवत असेल तर मात्र हे नक्कीच सामान्य असू शकत नाही. ही समस्या झोपेच्या अनियमिततेमुळे तर असूच शकते. पण सोबतच ती एखाद्या आरोग्य स्थितीमुळे किंवा औषधांमुळे असू शकते.

**झोपेच्या सवयी :** तुम्हाला तुमच्या झोपेच्या सवयी सुधारण्याची गरज आहे. तुम्हाला किमान सात तासांची दर्जेदार झोप मिळाली पाहिजे. हे फार महत्त्वाची तसेच, दररोज झोपण्याची आणि उठण्याची वेळ निश्चित करा. लहान मुलाप्रमाणे, जर तुम्ही झोपण्याची आणि उठण्याची वेळ निश्चित केली तर तुमची झोप सुधारेल.

रात्रीच्या जेवणाची वेळ : रात्रीच्या जेवणाची वेळ देखील चांगली झोप येण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. झोपण्यापूर्वी दोन ते तीन तास आधी जेवण करण्याचा प्रयत्न करा. जर झोपेची समस्या कायम राहिली तर तुम्ही डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्यावा.

**निद्रानाशाची अनेक कारणे असू शकतात:** निद्रानाशाची समस्या सतत वाढत आहे. जर तुम्हाला दिवसाही झोप येत असेल तर डॉक्टर अनेक आजारांचे हे कारण असू शकते.

**निद्रानाश:** जगभरातील सुमारे 30 टक्के प्रौढांना झोपेचा त्रास होतो, ज्यामुळे थकवा येतो आणि एकाग्रता कमी होते. निद्रानाश हा ताण किंवा जेट लॅगमुळे होऊ शकतो. तथापि, जर ही लक्षणे आठवड्यातून तीन वेळा आढळली आणि तीन महिने टिकून राहिली तर याला निद्रानाश म्हणतात.

**स्लीप एपनिया:** झोपेच्या दरम्यान घशाच्या स्नायूंच्या आकुंचनामुळे हवेचा प्रवाह रोखला जातो, ज्यामुळे श्वास घेण्यास त्रास होतो. यामुळे रात्रीच्या वेळी वारंवार झोपेचा भंग होऊ शकतो.

**लेग सिंड्रोम:** पायांमध्ये अस्वस्थता. झोपेच्या वेळी ही अस्वस्थता वाढते, ज्यामुळे अनेकदा झोपेमध्ये व्यत्यय येतो. उपचारः पायांची मालिश, अल्कोहोल आणि कॅफिन टाळणे या स्थितीला प्रतिबंधित करण्यास मदत करू शकते. लोहाच्या कमतरतेवरील उपचार देखील कधीकधी आराम देऊ शकतात. यावेळी डॉक्टरकडे जाऊन उपचार सुरु करणेच योग्य. दरम्यान थकव्याची समस्या सततच जाणवत असेल. तर त्याकडे दुर्लक्ष न करता थेट डॉक्टरांचा सल्ला घ्यावा..

**थकवा येण्यामागे इतरही अनेक कारणे असू शकतात.**

**असंतुलन :** हायपोथायरॉईडीझममुळे सतत थकवा येऊ शकतो. तथापि, त्याचे निदान आणि उपचार करणे सोपे आहे.

**जीवनसत्त्वे किंवा खनिजांची कमतरता :** लोहाची कमतरता शाकाहारी किंवा व्हेगन आहारावर जास्त अवलंबून राहिल्यामुळे किंवा मासिक पाळीच्या समस्यांमुळे होऊ शकते. व्हिटॅमिन डी आणि बी12 च्या कमतरतेमुळे थकवा येऊ शकतो.

**दीर्घकालीन आरोग्य समस्या :** मधुमेह, नैराश्य आणि पोटाच्या समस्या या सर्वांमुळे सतत थकवा येऊ शकतो. या आरोग्य समस्यांची लक्षणे व्यवस्थापित करणे आणि त्यावर उपचार करणे शक्य आहे.

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### शुभेच्छांचा महापूर

बोलाची कढी व
बोलाच्याच भाताने
भरत नसते पोट
तशीच व्हाट्सअप वरच्या
शुभेच्छांची आहे भौ गोट ..

सोपस्कार पार पाडण्यात
आम्ही आहोत सराईत
असली नकलीची निवड
करतांना होते पंचाईत ..

काही का असेना -
आम्ही करतोना आठवण
धावपळीच्या जीवनात
पुरेसा हाय एवढा क्षण..

# पक्का पता: नागपूर मध्ये पहिल्यांदाच आवाक्यातील घरे बांधण्याचा आनंद गोदरेज कॅपिटलने साजरा केला

**नागपूर, २३ ऑक्टोबर :** गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपची वित्तीय सेवा शाखा असलेल्या गोदरेज कॅपिटलने त्यांची उपकंपनी गोदरेज हाऊसिंग फायनान्सच्या माध्यमातून 'पक्का पता' अर्थात मालकीचे घर ही नवीन मोहीम सुरू केली आहे. नागपूर भारतातील उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये परवडणाऱ्या गृहनिर्माण वित्त उपाययोजनांना प्रोत्साहन देणे हा त्याचा उद्देश आहे. पहिल्यांदाच घर खरेदी करणाऱ्यांचा भावनिक प्रवास ही मोहीम टिपते. तसेच भाड्याच्या जागेतून स्वतःच्या मालकीच्या घरात जाण्यासाठी गोदरेज हाऊसिंग फायनान्सला एक विश्वासार्ह भागीदार म्हणून मान्यता देते.

या मोहिमेच्या केंद्रस्थानी एक साधा, सोपा पण सखोल दृष्टिकोन आहे: 'पक्का पता' म्हणजेच कायमस्वरूपी पत्ता, हे भारतीय कुटुंबांचे सर्वात मोठे स्वप्न असते. हा चित्रपट एका कुटुंबाच्या त्यांच्या नवीन, हक्काच्या घरात जाण्याच्या प्रवासाचे चित्रण करतो. सामानाचे उघडे खोके आणि अर्धवट लावलेल्या खोल्यांमध्येही एक हळवा क्षण समोर येतो. जेव्हा त्या मुलाचे वडील आपल्या मुलाची उंची ताज्या रंगवलेल्या भिंतीवर नोंदवतात - पेन्सिलने नाही तर कायमस्वरूपी मार्करने. आई सुरुवातीला आश्चर्यचकित होते. पण, वडील तिला हळूवारपणे आठवण करून देतात की, ये हमारा खुद का घर है... इस घर में सिर्फ रहना नहीं है... इस घर में जीना है. कुटुंबाने त्यांचे हे नवीन घर स्वीकारले आहे, ज्यामध्ये केवळ मालकीची भावनाच नाही तर त्यातून मिळणारी आपलेपणा आणि कायमस्वरूपीपणाची भावना देखील अधोरेखित होते.

पारंपरिकपणे घर खरेदीसाठी चांगला मुहूर्त म्हणून दिवाळी आणि धनत्रयोदशीचे महत्त्व लक्षात घेत ही मोहीम धोरणात्मकरित्या आखण्यात आली आहे. परवडणाऱ्या गृहनिर्माण वित्तपुरवठ्यासाठी ग्राहक-प्रथम दृष्टिकोन अधोरेखित करून या मानसिकतेचा फायदा करून घेण्याचा कंपनीचा उद्देश आहे, ज्यामुळे टियर-२ शहरांमध्ये घर घेणे अधिक सोपे होईल. कारण तेथील घरे आता परवडणाऱ्या दरांमध्ये उपलब्ध आहेत.

मुख्य विपणन अधिकारी नलिन जैन म्हणाले, घर म्हणजे केवळ आर्थिक टप्पा नाही तर तो एक भावनिक टप्पा आहे. 'पक्का पता' हा तो क्षण आहे, जेव्हा स्वप्नाचे सत्यात रूपांतर होते. भाड्याने घेतलेली जागा तुमची स्वतःची बनते आणि अनिश्चितता जाऊन अभिमान आणि स्थैर्याची भावना येते. सोपी कर्ज प्रक्रिया, एकूण घराच्या ९०% पर्यंत निधी आणि परतफेडीच्या दीर्घ मुदतीद्वारे आम्ही भारतातील उदयोन्मुख बाजारपेठांमधील कुटुंबांसाठी घरमालकी अधिक सुलभ आणि तणावमुक्त बनवण्याचे उद्दिष्ट ठेवतो.

महाराष्ट्रात पुण्यातील पिंपरी-चिंचवडसह, विरार, पनवेल, पुणे, जळगाव, बदलापूर, आणि नाशिक यासह टियर-२ बाजारपेठांमध्ये तसेच गुजरातमधील अहमदाबाद, बडोदा, राजकोट, वापी, गांधीधाम, हिंमतनगर, सुरेंद्रनगर, अंकलेश्वर आणि इतर अनेक शहरांमध्ये ही मोहीम राबवली जाईल. डिजिटल-फर्स्ट दृष्टिकोना अंतर्गत मेटा आणि यूट्युबसारख्या प्लॅटफॉर्मवर व्यापक दृश्यमानता सुनिश्चित होईल. प्रादेशिक सहभाग मजबूत करण्यासाठी बाह्य सक्रियता तसेच पूरक वाहन ब्रँडिंग असेल.

'पक्का पत्ता'च्या माध्यमातून घरमालकीचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्याच्या आपल्या वचनबद्धतेला कंपनी अधिक मजबूत करते. आणि भारतातील महत्त्वाकांक्षी शहरांमध्ये अधिकाधिक कुटुंबांना कायमस्वरूपी, अर्थपूर्ण स्थान मिळवून देण्याच्या दीर्घकालीन दृष्टिकोनाला बळकटी मिळते.

# मध्य भारतातील औषध आणि रसायन उद्योगांना चालना देण्यासाठी नागपुरात सीडीएससीओ कार्यालय स्थापन करा

**नागपूर, २३ ऑक्टोबर :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा यांना पत्र लिहून असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी) च्या शिफारशीनुसार नागपुरात सेंट्रल ड्रग्ज स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन (सीडीएससीओ) कार्यालय स्थापन करण्याची विनंती केली आहे.

माननीय केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंटने केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण आणि रसायने आणि खते मंत्री मा. जगत प्रकाश नड्डा यांना नागपूर, येथे सीडीएससीओ कार्यालय स्थापन करण्याची विनंती केली आहे.

नागपूर हे मध्य भारतातील एक महत्त्वाचे औषध आणि रसायन उत्पादन केंद्र म्हणून वेगाने विकसित झाले आहे, असे नड्डा यांना सादर केलेल्या सविस्तर निवेदनात एआयडीचे अध्यक्ष आशिष काळे यांनी अधोरेखित केले आहे. या क्षेत्रात आता मोठ्या प्रमाणात औषध आणि फॉर्म्युलेशन युनिट्स, एक्सिपियंट उत्पादक, रक्तपेढी, रुग्णालये, फार्मसी आणि वैद्यकीय उपकरणांचे उद्योग आहेत. मिहान (मल्टी-मॉडल इंटरनॅशनल कार्गो हब आणि विमानतळ नागपूर) प्रकल्पाच्या विस्तारासह, मोठ्या प्रमाणात औषध आणि बायोटेक मधील गुंतवणूक शहराचे धोरणात्मक महत्त्व आणखी वाढवत आहेत, असे काळे यांनी म्हटले आहे.


सध्या, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि गुजरातमधील उद्योगांना मंजुरी, परवाना आणि तपासणीसाठी दूरच्या सीडीएससीओ कार्यालयांशी संपर्क साधावा लागतो. यामुळे विलंब, अधिकचा खर्च आणि पुरवठा साखळीत अकार्यक्षमता निर्माण होते. नागपुरात सीडीएससीओ कार्यालय स्थापन केल्याने जलद नियामक प्रक्रिया, प्रशासकीय भार कमी होणे, सुधारित अनुपालन आणि वेळेवर औषधे उपलब्ध होणे या बाबी शक्य होतील आणि याचा थेट फायदा उद्योगांना आणि आरोग्यसेवा संस्थांना होईल.

हा उपक्रम भारत सरकारच्या व्यवसाय सुलभता, मेक इन इंडिया आणि सर्वांसाठी आरोग्यसेवा या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे, यावर काळे यांनी भर दिला. नड्डा यांच्या गतिमान नेतृत्वाखाली, उद्योगाची ही दीर्घकाळापासूनची मागणी लवकरच पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या प्रकरणी पाठिंबा मिळविण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही निवेदन पाठविण्यात आले आहे.

# जागतिक पोलिओ दिन



आज २४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा केला जातो. पोलिओ मुक्तीसाठी मोलाचे योगदान देणारे शास्त्रज्ञ जॉन सॉल्क यांचा आज जन्मदिवस. जॉन सॉल्क आणि त्यांच्या टीमने पोलिओची पहिली लस शोधून काढली म्हणून त्यांचाच जन्मदिन जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय जागतिक आरोग्य संघटनेने घेतला. आजच्या दिवसाकडे पोलिओशी दिलेल्या यशस्वी लढ्याचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने १९९८ सालापासून पल्स पोलिओची मोहीम हाती घेतली. जानेवारी व फेब्रुवारी महिन्यातील रविवार पोलिओ रविवार म्हणून साजरा केला जातो. पोलिओ रविवारच्या नंतरच्या आठवड्यात ० ते ५ वयोगटील बालकांना घरोघरी जाऊन पोलिओचा डोस पाजला जातो. त्यासाठी व्यापक प्रमाणावर जनजागृती केली जाते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनाखाली आपल्या आरोग्य यंत्रणेने भारतातून पोलिओ मुक्तीसाठी अथक प्रयत्न केले. अमिताभ बच्चन, मोहम्मद कैफ इत्यादी व्यक्तींनीही दूरचित्रवाणीवरून जनजागृती केली. शासन, प्रशासन, आरोग्य यंत्रणा यांच्या अथक प्रयत्नातून आज भारत पोलिओ मुक्त झाला आहे. २७ मार्च २०११ या दिवशी जागतिक आरोग्य संघटनेने भारत पोलिओ मुक्त झाल्याची घोषणा केली. अर्थात सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशाला पोलिओ मुक्त करणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नव्हती. सुरवातीला तर पालक आपल्या बालकांना पोलिओ डोस देण्यास तयारच होत नसे. आपल्या बालकांना पोलिओ डोस पाजण्यास पालक निरुत्साही होते. लोक घरातून बाहेरच पडत नसत. पालकांचा निरुत्साह असला तरी आरोग्य खात्यातील कर्मचारी हिरमुसले नाही. त्यांनी त्यांचे काम चालूच ठेवले. एखादे व्रत हाती घेतल्या प्रमाणे देशातील आरोग्य कर्मचारी पोलिओ मुक्तीसाठी झटत होते. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांना लवकरच यश मिळाले. १९९९ साली पोलिओच्या तीन विषाणूंपैकी दुसरा विषाणू नष्ट झाला मात्र पहिल्या आणि तिसऱ्या प्रकारचा विषाणू अजूनही कार्यरत होता. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार या राज्यात दूषित पाण्यामुळे जुलाब, उलट्यांचे प्रमाण अधिक असल्याने तिथे तोंडावाटे दिलेली लस उपयुक्त ठरत नव्हती. तेंव्हा वैद्यकीय संशोधकांनी मुरादाबाद या गावात पोलिओची एकगुणी लस म्हणजे १,२,३ विषाणूंची लस वेगवेगळी प्रत्येक जन्मलेल्या बाळास दिली. मात्र देशातील सगळ्या बालकांपर्यंत असा कार्यक्रम पोहचवणे अशक्य होते. त्यानंतर पुन्हा त्यात संशोधन करण्यात आले. सर्वांना उपयुक्त अशा लसीची मात्रा तयार झाल्यानंतर देशात पोलिओ मुक्तीची मोहीम वेगाने राबवण्यात आली. त्याचा परिणाम म्हणजे आज पोलिओमुक्त मुक्त भारत अशी आपली ओळख बनली आहे. भारत जरी पोलिओमुक्त झाला असला तरी जगातून पोलिओचे अजूनही समूळ उच्चाटन झाले नाही. आफ्रिका खंडातील काही देशात तसेच आशिया खंडातील पाकिस्तान, अफगाणिस्तान, सीरिया या देशात अजूनही पोलिओचे रुग्ण आढळून येतात. या देशातूनही पोलिओ लवकरच हद्दपार होईल आणि जग लवकरच पोलिओमुक्त होईल अशी आशा करूया.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# पंडित बच्छराज व्यास चौकातील 'दिवाळी पहाट'ला रसिकांचा भरघोस प्रतिसाद

**नागपूर, २३ ऑक्टोबर :** बडकस चौक मित्र परिवार, संती गणेशोत्सव मंडळ, दक्षिणामुर्ती गणेशोत्सव मंडळ, पं. बच्छराज व्यास स्मृती प्रतिष्ठान, सुवर्ण महिला नागरी सहकारी पतसंस्था व आसरे ज्वेलर्स यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर शहरातील सुप्रसिद्ध गायक व वादक कलाकार प्रस्तुत दिवाळी पहाट २०२५ हा हिंदी-मराठी बहारदार गीतांचा कार्यक्रम बुधवार, दि. २२ ऑक्टोबर २०२५ला पहाटे ५.३० वा. महाल भागातील पं. बच्छराज व्यास चौक (बडकस चौक) महाल, नागपूर येथे आयोजित करण्यात आला होता. परिसरातील सर्व नागरिकांनी दिवाळीच्या दिवशी एकत्र येऊन एकमेकांना दिपावली या पावन पर्वाच्या शुभेच्छा द्याव्यात व सर्वांमध्ये एकोप्याचा समन्वय घडावा असा अभिनव उद्देश ठेवून या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आयोजनाचे हे सलग बारावे वर्ष होते. या कार्यक्रमाला रा. स्व. संघाचे प्रफुल्ल आकांत, मोहिते नगरसंघचालक सुधीर दप्तरी, आमदार प्रविण दटके, माजी आमदार विकास कुंभारे, माजी आमदार गिरीष व्यास, मिलिंद जोशी, राहुल आसरे, डॉ. राजेश मुरकुटे, प्रकाश बेतावार, प्रमोद जोशी, बंडु राऊत, संजय चिंचोले, श्रीकांत आगलावे, अनिल देव, श्रद्धा पाठक इत्यादी उपस्थित होते.




सुरुवातीला पाहुण्यांचे हस्ते दिपप्रज्वलन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. मुकुल पांडे यांनी गायलेल्या हृदयाच्या तालावर नाचे गणेशु या भक्तीगीताने कार्यक्रमाची सुरवात झाली आणि रसिकांची गर्दी वाढू लागली, परिसर फुलुन गेला. आयोजकांतर्फे सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले तसेच प्रविण दटके यांचा सत्कार सुद्धा करण्यात आला.

सलग तीन तास सुरू असलेल्या कार्यक्रमात विनोद वख्रे, अमर कुळकर्णी, सुरभी ढोमणे, मुकुल पांडे, अनुजा साबजी या सर्वांनी आपल्या सुमधुर आवाजात विविध लोकप्रिय हिंदी-मराठी गीते सादर केली. वाद्यवृंद मध्ये सचिन ढोमणे, पवन मानवटकर, शिवलाल यादव, मनोज विश्वकर्मा, मोरेश्वर दहासहस्त्र, राहुल मानेकर, रवी सातफळे, विशाल दहासहस्त्र यांनी साथ संगत केली. कार्यक्रमाचे सुरेल निवेदन विनय मोडक यांनी केले. ध्वनी व्यवस्था रिषभ ढोमणे यांची होती. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी बडकस चौक मित्र परिवार, सुवर्ण महिला नागरी पतसहकारी संस्था, पं. बच्छराज व्यास स्मृती प्रतिष्ठान, मैत्री परिवार संस्था, राष्ट्रीय वाचनालय, राम भंडार, आसरे ज्वेलर्स, नेचर अँण्ड कल्चर व इत्यादी संस्थांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय चिंचोले, सौ. श्रध्दा पाठक, श्रीकांत आगलावे, अनिल देव, कुणाल गडेकर, पप्पु पानसे, राहुल आसरे, राहुल गुप्ता, विवेक घाक्रस, रवि वडयाळकर, अथर्व त्रिवेदी, महेश नाखले, अखिलेश जाधव, मंगेश वडयाळकर, राजू पत्राळे, श्रीकांत गाढवे, राहुल साऊरकर, सतिश भारत, विनोद कुळकर्णी, सुनिल गाढवे, जयंत पाध्ये, नचिकेत व्यास, सुबोध आचार्य, रवि रेवतकर, राहुल साऊरकर, नरेश आगलावे, ईश्वर खोब्रागडे, अमोल काटे, श्रीपाद नेवासेकर, योगेश क्षीरसागर, दिनेश चावरे, संजय सुंभाटे, प्रशांत चिंचोले, अनघा पेंडके, माधुरी मांजरे, इ. नी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन श्रध्दा पाठक यांनी केले.

# ५० वे राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा-प्रदर्शन आणि परीक्षण

## दिवाळी अंक संपादक-प्रकाशकांना आवाहन ......

**मुंबई, २३ ऑक्टोबर :** १९४९ पासून अनेक उपक्रम आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून सातत्याने कार्यरत असलेल्या आणि वृत्तपत्र लेखन चळवळ यंदा ७६ वर्ष साजरे करीत आहे. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही ५० वी राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. संस्थेच्या वतीने १९७६ पासून मराठी भाषेची वैभवशाली दिवाळी अंक प्रदर्शन परंपरा जपली जाते आहे. या उपक्रमात गोरेगाव येथील मराठी विचारधारा प्रतिष्ठान हे संस्थेचे दरवर्षी प्रमाणे सहभागी होत आहे. या मान्यताप्राप्त आणि लोकप्रिय स्पर्धेसाठी महाराष्ट्रासह इतर राज्यांतूनही अंक येत असतात. सर्वोत्कृष्ट अंकासाठी मनोरंजनकार का र मित्र स्मृती पुरस्कार तर आवाजकार मधुकर पाटकर पुरस्कृत सर्वोत्कृष्ट विनोदी अंक, साने गुरुजी स्मृती सर्वोत्कृष्ट मुलांचा अंक, सर्वोत्कृष्ट धार्मिक अंक, मराठी विचारधारा प्रतिष्ठान पुरस्कृत वसंतराव होशिंग स्मृती महिला संपादित सर्वोत्कृष्ट अंक, कृष्णराव भाजुसे स्मृती उत्कृष्ट दिवाळी अंक, पास्कोल लोबो पुरस्कृत गणेश केळकर स्मृती उत्कृष्ट अंक, मनोहरपंत चिवटे स्मृती सर्वोत्कृष्ट आरोग्य विषयक अंक यासह स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या अंकांचा



उत्कृष्ट आणि उल्लेखनीय अंक म्हणून पारितोषिक देऊन मराठी भाषा दिन २७ फेब्रुवारी रोजी मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत गौरव करण्यात येतो. स्पर्धा व प्रदर्शनासाठी आलेले हे अंक मुंबई-ठाणे शहरात प्रदर्शन आयोजित करून मांडले जातात. #सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त यावर्षी जागल्यांचा लोकजागर, या ब्लॉगवरून दिवाळी अंकांचे परीक्षण प्रसिद्ध करण्यात येणार आहे तसेच गेल्या ५० वर्षातील यावर्षापर्यंत प्रकाशित झालेल्या दिवाळी अंकांची संपर्क सूची मराठी भाषा दिवस साजरा करताना प्रकाशित करण्यात येणार आहे, हे अंक ग्रामीण भागातील शाळा-वाचनालयांना मोफत दिले जातात. दिवाळी अंकांच्या संपादक-प्रकाशकांनी २ प्रती - रवींद्र मालुसरे, अध्यक्ष-मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, घरकुल सोसायटी, रूम न. ६१२, ६ वा मजला, सेंच्युरी बाजार लेन, भुस्सा इंड. समोर, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५ येथे पाठवाव्यात. असे आवाहन प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगावकर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी रवींद्र मालुसरे ९३२३११७७०४ आणि सुनील कुवरे ९१६७३६४७६० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## जातीचे राजकारण

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने जातीपातीमुळे पुढील शंभर ते दीडशे वर्षांत भारतातून हिंदू धर्माचे अस्तित्व नष्ट होऊ शकते अशी भीती व्यक्त केली मात्र यावर देश पातळीवर किंवा हिंदुनिष्ठ पक्ष, संघटना यात कुठेही चर्चा करतांना दिसून येत नाही वास्तूतः देशासाठी जात-पात आवश्यक आहे असे सुचित केले जात आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जात-पात मानत नाही तरीही त्याच्यावर ब्राह्मणी संघटना म्हणून टीका केली जाते. देशात जातीपातीच्या राजकारणाखेरीज राजकारण होऊ शकत नाही अशी स्थिती आहे याचमुळे भारताची परमावधीची अधोगती झाली आहे असे दिसून येते. भारत पारतंत्र्यात जाण्याला ही जात एक प्रमुख कारण होते. सर्वाधिक धर्मांतरही जातीपातीमुळेच होते. हिंदू धर्मात जात-पात नव्हती केवळ ईश्वर निर्मित वर्णव्यवस्था होती. यात कुणीही उच्च किंवा नीच असे नव्हते, अस्पृश्यही नव्हते. त्यामुळे जात ही संकल्पना चुकीची आहे. वर्णव्यवस्थेतून पुढे स्वार्थी लोकांमुळे तसेच भारतावर परकीय आक्रमणामुळे जात-पात चालू झाली आणि त्याला पुढे खतपाणी घातले गेले. ब्रिटिशांनी जातीच्या आधारावर भारतीय समाजाला विभाजित करण्यासाठी पुरेपूर वापर केला आणि त्याची फळे ब्रिटिश भारतातून गेल्यानंतरही भोगावे लागत आहे. देशात स्वातंत्र्यापासून आरक्षण ही जातीच्या आधारावर दिले जाते. त्यालाच सर्वांची कालमर्यादा होती पण राजकारण्यांमुळे ती आजही चालू ठेवण्यात आली आहे. आता जात जनगणना केली जात आहे म्हणजे जेथे जात नष्ट करायला हवी होती तेथे प्रत्येक जात मोजली जाणार आहे ही प्रगती म्हणायची का? छत्रपती शिवाजी महाराजांनी जातीपातीला महत्त्व दिले नव्हते त्यांचे राज्य मराठ्यांचे नव्हते तर हिंदवी म्हणजे हिंदूंचे होते. जातीविरुद्ध जाऊन वर्णाश्रमव्यवस्थेविषयी बोलायला गेला तर त्याला मनुवादी म्हणून हिणवले जाते. वर्णाश्रम व्यवस्था काय आहे हेही समजून घेण्याचा प्रयत्न केला जात नाही. ज्यांना ती ठाऊक आहे तेही सोयीस्कर राजकीय स्वार्थापोटी त्याकडे दुर्लक्ष करतात. आज प्रत्येकालाच जात हवी आहे त्यामुळे ती जाता जात नाही. जिहादी आतंकवादी धर्मांध हल्ला करतानाही ते जात पाहत नाही तर हिंदू म्हणून पाहतात आणि आक्रमण करतात. लव जिहाद च्या घटनांमध्ये अनेक दलित तरुणींची फसवणूक करण्यात येते ती दलित म्हणून नव्हे तर हिंदू म्हणून करण्यात आली. जातीपातीचा हाही भाग समजून घेणे आवश्यक आहे त्यामुळे जात-पात नष्ट करण्यासाठी आता पुढाकार कोण घेणार हा प्रश्न आहे कारण हे मोठे शिवधनुष्य आहे त्यामुळे कुणीही ते पेलण्यासाठी पुढे येत नाही अशी वस्तुस्थिती आहे. संघटना आणि पक्ष यांच्या मर्यादा लक्षात घेता जातिपातीचे निवारण करण्यासाठीच आता सर्वांनीच पुढाकार घेऊन समाजात गेले पाहिजे व जनजागृती केली पाहिजे. त्याचवेळी सरकारी स्तरावरूनही जातीला दूर करता येईल ते केले पाहिजे. आरक्षण संपवणे आवश्यक आहे असे कोणी म्हटले तर देशात हिंसाचार होण्याची स्थिती निर्माण होऊ शकते त्यामुळे जातीवर आरक्षण न देता त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर आरक्षण देणे आणि सरसकट सर्वांनाच शिक्षणात मदत केली तर जातीवर आधारित आरक्षण किंवा जनगणना हे मुद्दे दूर होऊ शकतात त्यासाठीच सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यकच आहे.

**लीना मकरंद गाडगीळ, पनवेल**

# भारतातील पहिला डेटा सेंटर आयपीओ सिफी इन्फिनिटचा ३७०० कोटी रु. च्या आयपीओ साठी अर्ज सादर

**मुंबई, २३ ऑक्टोबर :** माहिती तंत्रज्ञान क्षमतेच्या दृष्टीने ३१ मार्च २०२५ पर्यंत 1Lattice आणि सी अँड डब्ल्यू अहवालानुसार भारतातील अग्रगण्य डेटा सेंटर कोलोकेशन सेवा पुरवठादारांपैकी एक सिफी इन्फिनिट स्पेसेस लिमिटेडने भारतीय सिक्युरिटीज आणि एक्स्चेंज बोर्ड (सेबी) कडे आपला ड्राफ्ट रेड हेअरिंग प्रोस्पेक्टस (डीआरएचपी) सादर केला आहे.

कंपनीच्या प्राथमिक समभाग विक्री प्रस्तावात २,५०० कोटी रु. पर्यंतच्या इक्विटी शेअर्सचे फ्रेश इश्यू आणि कोटक डेटा सेंटर फंड (६४३ कोटी रु.) आणि कोटक स्पेशल सिच्युएशन फंड (५५७ कोटी रु.) या विक्री करणाऱ्या समभागधारकांकडून १,२०० कोटी रु. पर्यंतच्या इक्विटी शेअर्सची ऑफर फॉर सेल यांचा समावेश आहे.

लागू असलेल्या कायद्यांनुसार, रेड हेअरिंग प्रोस्पेक्टस कंपनी रजिस्ट्रारकडे दाखल करण्यापूर्वी बुक रनिंग लीड मॅनेजर्स यांच्या सल्लामसलतीनुसार सिफी इन्फिनिट स्पेसेस ५०० कोटी रु. पर्यंतच्या आयपीओ पूर्व प्लेसमेंटचा विचार करू शकते. जर अशी प्री आयपीओ प्लेसमेंट करण्यात आली, तर त्यातून उभारलेली रक्कम फ्रेश इश्यू साईज मधून कमी केली जाईल.

कंपनी फ्रेश इश्यू मधून मिळालेल्या निव्वळ उत्पन्नाचा वापर पुढीलप्रमाणे करणार आहे: चेन्नई ०२ डेटा सेंटरमधील टॉवर बी च्या पूर्णतेसाठी आणि नवी मुंबईतील रबाळे डेटा सेंटरमधील टॉवर्स ११ आणि १२ च्या बांधकामासाठी अनुक्रमे ४६५ कोटी रु. आणि ८६० कोटी रु. इतक्या भांडवली खर्चाच्या अंशतः वित्तपुरवठ्यासाठी. या उत्पन्नातील काही भाग ६०० कोटी रु. च्या कर्ज परतफेडीसाठी वापरला जाईल, तर उर्वरित रक्कम सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्देशांसाठी वापरली जाईल.

१९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात खासगी इंटरनेट सेवा सुरू केलेला सिफी ग्रुपचा एक भाग आणि सिफी टेक्नॉलॉजीजद्वारे प्रवर्तित सिफी इन्फिनिट स्पेसेस ही भारतातील अग्रगण्य डेटा सेंटर इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी असून कोलोकेशन, इंटरकनेक्शन, बिल्ड-टू-सूट आणि व्हॅल्यू डेड सेवा आपल्या राष्ट्रीय नेटवर्कवर सादर करते.

ग्रुपच्या नेटवर्क, डेटा सेंटर आणि डिजिटल सेवांमधील ३ दशकांच्या अनुभवाचा लाभ घेत, कंपनी ग्राहकांच्या गरजेनुसार सुरक्षित, शाश्वत आणि ऊर्जा-कार्यक्षम डिजिटल पायाभूत उपाय सुविधा पुरवते. ३१ मार्च २०२५ पर्यंत, भारतातील बिल्ट क्षमतेनुसार कंपनीचा बाजारातील वाटा १५.२६% इतका होता.

## राशीभविष्य

**मेष :** कौटुंबिक जीवनात सुसंवाद साधाल, ज्यामुळे मानसिक शांतता लाभेल. आपले आणि परके यांची जाणीव होईल, लहान-मोठे आर्थिक व्यवहार करताना विशेष सावधानता बाळगा.

**वृषभ :** आज नवीन उत्साह, ऊर्जा आणि आनंद अनुभवायला मिळेल. आर्थिक बाजू मजबूत होईल. अनपेक्षित धनलाभ होण्याची शक्यता आहे. तुमच्या ध्येयानुसार जीवनात नवीन मार्ग सापडतील.

**मिथुन :** अनेकांचे सहकार्य मिळाल्याने आज तुम्ही सहजपणे पुढे जाल. ठरवलेल्या गाठीभेटी आणि महत्त्वाचे निर्णय मार्गी लागतील. तुमची आर्थिक बाजू बळकट होईल. दिवस उत्तम आहे.

**कर्क :** आज कामात अधिक ताण जाणवेल. पण कुटुंबाची चांगली साथ मिळेल. नोकरीत बढती मिळण्याची शक्यता आहे. उत्तम प्रगतीचे योग आहेत. कौटुंबिक जीवनात सुसंवाद साधाल.

**सिंह :** आज मान-सन्मान आणि प्रतिष्ठा वाढेल. नोकरीत वरिष्ठांची विशेष मर्जी तुमच्यावर राहील. आत्मविश्वासाने काम पूर्ण करा, ज्यामुळे अपेक्षित यश मिळेल. कुटुंबात सुख-शांती नांदेल.

**कन्या :** सरकारी कामात यश मिळेल. धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हाल. आरोग्य चांगले राहील, स्वत:साठी वेळ काढून महत्त्वाचे निर्णय घ्या. मानसिक शांतता लाभेल. आध्यात्मिक प्रगती साधाल.

**तूळ :** आज तुम्हाला कामात अधिक ताण जाणवेल, पण कुटुंबाची चांगली साथ मिळेल. नोकरीत बढती मिळण्याची शक्यता असून, उत्तम प्रगतीचे योग आहेत. उधार दिलेले पैसे परत मिळाल्याने चिंता दूर होतील.

**वृश्चिक :** आज कामाचा काहीसा तणाव जाणवेल. आयुष्यातील अडचणींमुळे तुमचे मन अध्यात्माकडे वळेल. वस्तू गहाळ होणार नाहीत, याची दक्षता घ्या आणि काळजी घ्या.


**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य राहील. तुमच्या मनात प्रेम आणि सहकार्याची भावना राहील. जुन्या मित्राला भेटल्याने आनंद होईल. सरकारी कामात निष्काळजीपणा टाळा. तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवा.

**मकर :** मौजमजेच्या वस्तूंवर जास्त खर्च होऊ शकतो. ज्यामुळे भविष्यात समस्या येऊ शकते. तुमच्या उत्पन्नाचा विचार करूनच खर्च करा. तुम्ही घेतलेल्या चांगल्या निर्णयामुळे आज यश मिळण्याचे योग आहेत.

**कुंभ :** रखडलेली आणि जुनी कामे मार्गी लागतील. ज्यामुळे मोठा दिलासा मिळेल. शेती किंवा व्यवसायात नवीन कल्पनांना यश मिळण्याची शक्यता आहे. तुम्ही कुटुंबियांसोबत जास्त वेळ घालवाल.

**मीन :** नकारात्मकता बाजूला सारून फक्त महत्त्वाच्या कामावर लक्ष केंद्रित करा. कामानिमित्त प्रवास होण्याची शक्यता आहे, खर्चावर नियंत्रण ठेवा. आपले आणि परके यांची जाणीव होईल,

# शब्दकोडे क्रमांक २२४६



**उभे शब्द :-**


१) परिस्थिती कधीही सारखी नसते या अर्थाची एक म्हण
२) अपशकुन स्वत:बद्दलची कमीपणाची भावना
४) फाजील सलगी, लघळपणा
५) मातीचा कण
६) कळलाव्या मुनी
७) कपड्याचा काठाला लावलेली चुणीदार पट्टी
८) नाशिवंत
११) श्रीविष्णूचे एक नाव
१२) खाळ
१४) चिखल
१६) आश्चर्यचकीत करणारी गोष्ट
१८) बालवयात शौर्य गाजविणारा
१९) ताकद, शक्ती, बळ
२१) इमारतीचा मूळ आधार
२३) लबाडीचा हेतू
२६) उगाच, अकारण
२७) कोवळ्या दुधाचा (चिकाचा) पदार्थ
२९) लाजणारा
३०) पुष्कळ
३३) पचविणे, जठराग्नी
३५) चंचल, पातळ, क्षणिक
३६) मीठ
३८) तारणारा
३९) खराब
४०) समतल
४२) दोरा
४३) म्हातारपण
४४) गंध
४५) विरोध, प्रतिबंध
४६) उत्तराधिकारी
४९) मार्ग, रस्ता
५१) धोबी
५३) खोडण्याचे साधन
५५) चांदी
५६) मनावर ठेवलेला ताबा
५९) नोकर
६०) पडदा
६१) प्रजा, रयत
६२) लमाण, तांड्यातील माणूस
६३) किंमत
६५) पानांसह कोवळी फांदी
६६) रात्रभर
६९) पिकांवरील एक रोग
७०) त्या प्रमाणे
७२) आयुष्य
७४) अंगातील मस्ती, जोम
७६) छाती

(उत्तर उद्याच्या अंकात)

**आडवे शब्द :-**

१) वाईट कृत्य केले नसल्यास भिण्याचे कारण नाही या अर्थाची म्हण
८) माफ
९) हजार किलो
१०) सोन्याचा धागा
११) श्रीमंत
१३) एक शिरोभूषण, गुच्छ
१५) लांबसडक नकली केस
१७) च्या आड लपून बसणे
२०) घरे वगैरे पाडण्याची क्रिया
२२) पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
२४) बारीक केस
२५) जळजळीत, उग्र
२८) भांडणे लावण्याचा एक प्रकार
३०) घटस्फोट
३१) विळखा, मिठी
३२) पलंग
३४) करारातील अटीची भाषा
३७) भाषण, उक्ती
३९) लाकूड छिलण्याचे हत्यार
४१) खात्यावर आणणे वा परतफेडीच्या बोलीवर माल आणणे
४५) मिठाई तयार करणारा
४७) घोडे बांधण्याची जागा
४८) उत्सवाचे दिवस
५०) पाणी उकळताना होणारा आवाज
५२) श्रेष्ठ पुरुष
५४) सोन्याची शाई
५७) ऐतिहासिक गद्य लिखाण
५८) दालचिनी
५९) चक्र
६०) नावाचा जयघोष
६४) थेट, सरळ
६७) वांती
६८) एक पालेभाजी
७१) जय पराजय
७३) श्रीमंत, दैववान
७५) निमगोरी
७७) व्रत
७८) शरीर
७९) पोलीस
८०) काळ्या तोंडाचे माकड

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# क्रांतिकारी स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून काळी दिवाळी

■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. २२ :**
सरसकट कर्जमाफी, अतिवृष्टीची भरीव तातडीने मदत मिळावी, हमीभावाप्रमाणे संपूर्ण शेतमाल खरेदी करणे, यासह अन्य मागण्यांसाठी क्रांतिकारी स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून काळी दिवाळी साजरी करण्यात आली. सरकारचा शेतकरी धोरणाचा निषेध करीत संघटनेचे पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी थेट बाजारपेठेतच धाव घेत नागरिकांशी संवाद साधला.

निसर्गाच्या लहरीपणामुळे सततची नापिकी, घटते उत्पादन व वाढता उत्पादन खर्च , खासगी सावकार, वित्तीय संस्था, बँकेकडून घेतलेले कर्ज यासह इतर कारणांमुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. गतवर्षी प्रमाणे यंदाही अतिवृष्टीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले परिणामी शेतमालाचे उत्पादन प्रचंड घटले असून, शेतमालाला भावही योग्य मिळत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर वाढतच असून, तो आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहे. दरम्यान यंदा तर सरसकट कर्जमाफिसह अन्य उपाय योजन करणे आवश्यक असून, यासाठी दिवाळीच्या दिवशी क्रांतिकारी शेतकरी संघटनेने काळी दिवाळी आंदोलन करीत सरकारचा निषेध नोंदवला.

कार्यकर्त्यांनी बाजारपेठेत धाव घेत आंदोलन करीत सरकारचा निषेध नोंदवला. आंदोलनात जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर गवळी, अकोला तालुका अध्यक्ष मंगेश गावंडे, सुनील इंगळे यांनी आदी सहभागी झाले. काही दिवसांपूर्वी सरकारने शेतीचे नुकसान व पूरग्रस्तांसाठी पॅकेज जाहीर केले.

मात्र राज्य सरकारने जाहीर केलेले ३६ हजार ५०० कोटींचे कृषी पॅकेज पूर्णपणे खोटे आणि दिशाभूल करणारे आहे, असा आरोप शेतकरी चळवळीत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा आहे. ही मदत प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. अतिवृष्टी आणि नैसर्गिक


शेतकरी धोरणाचा निषेध

आपत्तीमुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने योग्य भरपाई देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

असे केले आंदोलन क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी गांधी रोडवर धाव घेतली. अंगात फलक घातले.

यावर शेतकऱ्यांची सुरु असलेल्या लुटीचा पाढाच वाचण्यात आला. सरकार, व्यापारी यांची भूमिका शेतकरी विरोधी कशी आहे, हे सांगण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच सोबत सोयाबीन व अन्य कडधान्यही घेतले.

शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याचे म्हणत पदाधिकाऱ्यांनी सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदवला. अनोख्या पद्धतीने केलेल्या आंदोलनाने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. दिवाळीच्या खरेदीसाठी गर्दी केलेल्या नागरिकांपर्यंत पदाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांची व्यथा पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी गांधी रोडसह अन्य ठिकाणी नागरिकांशी संवाद साधला. यातून काही शेतकरी, शेतमंजुरही होते. बाजारात सोयाबीनला योग्य भाव मिळत नाही. काही ठिकाणी तीन ते साडेतीन हजार क्विंटलचा दर मिळतो. उत्पादन खर्च व उत्पन्न, याचे गणितच जुळत नाही. यंदा पीकासाठीचा खर्चही निघालेला नाही.

वर्षभर संसारासाठी लागणारा पैसा कोठून आणावा, असे प्रश्न पडल्याचे शेतकरी म्हणाले. क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्यावतीने गांधी रोड येथे सोयाबीन, मुग, उडीद विक्री करून सरकारच्या विरोधात काळी दिवाळी साजरी करीत पुढील मुद्दांवर आंदोलन केले. सरकार, व्यापारी यांची भूमिका कशी शेतकरी विरोधी आहे, हे त्यांनी मांडले.

# वृद्धाश्रमात समाज भान मिशनचा सेवा उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी,
**आर्णी, दि. २३ :**
वृद्ध, अंध, अपंग, निराधार, मनोरुग्ण व निराश्रित लोकांची नि:स्पृह मनाने सेवा करणे हे मानवी जीवनातील सर्वोच्च कर्म आहे. मग ती सेवा कोणत्याही प्रकारची असो, ती निरागस, नि:स्वार्थ असावी. तिला जराही स्वार्थाचा वा लाभाचा दुर्गंध नसावा. आपण अशा वृद्धांमध्ये माय बापाचे रूप पाहावे, अशी मानव सेवा हीच परमेश्वर सेवा होय. संत तुकारामांनी रंजल्या गांजल्यांची सेवा करणाऱ्याला देव म्हटले आहे. सेवा परमो धर्म: याचा ही हाच अर्थ आहे. हे असे निष्काम सेवाव्रत ज्याला साधले तो महापुरुष होतो. तो मानव सेवेत देवाचे रूप पाहतो. अशी नि:स्वार्थ सेवा हे परम श्रेष्ठ जीवनमूल्य होय, असे प्रतिपादन समाजसेवक प्रा. डॉ. बाळकृष्ण सरकटे यांनी केले.

आर्णी येथील मातोश्री सुशीलाबाई नागपूरे वृद्धाश्रमात यवतमाळ येथील समाज भान मिशनने घेतलेल्या सेवा उपक्रमात ते मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

याप्रसंगी विचार मंचावर वृद्धाश्रमाचे



व्यवस्थापक मारोतराव नागपुरे, गंगशेट्टीवार, प्रा. अमित बागडे, विनायक गंगशेट्टीवार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी निर्मोही संत गाडगेबाबांच्या प्रतिमेला हारार्पण व प्रतिमेचे पूजन मान्यवराच्या हस्ते करण्यात आले. ५० ब्लँकेट व खाऊ वाटपाच्या या मुख्य कार्यक्रमानंतर वृद्ध नागरिकांच्या दु:खावर फुंकर म्हणून विनय मिरासे यांनी याप्रसंगी त्यांच्या विनोदी शैलीतून विविध कौटुंबिक, सामाजिक आशयाची गीते सादर केली.

त्यांच्या या गीत गायनाने वृद्ध मंत्रमुग्ध झाले व उपस्थितांनी दाद दिली. मातोश्री सुशीलाबाई नागपुरे वृद्धाश्रमाचे संस्थापक, संचालक खुशालराव नागपुरे यांनी आभार प्रदर्शन केले. समारोपीय कार्यक्रमात वृद्धांच्या व्यथा त्यांच्या जीवनातील घटना-प्रसंग सांगितले. कार्यक्रमाला वृद्धांची व परिसरातील बहुसंख्य नागरिकांची उपस्थिती होती.

आई-वडील हेच खरे आपले परमेश्वर असतात याप्रसंगी गंगशेट्टीवार म्हणाले की, आई वडील हेच खरे परमेश्वर असतात. त्यामुळे माय बापाची व इतर वृद्ध व्यक्तींची सेवा ही परमेश्वराची पूजा व खरी भक्ती आहे असे सांगितले. प्रा. अमित बागडे यांनी याप्रसंगी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन समाज भान मिशनचे सचिव विनय मिरासे यांनी केले. समाजभानच्या कार्यकर्त्यांनी याप्रसंगी वृद्धाश्रमाची पाहणी करून वृद्धांना भावनिक व मानसिक आधार दिला.

## श्री बालाजी यात्रोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद



■ महासागर प्रतिनिधी
**वाशीम , दि. २३ :**
शहरातील पारंपरिक आणि ऐतिहासिक असा बालासाहेब यात्रोत्सव यंदाही उत्साहात सुरू झाला असून, रविवारी यात्रेला वाशीमकरांचा प्रचंड उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

श्री बालाजी मंदिर परिसर भक्त, व्यापारी आणि नागरिकांच्या गर्दीने फुलून गेला आहे. यात्रेच्या प्रारंभानिमित्त बालाजी मंदिरात सकाळी विशेष पूजा आणि आरती करण्यात आली. त्यानंतर यात्रेचा प्रारंभ होताच मंदिर परिसरात विविध दुकाने, फूड स्टॉल, खेळणी, पूजावस्तू आणि श्रृंगार साहित्य विक्रीसाठी दुकाने उभारण्यात आली. शहरातील तसेच ग्रामीण भागातील नागरिकांनी दर्शनासाठी आणि खरेदीसाठी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. बालासाहेब यात्रोत्सव हा वाशीमच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. यात्रेच्या निमित्ताने मंदिर परिसर रंगीबेरंगी सजावटीने सजवण्यात आला असून, रात्रीच्या प्रकाशयोजनेने परिसर अधिकच उजळून निघाला आहे. लहान मुलांसाठी खेळणी आणि झोपाळ्यांचे स्टॉल, महिलांसाठी श्रृंगार आणि वस्त्रविक्रीची दुकाने, तसेच खाद्यपदार्थांच्या स्टॉलवर मोठी गर्दी दिसत आहे.

नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिस प्रशासनाने विशेष बंदोबस्त ठेवला आहे. नगरपरिषदेने स्वच्छता आणि वाहतूक व्यवस्थेची योग्य सोय केली आहे. यात्रेचा उत्साह येत्या काही दिवसांत आणखी वाढेल, असा अंदाज व्यक्त केला जात असून, बालाजी मंदिर परिसरात दररोज भाविक दर्शनासाठी येत आहेत. धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा हा यात्रोत्सव वाशीमच्या उत्सवी परंपरेचे प्रतीक ठरत आहे.

## खच पडलेल्या झेंडूच्या फुलांना मिळाले डंपिंग ग्राउंड

■ महासागर प्रतिनिधी
**बुलडाणा, दि. २३ :**
झेंडूच्या फुलांना महागडे स्वरुप प्राप्त होवो अथवा ना होवो, दिवाळी दसरा संपला की, या फुलांचे गंज शहरातील चौकाचौकात दिसून येतात. अखेर हा फुलांचा खच डंपिंग ग्राऊंडची शोभा वाढवण्याचे काम करत असल्याचे दिसून येते. लाखोंची उलाढाल केल्यानंतर या फुलांचे असे हाल होतात.

बुलडाणा शहरात जाफ्राबाद व लगतच्या गावांमधून झेंडूच्या फुलांची आवक यंदाच्या दिवाळी महोत्सवावर झाली होती. २० ऑक्टोबरच्या रात्री शहरातील विविध चौकात झेंडू विक्रीची दुकाने लागायला सुरुवात झाली होती. अनब रात्रीही फुलांची आवक सुरुच होती. जवळपास १०० क्विंटल फुले बाजारात आली अनब रात्री व सोमवारी सकाळी ग्राहकांच्या पसंतीस उतरत होती. कोणी झेंडूच्या फुलांचे हार खरेदी केले कोणी फुलांनाच पसंती दर्शवत घरी जाऊन हार केले.

आपल्या दुचाकी, चार चाकींना हार घातले. अशी खरेदी करत जवळपास ५० ते ६० क्विंटल फुलांची विक्री बुलडाणा शहरात झाली. लगतच्या गावांमध्येही



बुलडाण्यातुनच खरेदी झाली. ६९ हजार लोक कुटुंबासह बुलडाणा शहरात राहतात.

त्यातील बहुतांश किमान ४० हजार नागरिकांनी या फुलांची खरेदी कमी अधिक प्रमाणात केली. त्यामुळे ग्रामीण भागातून शेतकऱ्यांनी आणलेल्या फुलांची खरेदी झाली. व्यापाऱ्यांनीही माल खरेदी केला. परंत, या फुलांना वीस रुपये किलो दराने भाव मिळाल्याने जाफराबाद येथील शेतकऱ्यांनी सांगितला.

कचराकुंडीत झेंडूची फुले गोळा करणे सुरू दोन दिवस बुलडाणेकरांच्या नजरेत भरणारी झेंडूची फुले मंगळवार दुपार पासून चौका चौकाची शोभा वाढवत आपला सुगंध पसरवत होते.ही फुले चौकाची शोभा वाढवत होते.

मात्र मोकाट जनावरांनीही या फुलांना वेळ निघून गेल्यानंतर हुंगले नाही. आज नगर पालिकेच्या बंद असलेल्या कचरा गाड्यांना फुलांचा कचरा गोळा करण्यासाठी शहरात पाठविण्यात आले होते.

काही ठिकाणचा फुलांचा कचरा उचलल्यानंतर काही ठिकाणी हा कचरा तासांचा उरला होता.

## चांदीच्या नाण्याला ग्राहकांची पसंती

**बुलडाणा :** चांदी, सोन्याचे भाव मागील काही महिन्यांपासून पार गगणाला भिडले आहेत. तरीही याची मागणी काही कमी होताना दिसत नाही. चांदीचा भाव वर्षभरात १३० टक्के वाढल्याने आता ग्राहकांचा कल चांदीच्या विटा येवजी चांदीच्या नाण्याकडे वळल्याचे चित्र आहे. गेल्या काही दिवसांत चांदीच्या दराने मोठी उसळी घेतली आहे.

परंपरेनुसार लक्ष्मीपूजनाला पूजेत चांदीच्या विटा ठेवल्या जातात. परंतु सातत्याने वाढते दर पाहता आता ग्राहकांचा कल लक्ष्मी, गणेशाच्या मूर्ती किंवा नाणी मिळवण्याकडे वळला आहे.

लक्ष्मीपूजन आणि गुंतवणुकीसाठी चांदी खरेदी करणाऱ्या ग्राहकांची गर्दी दिवसेंदिवस वाढते आहे.

याच कारणांनी विक्रेत्यांकडे चांदीचे नाणी, बार्स, लक्ष्मी, गणेश मूर्ती यांची आता टंचाई जाणवू लागली आहे. यावर्षी १९ जानेवारी ते १९ ऑक्टोबर या दरम्यान २४ कॅरेट सोन्याचे दर ३८ हजार आणि प्रति किलो चांदीचे भाव ७९,६०० रुपयांनी वाढले आहे.

# प्राथमिक व माध्यमिक
## शिष्यवृत्ती परीक्षेचे नाव बदलले



■ महासागर प्रतिनिधी
**बुलडाणा, दि. २३ :**
राज्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी घेतली जाणारी शिष्यवृत्ती परीक्षा आता चौथी आणि सातवी इयत्तेसाठी होणार आहे. शासनाने पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा स्तर पाचवी आणि आठवी वरून अनुक्रमे चौथी -आणि सातवी वर नेण्यास मान्यता दिली असून, हा बदल शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ पासून लागू होणार आहे. तसेच पात्र विद्यार्थांना वर्षाला सुमारे ७,५०० रुपये मिळणार आहे. सदर नव्या निकषामुळे वर्ष २०२५ - २६ मध्ये पाचवी आणि आठवी इयत्तांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाईल. त्यानंतर चौथी आणि सातवी इयत्तांतील विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा नियमितपणे होणार आहे. या परीक्षांचे नाव बदलण्यात आले असून आता ''पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा'' आणि ''पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा ऐवजी अनुक्रमे ''प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (चौथी)'' आणि ''उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (सातवी)'' अशी नावे वापरण्यात येणार आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागातील होतकरू, प्रज्ञावान आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी १९५४-५ पासून ही योजना सुरू आहे. २०१५ मध्ये शिष्यवृत्तीचा स्तर चौथी वरून आहेत. पाचवी आणि सातवी वरून आठवी केल्यानंतर विद्यार्थ्यांचा सहभाग लक्षणीय घटल्याचे शिक्षण विभागाच्या अहवालात नमूद केले होते. त्यामुळे पुन्हा चौथी आणि सातवीत परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे स्थानिक स्वराज संस्थांच्या ग्रामीण भागाच्या शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढवण्यास मदत मिळणार आहे. सरकारी शाळा मधील विद्यार्थी या जाती-जमाती आणि दिव्यांगांसाठी १२५ परीक्षेस पात्र राहील.

सीबीएसई, रुपये परीक्षा शुल्क आहे. यंदाच्या आयसीएसई आणि इतर अभ्यासक्रम वर्षापासून याची अंमलबजावणी होणार राबवणाऱ्या शाळांनाही अटींसह सहभागी होता येणार आहे आहे. दिव्यांगासाठी १२५ रुपये परीक्षा शुल्क बिगर मागासवर्गीय विद्यार्थीसाठी २०० रुपये, अनुसूचित जाती जमाती व दिव्यांगासाठी १२५ रुपये परीक्षा शुल्क आहे.

# जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत इंडिपेंडंट क्लब अमरावतीने पटकावले विजेतेपद

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. २३ :**
शहराचा क्रीडानगरी म्हणून नावलौकिक असून विविध क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाकरिताही अमरावती शहराची विशेष ओळख आहे. याच धर्तीवर रॉयल रॉकी क्लब अमरावतीद्वारे नुकतेच तीन दिवसीय जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेचे (सेव्हन ए साइड ) अप्रतिम आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत फूटबॉलचा शानदार थरार रंगला. अंतिम सामना इंडिपेंडंट क्लब अमरावती विरुद्ध स्पोर्टिंग क्लब यवतमाळ यांच्यात खेळाला गेला. उभय संघातील आक्रमक खेळामुळे हा सामना अत्यंत चुरशीचा ठरला.

परंतु, या निर्णायक थरारक सामन्यात इंडिपेंडंट क्लब अमरावतीने २-० अशा फरकाने एकतर्फी विजय मिळवला.



स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या संघाला राष्ट्रवादी युवक काँग्रेस क्रीडा सेल अध्यक्ष सार्थक खोरगडे यांच्याद्वारे ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच अन्य वैयक्तिक पुरस्कारही रॉयल रॉकी क्लब अमरावतीच्या वतीने स्पर्धकांना वितरित करण्यात आले. चपराशीपुरा येथील फ्रायडे मार्केटच्या प्रांगणात आयोजित या स्पर्धेत अमरावती जिल्ह्यातील १० संघ तसेच वर्धा, अकोला, वर्धा, वणी (यवतमाळ), बुलडाणा, वाशीम येथील १६ संघ सहभागी झाले होते.

लहान मोठ्या स्पर्धेतूनच खेळाडू हा आपल्या क्रीडा कौशल्याची चुणूक दाखवत विजेता ठरत असतो. क्रीडा क्षेत्रात पुष्कळ संधी आहेत, त्यामुळे खेळाडूंनी याकडे करियर म्हणून पाहिले पाहिजे, अशा शब्दात राष्ट्रवादी युवक काँग्रेस क्रीडा सेल अध्यक्ष सार्थक खोरगडे यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. या वेळी खेळाडू तसेच क्रीडाप्रेमी प्रामुख्याने उपस्थित होते.

## काँग्रेसचे झुणका, ठेचा, भाकर आंदोलन



■ महासागर प्रतिनिधी
**लोणार, दि. २३ :**
लोणार राज्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडले असताना दिवाळीसारख्या सणाच्या काळात शासनाकडून कर्जमाफी, मदत किंवा दिलासा न मिळाल्याचा आरोप करत काँग्रेसच्या वतीने दि. आंदोलन करण्यात आले.

यावेळी झुणका, ठेचा व भाकर खाऊन राज्य सरकारचा निषेध नोंदवण्यात आला. बस स्थानक चौकात करण्यात आलेल्या या आंदोलनाचे नेतृत्व काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष लक्ष्मणराव घुमरे आणि सरचिटणीस श्याम उमाळकर यांनी केले. याप्रसंगी काँग्रेसचे शहराध्यक्ष शेख समद शेख अहमद, तालुकाध्यक्ष अश्रूजी फुके, जिल्हा सरचिटणीस राजेश मापारी, माजी नगराध्यक्ष भूषण मापारी, जिल्हा सरचिटणीस कलीम खान, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष प्रा. गजानन खरात, माजी सभापती केशवराव फुके, माजी कृषी सभापती नंदकिशोर बोरे, माजी पंचायत समिती सभापती ज्ञानेश्वर चिभडे प्रामुख्याने उपस्थित होते. राज्यातील शेतकरी सध्या आर्थिक संकटात सापडलेले असताना दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळात शासनाकडून कोणतीही कर्जमाफी, मदत किंवा दिलासा मिळाला नसल्याचा आरोप यावेळी पदाधिकाऱ्यांनी केला.

पावसामुळे पिकांचे नुकसान, वाढती कर्जबाजारी स्थिती आणि शेतमालाच्या दरातील घसरण यामुळे शेतकरी मेटाकुटीला आले असून, शासन मात्र उदासीन असल्याचा आरोपही त्यांनी केला. शेतकऱ्यांची काळी दिवाळी या घोषवाक्याखाली करण्यात आलेल्या या आंदोलनात पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी झुणका, ठेचा, भाकर खाऊन राज्य सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदवला. या वेळी आंदोलनात काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष नितीन शिंदे, माजी नगरसेवक संतोष मापारी, सुदन कांबळे, शेख करामत, शेख रऊफ, सतीश राठोड, रमजान परसुवाले, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष विकास मोरे, अन्नू कुरेशी, माजी नगरसेवक गफ्फार कुरेशी, भरत राठोड, एजाज खान, श्याम राऊत, शहर उपाध्यक्ष गजानन मापारी, शेख सज्जाद, शुभम चाटे, दौलत मानकर, प्रदीप संचेती, शंकर कोकाटे आदींनी सहभाग घेतला.

# श्री संत गजानन महाराज मंदिर, भानगाव तिर्थक्षेत्र बेलोरा येथे प्राणप्रतिष्ठा व कळसरोहण सोहळ्याची मंगल सुरुवात

■ महासागर प्रतिनिधी
**बेलोरा, दि. २३ :** येथील श्री संत गजानन महाराज मंदिर येथे आज दिनांक गुरुवार, २३ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू झालेल्या मूर्ती प्राणप्रतिष्ठ व कळसरोहण सोहळ्याची भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली आहे. या सात दिवसीय धार्मिक कार्यक्रमात ह. भ. प. रमेश महाराज अवारे यांच्या उपस्थितीत सार्थ ज्ञानेश्वरी पारायण, तसेच ह. भ. प. सौ. दुर्गाश्री ताई ब्रम्हानंद गिरी (गोस्वामी) (आळंदीकर) यांचे श्रीमदब भागवत कथा सार होणार आहे. गायक म्हणून ह. भ. प. पवन महाराज ढोले, ह. भ. प. रामेश्वर महाराज इंगळे, आणि मृदुंगावर ह. भ. प. हरिदास महाराज भोयर सहभागी होत





आहेत. या पवित्र सोहळ्याचे मुख्य कार्यक्रम २८ व २९ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडणार असून, त्या दिवशी मूर्ती प्राणप्रतिष्ठा, कळसरोहण तसेच होम-हवन विधी संपन्न होणार आहेत. तसेच रविवार, २६ ऑक्टोबर २०२५ रोजी श्री गजानन विजय ग्रंथाचे महापारायण सौ. हेमताई कराळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमांना पंचक्रोशी व तालुक्यातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रींचे दर्शन घ्यावे, असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा सौ. प्रतिमा ठाकरे, उपाध्यक्षा सौ. शिल्पा राऊत, सचिव सौ. अश्विनी ठाकरे, तसेच विश्वस्त सौ. योगितातार्इ गाडबैल, श्रीमती ज्योत्सनाताई खवले आणि सौ. जयाताई डवरे यांनी केले आहे. संस्थेचे मार्गदर्शक श्री. विस्मय ठाकरे यांनी सर्व भक्तांना आर्थिक व धान्य स्वरूपात दान देण्याचे आवाहन केले असून, यावर्षी प्रथमच महाप्रसादासाठी पुरणपोळीचा विशेष बेत आखण्यात आला आहे.


**CHANGE OF NAME**

I **AZRA PARVEEN MOHAMMAD JAVED** R/o House no. 1966, Ramkrishna Society, Yerkheda, Dist Nagpur do hereby solemnly affirm and declare that the my name on Passport is **AZRA KHATOON MOHAMMAD JAVED** which is not correct. As per leaving certificate my name is **AZRA PARVEEN MOHAMMAD JAVED** It is reques-ted to concern department to kind-ly change my name as **AZRA PARVEEN MOHAMMAD JAVED** which is to be used in the passport

**जाहीरनामा**

कोर्ट विद्यमान रमेश कोकाटे तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, रामटेक यांचे न्यायालय
प्र.क्र. / एम आर सी-९/२०२५-२६
मौजा किरणापूर ता. रामटेक जिल्हा नागपूर

[illegible]

सदर जाहीरनामा आज दिनांक ०३/१०/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.
स्थळ :- रामटेक
दिनांक :- ३/१०/२०२५
(रमेश कोकाटे)
तहसिलदार, रामटेक

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MAMTA RAJESH GODBOLE**. NOW MY NEW NAME IS **MAYA RAJESH GODBOLE**.
**ADD :** PLOT NO 48, MAA JAGDAMBA SOCIETY ABHA NAGAR PARDI NAGPUR 440035

MY PASSPORT NO. **M1741223** IS MY INCORRECT NAME WAS **ESTAK AHMAD SHAIKH** NOW NEW CORRECT NAME IS **ISTAK AHAMAD ISLAM SHAIKH**.
**ADD:** GHUTKALA TALAV, NEAR DARUBANDI OFFICE, CHANDRAPUR 442402 MS

MY PASSPORT NO.**Y2801013** IS MY INCORRECT NAME WAS **SHOEAB QAMAR MOHAMMAD SHAFIOUDDIN FAROOQUEI**. NOW NEW CORRECT NAME IS **MOHD SHOEAB QAMER MOHD SHAFIODDIN FAROOQUEI**.
**ADD:** RAJ MOHAMMAD DARGAH ROAD, UDGIR, DIST. LATUR 413517 MS

MY OLD NAME WAS **BHIMA CHARANDAS GEDAM**. NOW MY NEW NAME IS **SANGEETA KAMESHWAR GAJBHIYE**.
**ADD :** DHAMMA KUTTI BUDDHA VIHAR , PLOT NO 231, MOTHA INDORA, MISAL LAYOUT, JARIPATKA, 440014

MY OLD NAME WAS **RAZEQUEEN KAUSER AFZAL KHAN**. NOW MY NEW NAME IS **RAZEQUEEN RAJA SHEIKH**.
**ADD :** NEAR TAJ HARQWARE HASANBAG NAGPUR 440009

MY OLD NAME WAS **MUSTAQUEM MOHAMMAD JAMEEL / MUSTAQUEEM MOHD JAMEEL / MUSTAQUIM**. NOW MY NEW NAME IS **MUSTAQUEM**.
**ADD :** PLOT NO 69, B.B COLONY, BEHIND KHADDA COMPANY, YERKHEDA, KAMPTEE, NAGPUR - 441002

MY OLD PASSPORT NO. **Y1199197**. MY OLD NAME WAS **DIVYA MOHAN ROKDE**. NOW MY NEW NAME IS **DIVYA MOHANRAO ROKADE**.
**ADD :** PLOT NO.180, SHIVANGAON ROAD, SAI BABA NAGAR NAGPUR - 440019



RNINO-20789/71 | Mahasagar Nagpur | Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Tekdi Road, Sitabuldi, Nagpur. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Main office phone numbers:** 7447735851/9922970023/7447735853.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक २०७८९/१९७१ | महासागर नागपूर | **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, टेकडी रोड, सिताबर्डी, नागपूर, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, **समूह संपादक :** संदीप रामराव काळे, **प्रबंध संपादक :** पंकज श्रीकृष्ण चांडक
**फोन :** ७४४७७३५८५१, ७४४७७३५८५३

# अस्मिता

रितू कुमार या भारतातील आघाडीच्या फॅशन डिझायनर आहेत. त्यांचा जन्म १९४४ मध्ये अमृतसर, पंजाब येथे झाला. कला शाखेत पदवी घेतल्यानंतर न्यूयॉर्कमधील बि'आरक्लिफ कॉलेज व कोलकात्यातील म्युझियम ऑफ फाईन आर्ट्स येथे त्यांनी वस्त्र डिझाईनिंगचे शिक्षण घेतले. भारतीय हस्तकला, हँडलूम, ब्लॉक प्रिंट्स, झरी, खादी, भरतकाम यांना आधुनिक रूप देण्यावर त्यांचा भर होता.

## भारताची फॅशन पायोनियर

मानिनी ||

रितू कुमार या भारतातील आघाडीच्या फॅशन डिझायनर आहेत. त्यांचा जन्म १९४४ मध्ये अमृतसर, पंजाब येथे झाला. कला शाखेत पदवी घेतल्यानंतर न्यूयॉर्कमधील बि'आरक्लिफ कॉलेज व कोलकात्यातील म्युझियम ऑफ फाईन आर्ट्स येथे त्यांनी वस्त्र डिझाईनिंगचे शिक्षण घेतले. भारतीय हस्तकला, हँडलूम, ब्लॉक प्रिंट्स, झरी, खादी, भरतकाम यांना आधुनिक रूप देण्यावर त्यांचा भर होता. त्यांच्या डिझाईनमध्ये परंपरा आणि आधुनिकता यांचा सुंदर संगम आहे.लग्नसोहळे, रेड कार्पेट, मिस इंडिया आणि मिस वर्ल्ड स्पर्धायामध्ये रितू कुमार यांच्या ड्रेसची मोठी मागणी असते.आज भारतातील आणि परदेशातील१०० पेक्षा जास्त स्टोअर्सत्यांच्या ब्ँडसाठी काम करतात. त्यांनीऐश्वर्या राय, प्रियांका चोप्रा, लारा दत्ता, करीना कपूर, दीपिका पदुकोण, विद्या बालनअशा अनेक सेलिबि'टींसाठी ड्रेस डिझाईन केले आहेत. इतकेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्टार्सनी देखील त्यांचे फ्युजन डिझाईन्स परिधान केले आहेत.

रितू कुमार यांना त्यांच्या कार्यासाठी अनेक पुरस्कार मिळाले आहेत. २०13 मध्ये त्यांनापद्मश्री ने सन्मानित करण्यात आले आहे. तसेच इंदिरा गांधी प्रियदर्शिनी अवॉर्ड आणि इतर अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे.आज रितू कुमार यांना केवळ फॅशन डिझायनर नव्हे तर भारतीय



परंपरेची जागतिक राजदूत मानले जाते. त्यांच्या जिद्दीने आणि नव्या दृष्टिकोनाने त्यांनी भारतीय फॅशन इंडस्ट्रीला आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवले आहे.

त्यांचे वय आता ८० च्या घरात आहे. पण त्या अजूनही फॅशन इंडस्ट्रीमध्ये मार्गदर्शक, क्रि एटिव्ह डायरेक्टर आणि मेंटॉर म्हणून काम पाहतात. लेबल रितूकुमार, री आणि आरके असे त्यांचे तीन ब्ँडस सध्या चालू आहेत. आता त्याआपल्या मुलगा अमर कुमार याच्यासोबतकंपनीचे नेतृत्व आणि डिझाईन टीमला मार्गदर्शन करतात.फॅशन इव्हेंट्स, पुरस्कार सोहळे आणि मुलाखतींमध्येही त्या नियमितपणे सहभागी होतात.अनेक प्रोजेक्ट्समध्ये त्याज्यूरी मेंबर आणि मेंटरम्हणून सहभागी असतात.आजही त्या निवृत्त झालेल्या नाहीत. उद्योजिकतेचा वयाशी काही संबंध नाही हे त्यांनी सिद्ध केले आहे.

## स्मार्ट होम गॅजेट्स

टेक्नो टिप्स ||

आज जग इतके टेक्नोसॅव्ही झाले आहे, की जादूच्या दिव्यातल्या जिनसारखा प्रत्येक वेळी डिजिटल मदतनीस हजर असतो. आज घरात अनेक प्रकारची स्मार्ट होम गॅजेट्स असतात.



अगदी स्मार्ट डोअरबेल्सपासून ते थेट सिक्युरिटी कॅमेऱ्यापर्यंत आधुनिक गॅजेट्स घर सुरक्षित ठेवतात. इलेक्ट्रोनिक लॉकमुळे क्रिया सांभाळायची गरज पडत नाही. स्मार्ट फ्रीज आपल्याला फ्रीजमधल्या कोणत्या वस्तु संपल्या आहेत याची आठवण करून देतो. मोबाईलवरून ऑन–ऑफ करता येणारे आणि रंग बदलता येणारे स्मार्ट बल्ब्स विजेची बचतदेखील करतात. सीसीटीव्ही कॅमेरामधून आपल्या बंद घरात कुठे काय चालू आहे हे आपण ऑफिसमध्ये किंवा बाहेरगावी असलो तरी पाहू शकतो. स्मार्ट प्लग्समुळे कोणतेही उपकरण



दूरवरून बंद किंवा चालू करता येते. स्वयंपाकघरात स्मार्ट ओव्हन, कॉफी मेकर, रोबोट व्हॅक्युम क्लिनर,



अशा गॅजेट्सनी वेळ वाचतो. विशेष म्हणजे हे सगळं एकमेकांशी जोडलेले असते. अलेक्सा किंवा गूगल असिस्टंट वापरून ही उपकरणे फक्त आवाजाने नियंत्रित करता येतात. उदाहरणार्थ, लाइट बंद कर म्हटलं की घरातले सगळे लाइट्स बंद होतात. कधी कधी अंगणातले किंवा बाहेरचे दिवे ठराविक वेळी बंद करण्याच्या सूचना पण देता येतात.मात्रयासाठी इंटरनेट सतत उपलब्ध असणे आवश्यक आहे. तसेच गॅजेट्स वापरताना गोपनीयतेची काळजी घ्यावी लागते. योग्य वापर केला तर स्मार्ट होम गॅजेट्समुळे दैनंदिन जीवन खूपच सोपेहोते.

## मुबलक 'क' जीवनसत्त्व हवंय?

डाएट अँड न्यूट्रिशन ||



संत्रं, लिंबू अशा आंबट फळांमध्ये 'क' जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात असतं. म्हणूनच ही फळं खाण्याचा सल्ला दिला जातो. संत्रं आणि लिंबासह इतर काही भाज्या आणि फळांमध्येही 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असतं. म्हणूनच संत्रं आणि लिंबासह या फळांचा तसंच भाज्यांचा समावेश आहारात करायला हवा.

- ब्रोकोली ही अत्यंत पौष्टिक अशी भाजी आहे. यात 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असतं. १०० ग्रॅम ब्रोकोलीमधून १३२ मिलिग्रॅम 'क' जीवनसत्त्व मिळतं. तसंच यात कॅलरीही खूप कमी प्रमाणात असतात.
- लाल आणि हिरव्या सिमला मिरचीमध्येही 'क' जीवनसत्त्व असतं. एका सिमला मिरचीमध्ये संत्र्यापेक्षा तिप्पट म्हणजे १९० मिलिग्रॅम 'क' जीनवसत्त्व असतं. त्यामुळे ही भाजी तुमच्या आहारात असायला हवी.
- अननस खाल्ल्यामुळेही तुम्हाला 'क' जीवनसत्त्व मिळू शकतं. यातला ब्रोमलिन नामक घटकही आरोग्यदायी असतो.
- बाजारात किवी नावाचं फळ मिळतं. या फळातही 'क' जीवनसत्त्वाचं प्रमाण भरपूर असतं. दोन किवी फळांमधून १३७.४ मिलिग्रॅम 'क' जीवनसत्त्व मिळतं. यासोबतच यात पोटॅशियम आणि कॉपर ही खनिजंही असतात. शरीरात लोहाची कमतरता असेल तर किवी खाता येईल.
- फ्लॉवर आणि कोबीमधूनही तुम्ही 'क' जीवनसत्त्व मिळवू शकता. मध्यम आकाराच्या फ्लॉवरमध्ये १२७.७ मिलिग्रॅम 'क' जीवनसत्त्व असतं. छोट्या आकाराच्या कोबीमध्येही ७४.८ मिलिग्रॅम 'क' जीवनसत्त्व असतं.
- पपई आणि स्ट्रॉबेरी या फळांमधूनही तुम्ही 'क' जीवनसत्त्व मिळवू शकता.



## पेरुची थंडाई

रसगंधा ||

**घरी येणाऱ्या पाहुण्यांना सरबत दिलं जातं. एखाद्या प्रसंगी वेलकम ड्रिंक दिलं जातं. फ्रूट पंच, कलिंगड ज्यूस असे प्रकार तुम्ही बरेचदा प्यायले असतील. मग वेगळेपणासाठी पेरुची थंडाई बनवून बघायला हरकत नाही.**

**साहित्य:** एक ग्लास दूध, अर्धा ग्लास पेरूचा रस, अर्धा कप बदाम, अर्धा कप काजू, पाव कप पिस्ता, अर्धा चमचा मिरी, दोन चमचे वेलची पूड, एक चमचा बडिशेप

**कृती:** गॅसवर कढई ठेवा. बदाम, पिस्ते आणि काजू थोडे भाजून घ्या. भाजलेला सुका मेवा बाजूला ठेवा. आता बडिशेपही भाजून घ्या. यानंतर काजू, बदाम, पिस्ता, बडिशेप, काळी मिरी, गुलाबाच्या पाकळ्या मिक्सरमध्ये एकत्रितपणे वाटून घ्या. यात वेलची पूड घाला. उपलब्ध असल्यास केशरही घालता येईल. तुमचं थंडाई मिक्स तयार आहे. थंडाई बनवण्यासाठी अर्धा ग्लास दुधात दोन चमचे थंडाई मिक्स आणि पेरूचा रस घाला. सर्व घटक नीट मिसळून घ्या. यात बर्फाचे तुकडे घालता येतील.



## शेती कांद्याच्या पातीची

परसबाग ||

प्लास्टिकच्या बाटल्या, डबे यांचा वापर करून तुम्ही घरीच कांद्याच्या पातीची लागवड करू शकता. ही लागवड करण्यासाठी पाच लीटरची प्लास्टिकची बाटली घ्या. कात्री, माती आणि कांद्याचा मुळांकडचा भाग घ्या. बाटलीचा वरचा भाग कापून घ्या. त्यानंतर कात्रीने बाटलीला मध्यम आकाराची छिद्रं पाडा. या छिद्रांमधून पात बाहेर येईल. त्यामुळे छिद्रांचा आकार बऱ्यापैकी मोठा ठेवा. तसंच दोन छिद्रांमध्ये तीन इंचांचं अंतर असायला हवं. यानंतर बाटलीत माती भरा. या मातीमध्ये भरपूर पोषक घटक असतील याची काळजी घ्या. गरज पडल्यास पुढे सेंद्रिय खतांचा वापर करा. आता पातीचे कांदे घ्या. हे कांदे मातीत पेरायचे आहेत. कांद्याची पात बाहेरच्या बाजूने वाढणार आहे. त्यामुळे कांदा पेरताना हा भाग वरच्या बाजूला असायला हवा. सुरुवातीला बाटलीला पाडलेल्या छिद्रांच्या पहिल्या स्तरापर्यंत माती भरा. मग कांद्यांची लागवड करा. त्यानंतर पुन्हा माती भरा. कांद्यांची पेरणी करा. अशा पद्धतीने बाटली पूर्ण भरेपर्यंत ही प्रक्रिया करत रहा. आता कापलेला भाग बाटलीवर ठेवा. कांद्याला सहा ते आठ तास सूर्यप्रकाश मिळणं गरजेचं आहे. कांद्याच्या पिकाला वेळोवेळी पाणी घालत रहा. मातीतला ओलावा टिकून रहायला हवा. कांद्याच्या पातीची वाढ होऊ लागेल. मग या वाढ झालेल्या कांद्याच्या पातीची कापणी करा.



## जाऊ कान भरते आहे...

काय करू? ||



माझ्या लग्नाला तीन वर्षं झाली असून मोठ्या जावेच्या वागण्यामुळे त्रस्त झाले आहे. ती घरातल्या सर्वांवर हुकुम चालवते. तिला सगळं काही आपल्या मनासारखं लागतं. ती कोणाचंही ऐकत नाही. म्हणून कोणीही तिच्या नादी लागत नाही. ती खूप आक्रस्ताळेपणा करते. तिचं कोणाशीही पटत नाही. शेजाऱ्यांशी, नातेवाईकांशी भांडत असते. आता तिने माझ्या पतीचे कान भरायला सुरुवात केली आहे. आम्ही वेगळे राहतो. पण सासू–सासऱ्यांना भेटायला गेल्यावर तिचीही भेट होते. ती पतीला माझ्याविरोधात भडकवते. माझे पतीही तिने सांगितलेल्या चुकीच्या गोष्टींवर विश्वास ठेवतात. यामुळे आमच्यात बेबनाव निर्माण होतो. त्या घरी जाऊन आल्यावर पती खूप अस्वस्थ आणि बेचैन असतात. अशा परिस्थितीत मी काय करू?

–

इतरांच्या वर्तनावर आपलं नियंत्रण असू शकत नाही. म्हणूनच तुझे सासू–सासरे तिला बोलायला जात नाहीत. मला वाटतं, तू या विषयावर पतीशी स्पष्टपणे बोल. या नात्याकडून तुला काय हवं आहे हे स्पष्टपणे सांग. तुला जावेचा स्वभाव माहीत आहे. तिच्या या स्वभावाबद्दल पतीशी बोल. ती इतरांशी कशी वागते हे ही स्पष्टपणे सांग. गरज पडल्यास सासू–सासऱ्यांची मदत घे. तुम्ही वेगळे राहता. त्यामुळे फार काळजी करण्याची गरज नाही. तुमच्या नात्याला बळकटी देण्याचा प्रयत्न कर. प्रसंगी समुपदेशकांचीही मदत घेता येईल.

## चलती ऑर्गेंजा फॅब्रिकची

स्टाईल स्टेटमेंट ||



सध्या ऑर्गेंजा फॅब्रिकची बरीच चलती आहे. वजनाला अत्यंत हलक्या असणाऱ्या या फॅब्रिकपासून तयार करण्यात आलेले भारतीय पारंपरिक पेहराव कोणत्याही समारंभाची शान ठरतात. या फॅब्रिकपासून साड्या, लहंगे, अनारकली तसंच दुपट्टेही तयार केले जातात. कापडाचा हा प्रकार खूप आकर्षक वाटतो. ऑर्गेंजा हे सिल्कच्या धाग्यांपासून तयार करण्यात आलेलं फॅब्रिक आहे. मात्र नायलॉन आणि पॉलिस्टरच्या धाग्यांच्या मिश्रणानेही ऑर्गेंजा फॅब्रिक तयार केलं जातं. ऑर्गेंजा कापड खूप मुलायम असतं. यामुळेच या कापडापासून तयार करण्यात आलेले कपडे खूप आरामदायी वाटतात.

ऑर्गेंजा फॅब्रिकची साडी तुम्ही अधिक विश्वासाने कॅरी करू शकता. अत्यंत हलकी अशी ही साडी खूप सुंदर दिसते. लग्न, पार्टीसह कोणत्याही कार्यक्रमात ऑर्गेंजा फॅब्रिकची साडी नेसता येईल. ऑर्गेंजा कापड विविध रंगांमध्ये उपलब्ध आहे. विविध रंगांच्या आणि डिझाइन्सच्या ऑर्गेंजा साड्या बाजारात उपलब्ध आहेत. या फॅब्रिकवर फ्लोरल प्रिंट्स अधिक खुलून दिसतात. हे फॅब्रिक विकत घेऊन तुम्ही तुमच्या आवडीचं डिझाइन कस्टमाईज करून घेऊ शकता. जरी बॉर्डरवाली ऑर्गेंजा साडी तुमचा लूक खुलवू शकते. लग्न समारंभासाठी काही खरेदी करणार असाल तर ऑर्गेंजा मटेरियलच्या पेहरावांचा विचार करायला हरकत नाही. हे कापड पारदर्शक असतं. त्यामुळे त्याच्या साड्या स्टायलिश ब्लाउजसोबत कॅरी करा. या फॅब्रिकवर खूप जड आणि मोठ्या आकाराचे दागिने घालू नका. त्याऐवजी चोकर किंवा नाजूकसं नेकलेस घाला. या साडीसोबत रफल्ड परकर घाला. या साड्यांवर सौम्य मेक अप छान दिसतो.

## इमोशनल इंटेलिजन्स

स्किल डेव्हलपमेंट ||

इमोशनल इंटेलिजन्स म्हणजे स्वतःच्या तसेच इतरांच्या भावनांना समजून घेण्याची, त्यांचं योग्य व्यवस्थापन करण्याची क्षमता. माणूस किती हुशार आहे, किती ज्ञान आहे, हे महत्त्वाचे असते.पण आयुष्य यशस्वी आणि समाधानकारक होण्यासाठी भावनिक बुद्धिमत्ता तितकीच आवश्यक आहे.

इमोशनल इंटेलिजन्सचे काही महत्त्वाचे पैलू असतात. सर्वप्रथम म्हणजेस्वतःच्या भावना ओळखणे. आपल्याला राग आला आहे, दुःख झाले आहे, की उत्साह वाटतोय हे नीट जाणून घेणेआवश्यक आहे. बऱ्याच वेळा काय वाटते आहे हे लक्षात न घेता आपण चुकीचे निर्णय घेतो. दुसरी पायरी म्हणजेत्या भावना नियंत्रणात ठेवणे. उदाहरणार्थ, राग आला तरी तो लगेच व्यक्त करण्याऐवजी शांत राहणे.इतरांच्या वागण्यामुळे,बोलण्यामुळे दुखावले गेल्यास त्यातून मार्ग काढणे ही कौशल्ये इमोशनल इंटेलिजन्समुळे येतात.

स्वतःला प्रेरित करणे हा त्यातील अजून एक पैलू आहे. बाहेरची परिस्थिती कठीण असली तरी स्वतःला पुढे नेण्याची ताकद असणे महत्त्वाचे आहे. आत्मप्रेरणा असलेली व्यक्ती अडचणींवर मात करून पुढे जाते. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजेइतरांच्या भावना ओळखणे. समोरच्याला काय वाटते आहे, हे समजून घेऊन त्याच्याशी वागल्यास नाती अधिक घट्ट होतात. आजच्या काळात ही बुद्धिमत्ता फक्त वैयक्तिक नातेसंबंधांसाठीच नाही तर करिअरसाठीही महत्त्वाची आहे. तणावपूर्ण परिस्थितीत शांत राहून योग्य निर्णय घेणारी व्यक्ती इतरांपेक्षा जास्त यशस्वी होते.म्हणूनच, भावनिक बुद्धिमत्ता जपली पाहिजे आणि विकसित केली पाहिजे.



## स्कीन केअर

### नैसर्गिक ब्लीच



ब्लीचमधल्या रसायनांमुळे चेहऱ्यावर पुरळ येणं, जळजळ होणं अशा समस्या निर्माण होतात. मात्र ब्लीचमुळे चेहऱ्यावरची लव झाकली जाते. टॅनिंग कमी होतं. तुम्हाला बाहेरच्या ब्लीचचा त्रास होत असेल तर काही घरगुती घटकांचा वापर करून ब्लीच करता येईल. यासाठी एक चमचा हळद, दोन चमचे लिंबाचा रस आणि गुलाबपाण्याचे सात ते आठ थेंब घ्या. हे सर्व घटक एकत्र करा. हा पॅक चेहऱ्याला लावा. २० मिनिटांनी धुवून टाका. लिंबू आणि हळद नैसर्गिक ब्लीच म्हणून काम करतं.

## हेअर केअर

### घरीच बनवा डाय



पांढरे केस काळे करण्यासाठी डायचा वापर होतो. पण या डायमधल्या घातक रासायनिक घटकांमुळे केसांचं बरंच नुकसान होतं. म्हणूनच केस काळे करण्यासाठी नैसर्गिक डायचा वापर करता येईल. तुरटी आणि चहा पावडरचा वापर करून तुम्ही केस काळे करू शकता. यासाठी दोन चमचे चहा पावडर मिक्सरमध्ये वाटून घ्या. ही पूड बाजूला ठेवा. आता एका कढईत दोन चमचे चहा पावडर काळी होईपर्यंत भाजून घ्या. ही पावडरही वाटून घ्या. आता एका भांड्यात पाणी गरम करा. त्यात दोन चमचे चहा पावडर घालून उकळून घ्या. १० ते १५ मिनिटांनी गॅस बंद करा. चहाचं पाणी गाळून घ्या. या पाण्यात चमचाभर वाटलेली चहा पावडर आणि एक चमचा भाजून वाटलेली चहा पावडर घाला. या मिश्रणात थोडं पाणी घालून उकळून घ्या. थंड करायला ठेवा. या मिश्रणात चमचाभर तुरटी घाला. यानंतर हे मिश्रण ब्रश किंवा कापसाने पांढऱ्या केसांवर लावा. हे मिश्रण अर्धा तास ठेवल्यास केसांचा रंग तपकिरी होईल. काळेभोर केस हवे असतील तर तासाभराने धुवा. या नैसर्गिक डायमुळे केस मजबूत होतील.

## स्मार्ट शॉपिंग

### फ्लोअर क्लीनर घेताना...



आपण वापरत असलेल्या फ्लोअर क्लीनर्स किंवा फिनेलमध्ये अत्यंत घातक अशी रसायनं असतात. ही रसायनं आपल्या त्वचेच्या संपर्कात येतात. घरात पाळीव प्राणी असेल तर त्यांनाही याचा त्रास होऊ शकतो. म्हणूनच फ्लोअर क्लीनर्स घेताना त्यातल्या घटकांबाबत जाणून घ्या. लेबलवरचे घटक वाचण्यासाठी दोन मिनिटं द्या. यामुळे तुमचं आणि तुमच्या कुटुंबाचं आरोग्य चांगलं राहू शकतं. सोडियम लॉरिल सल्फेट आणि सोडियम लॉरेथ सल्फेट खूप घातक आहे. फथॅलेट्स हा फ्रेगरन्ससाठी वापरला जाणारा शास्त्रीय शब्द आहे. या घटकामुळे आरोग्याचं बरंच नुकसान होतं. एमईए, डीईए आणि टीईए या घटकांमुळे हार्मोन्सचं असंतुलन निर्माण होतं. सफ्लेट्स, फॉस्फेट्स, ट्रायक्लोसॅन ही अत्यंत घातक रसायनं आहेत. त्यामुळे या रसायनांनी युक्त फ्लोअर क्लीनर्स टाळा.

## किचन टिप्स

### असा घालवा तेलाचा गंध

पुरी किंवा भजी तळल्यानंतर उरलेलं तेल पुन्हा वापरता येतं. पण या तेलाला पुरी किंवा भजीचा गंध येतो हा गंध घालवण्यासाठी तेलात आल्याचे तुकडे घाला. कढई मंद आचेवर ठेवा. आल्याचे तुकडे पाच मिनिटं तळून घ्या. आल्यामुळे तेलाचा जळका वास निघून जाईल. मग हे तेल भाजी किंवा इतर पदार्थ बनवण्यासाठी वापरता येईल.



## खरीखरी

# बिहारची मतसर्कस

पान १ पासून

पप्पू यादव नावाच्या कुख्यात गुंडाकडून काँग्रेसच्या काही तिकिटांचे वाटप झाले. हा पप्पू यादव दिवसा काँग्रेस बरोबर आणि रात्री अमित शहा यांच्याबरोबर अशी परिस्थिती होती. हे प्रकरण समजल्यानंतर परवा राहुल गांधी यांनी लालूप्रसाद, तेजस्वी, सहानी यांच्यासह आपल्या पक्षातील काही नेत्यांना धडाधड पाच–सहा फोन केले आणि ज्या ज्या सूचना दिल्या त्या प्रत्यक्षात पूर्ण करण्यासाठी अशोक गेहलोत यांना पाठवले. गेहलोत यांनी बरोबर गोट्या फेकल्या आणि जे गठबंधन आपसात कुस्ती खेळत होते ते गपगार झाले. जनतेत वेगळा संदेश गेला तसेच तिकडे एनडीए मध्ये नितीश कुमार यांचे नाव घेतल्याशिवाय पर्याय नाही हे सर्वांनाच ठाऊक आहे. गेल्या निवडणुकीत नितीश कुमार यांच्या अनेक उमेदवारांना पाडणारे मोदीजींचे हनुमान चिराग पासवान यांनाही जाहीरपणे नितीश कुमार यांचे पाय धरावे लागले. बिहारमध्ये नितीश कुमार बाजूला झाल्यावर २०१५ साली भाजपाला ४०/४५ जागा मिळाल्या होत्या. बिहारचे राजकारण देशापेक्षा फार वेगळे आहे. लालू आणि नितीश हे इतरांना कोळून पिण्यात पटाईत आहेत त्यांच्या या पटाईतपणाचा उपयोग होऊ नये म्हणून अनेक वर्षांपूर्वीचे एक प्रकरण उकरून काढण्यात आलेले आहे. जेणेकरून त्या मंडळींना त्याचा फायदा होईल असा त्यांचा कयास होता. परंतु आजच्या पत्रकार परिषदेमुळे एनडीए मधील हर्षवायू झालेल्या आणि अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या होणाऱ्या अनेकांना इंडिया आघाडीत ही जादू कशी काय झाली, याचे कोडेच उलगडत नाही. तिकडे जनसुराज्य पार्टी एनडीए ची काही टक्के मते तरी कमी करणार आहे. एसआयआर ने ६५ लाख मते आधीच कमी केलेली आहेत. म्हणजे प्रत्येक मतदारसंघातून ३० ते ३५ हजार मते कमी झालेली आहेत. त्यामुळे आता बिहारची निवडणूक एनडीए आणि इंडिया या दोघांचीही लिटमस टेस्ट आहे. केंद्र सरकारच्या भवितव्यावरही ही निवडणूक निश्चितपणे परिणाम करणार आहे. आता घोडामैदान खुले आहे. कारण १४ नोव्हेंबरला म्हणजेच बालक दिनी कोणता पक्ष बालक आहे आणि कोणता पक्ष पालक आहे, हे बिहारचे सुविद्य मतदार ठरवणार आहेत.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


NABH मान्यता प्राप्त
श्री दत्त हॉस्पीटल अँन्ड रिसर्च सेंटर
(मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल)
राज्यी होंडा च्या बाजुला, आर्णी रोड, वडगांव, यवतमाळ
संपर्क क्र. 9405981010, 8625035910
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

समस्त जनतेला दिपावली व भाऊबिज निमित्त समस्त जनतेला हार्दिक शुभेच्छा!
चंद्रपूर जिल्हा मजूर – कामगार सहकारी संस्थांचा संघ मर्या., चंद्रपूर
श्री.नरेंद्र स्वान – अध्यक्ष
श्री.परमेश्वर माने – उपाध्यक्ष
सिध्दार्थ पथाडे, प्रशांत बांबोळे, गणपतराव उपरे, श्री.प्रशांत कोलप्याकवार (तज्ञ संचालक), पवन भानारकर
आवेश पठाण, प्रशांत भारती, सुनील घोंगे, भाग्यवान तेलकापल्लीवार, अमोल घोडरे
प्रशांत हस्तक, देवराव कोटेवार, जगदिश नंदूरकर, ईश्वर निखाडे, सुरेंद्र मडकाम
अजय मारकवार, आकाश नळे, सौ.पुनम शील, सौ.भाग्यश्री स्वान, सौ.सीमा वानखेडे
राजू भारती (व्यवस्थापक)
तथा कर्मचारी वृंद : चंद्रपूर जिल्हा मजूर - कामगार सहकारी संस्थांचा संघ मर्या. चंद्रपूर

दिपावली व भाऊबिज निमित्त समस्त जनतेला हार्दिक शुभेच्छा!
मा.अशोक नेते
माजी खासदार, गडचिरोली–चिमूर लोकसभा क्षेत्र तथा राष्ट्रीय महामंत्री, भाजपा अनुसूचित जनजाती मोर्चा

ग्राम पंचायत पाथरीकडून
समस्त जनतेला दिपावली व भाऊबिज निमित्त समस्त जनतेला हार्दिक शुभेच्छा!
सौ. अनिता ठिकरे – सरपंच
मा.प्रफ्फुल तुमे – उपसरपंच
मा. दिलीप घडले – ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत सदस्य : प्रमोद वाघमारे, विलास जुमनाके, गिरीधर मेश्राम, मिलिंद ठिकरे, सौ.अर्चना कुंभरे, वंदना मडावी, प्रीती लाडे, आशा हजारे, अल्का वाघमारे. शिपाई वसुधा सोनटक्के, संगणक परिचालक रवींद्र पासकंटीवार

शुभ दिपावली
आरोग्यवर्धिनी केंद्र पाथरीकडून
दीपावलीव भाऊबिजच्या हार्दिक शुभेच्छा...

दिपावली व भाऊबिज निमित्त समस्त जनतेला हार्दिक शुभेच्छा!
वेंकटेश ऑइल मिल अँड जनरल स्टोर राजुरा कडून दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा

समस्त जनतेला दिपावली व भाऊबिज निमित्त समस्त जनतेला हार्दिक शुभेच्छा!
श्री. बबनराव गोरंतवार
माजी सरपंच ग्रा.पं. पोंभुर्णा तथा दै. महासागर, तालुका प्रतिनिधी पोंभुर्णा

दीपावली व भाऊबीज
निमीत्य समस्त जनतेला मंगलमय शुभेच्छा..!
शुभेच्छुक
श्री. गणेश वसंतराव वासलवार – नगरसेवक नगरपंचायत पोंभुर्णा
सौ. रामेश्वरी गणेश वासलवार – नगरसेविका नगरपंचायत पोंभुर्णा

दीपावली व भाऊबीज
निमीत्य समस्त जनतेला मंगलमय शुभेच्छा..!
शुभेच्छुक
महेश श्रीगिरीवार
युवासेना शहर प्रमुख पोंभुर्णा
maheshshriginwar 86059 77427

दीपावलीव भाऊबिजच्या हार्दिक शुभेच्छा..
शुभ दीपावली
दिव्यांच्या लख प्रकाशाने उजळलेली आजची रात्र आहे, पवित्र सण साजरा करूया, आपण सर्व मिळून हा कारण आज सर्व सणामधील सर्वात मोठा सण दिवाळी आहे
कु. अल्काताई आत्राम – प्रदेश महामंत्री, भाजपा महिला मोर्चा महाराष्ट्र तथा माजी सभापती, पं.स. पोंभूर्णा
श्री. बंडू ऊर्फ धनराज बुरांडे – माजी सरपंच, ग्रामपंचायत जामखुर्द
श्री. सुरज धनराज बुरांडे – युवा कार्यकर्ता, भाजपा युवा मोर्चा

दीपावली व भाऊबिजच्या हार्दिक शुभेच्छा..
शुभ दीपावली
दिव्यांच्या लख प्रकाशाने उजळलेली आजची रात्र आहे, पवित्र सण साजरा करूया, आपण सर्व मिळून हा कारण आज सर्व सणामधील सर्वात मोठा सण दिवाळी आहे
मा.ज्योतीताई बुरांडे – माजी उपसभापती पोंभुर्णा
मा.महेश रणदिवे – नगर सेवक तथा माजी उपसभापती पोंभुर्णा
मा.अजय मस्के – तालुका अध्यक्ष भाजपा युवा मोर्चा पोंभुर्णा
मा.सुनिल कटकमवार – संचालक कृ.उ.बा.समिती पोंभुर्णा

दीपावली व भाऊबिजच्या हार्दिक शुभेच्छा..
शुभ दीपावली
दिव्यांच्या लख प्रकाशाने उजळलेली आजची रात्र आहे, पवित्र सण साजरा करूया, आपण सर्व मिळून हा कारण आज सर्व सणामधील सर्वात मोठा सण दिवाळी आहे
कु.अल्काताई आत्राम – प्रदेश महामंत्री भाजपा महिला आघाडी
मा.बंडूभाऊ बुरांडे – उपाध्यक्ष भाजपा तालुका पोंभुर्णा
मा.रोशन ढेंगणे – उपसरपंच ग्रा.पं. चिंतलधाबा

दीपावली व भाऊबिजच्या हार्दिक शुभेच्छा..
शुभ दीपावली
दिव्यांच्या लख प्रकाशाने उजळलेली आजची रात्र आहे, पवित्र सण साजरा करूया, आपण सर्व मिळून हा कारण आज सर्व सणामधील सर्वात मोठा सण दिवाळी आहे
श्री. विनोद देशमुख – महामंत्री भाजपा तालुका पोंभुर्णा तथा माजी उपसभापती प.स. पोंभुर्णा
श्री.रोशन ढेंगणे – उपसरपंच ग्रा.पं. चिंतलधाबा
श्री. रंजीत पिंपळशेंडे – उपसरपंच ग्रा.पं. भिमणी तथा उपाध्यक्ष भाजपा तालुका पोंभुर्णा

संकलन : बबन गोरंतवार, तालुका प्रतिनिधी, पोंभूर्णा

दिव्यांच्या प्रकाशात उजळू दे तुमचं जीवन, सुख, समृद्धी आणि आनंद नांदो तुमच्या अंगणात!
दिवाळी व भाऊबिज निमित्य हार्दिक शुभेच्छा..!
सौ.रोहिणी राकेश नैताम – सरपंच ग्रा.पं. बोर्डा बोरकर
श्री.विनायक बुरांडे – संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती पोंभुर्णा
श्री.राजाराम मोहुरले – कॉंग्रेस सामाजिक कार्यकर्ता चिंतलधाबा

दिव्यांच्या प्रकाशात उजळू दे तुमचं जीवन, सुख, समृद्धी आणि आनंद नांदो तुमच्या अंगणात!
दिवाळी व भाऊबिज निमित्य हार्दिक शुभेच्छा..!
श्री.ओमेश्वर पद्मगिरीवार
श्री. अमरसिंह बघेल
श्री.अशोक गेडाम, श्री.नंदूभाऊ बुरांडे, श्री.जयपाल गेडाम, श्री.पराग मुलकलवार

संकलन : सुधाकर दुधे, तालुका प्रतिनिधी, सावली

नागपूर
महासागर
# वृत्तसागर
शुक्रवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०२५

## दिवाळीत एसटी सूसाट, उत्पन्नात भर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
दिवाळीच्या सणात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटी विभाग नफ्यात धावत आहे. दिवाळीच्या आठवडाभरापासून तूफान गर्दीत धावणारी एसटी आताही खच्चून भरली असते. भाऊबिजेच्या निमित्ताने तर एसटी बसेसमध्ये पाय ठेवायला जागा नसून, यामुळे एसटीच्या उत्पन्नात भर पडत आहे.



एसटी महामंडळ नेहमीच तोट्यात असल्याचे सांगितले जाते. या विभागातील वाहक, चालक आणि इतर कर्मचाऱ्यांचे अनेकदा वेळेवर पगार देखील होत नाहीत. तथापि, सणासुदीच्या दिवसात एसटीला झळाळी येते. दरवर्षी एसटी महामंडळाकडून दिवाळीच्या दिवसात प्रवासी भाड्यात वाढ केली जाते. यावर्षीही ती करण्याची घोषणा केली गेली. मात्र लागू होण्यापूर्वीच भाडेवाढ रद्द करण्यात आली. परिणामी, प्रवाशांच्या खिशाला झळ पोहचली नाही.

दिवाळी सणानिमित्त एसटीच्या बहुतेक सर्व बसेस प्रवाशांनी खच्चून भरल्या असून, यामुळे सर्वच आगारांच्या उत्पन्नात भर पडत आहे.

# शहरी नक्षलवाद हे मोठे आव्हान..

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
शहरी नक्षलवाद हा झेन झी अर्थात आत्ताच्या पिढीला अराजकतेकडे नेण्याचा प्रयत्न करत आहे. हे सरकारपुढील सर्वात मोठे आव्हान आहे. पण सरकार या अराजकतावाद्यांना निश्चितच पराभूत करेल, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरूवारी दिवाळी निमित्त पत्रकारांनी अनौपचारिक गप्पा मारल्या. त्यात त्यांनी वरील विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले, आता बंदुकीचा नक्षलवाद संपल्यात जमा आहे.

महाराष्ट्र आणि छत्तीसगढमधून नक्षलवाद हद्दपार झाला आहे. मात्र झेन झी पिढीला भरकटवून तसेच त्यांची माथी भडकवून उद्रेक घडवून आणणारा शहरी नक्षलवाद येणाऱ्या काळात खरं चॅलेंज असणार आहे. शहरी नक्षल्यांना चेहरा नाही. वेगवेगळ्या स्वरूपात ते घातक विचार पेरतात. शहरी नक्षलवादी संविधान मानत नाहीत, पण अराजकतावाद्यांना आम्ही निश्चितच पराभूत करू.

बंदुकीच्या नक्षलवादाच्या लढाईत सारे काही स्पष्ट असते. तिथे मारणारा कोण हे माहिती असते. पण,



शहरी नक्षलवाद बिनचेहऱ्याचा आहे. वेगवेगळ्या रूपात वावरतो. नेमका शत्रू कोण हे माहिती नसते. त्यामुळे अर्बन नक्षलीझम हेच मोठे चॅलेंज राहणार आहे, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

नव्या पिढीचा संविधान आणि संवैधानिक संस्थांवरील विश्वास उडावा यासाठी शहरी नक्षली कार्यक्रम घेतात. पण, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधानच शहरी नक्षल्यांचा पराभव करील असे फडणवीस म्हणाले.

जात जनतेच्या मनात नाही तर नेत्यांच्याच मनात असते. निवडणुका आल्या की नेत्यांच्या मनातील जात बाहेर पडते. पण, जनताही आता समजुतदार झाली आहे. म्हणून अशा नेत्यांना जनताच धडा शिकवते. म्हणूनच जनतेने नेहमीच मला पाठिंबा दिला आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

कॉंग्रेस पक्षाचे नेते खासदार राहुल गांधी राहुल गांधी अतिडाव्या विचारसरणीने ग्रस्त आहेत. अतिडाव्या विचारांच्या लोकांनी त्यांना घेरलेले आहे. राहुल गांधींच्या माध्यमातून कॉंग्रेसवर डाव्यांची पकड घट्ट होत चालली आहे. म्हणून त्यांच्या जवळ सांगण्यासारखे काही नाही. ते नाहक संवैधानिक संस्थांवर हल्ला करीत असतात, असा आरोपही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधींविषयी यावेळी बोलताना केला.

### टाटाच्या नागपुरातील टाल प्रकल्पाचा विस्तार?

टाटा समूहाच्या नागपूर येथील टाल मॅन्युफॅक्चरिंग सोल्यूशन्स लिमिटेड या महत्त्वाच्या औद्योगिक प्रकल्पाचा विस्तार करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. गुजरातमधील टाटा-एअरबस विमाननिर्मिती प्रकल्पासाठी नागपूरमधील टाल प्रकल्पात महत्त्वाचे सुटे भाग आणि उपकरणे तयार केली जाणार आहेत. त्यामुळे नागपूर पुन्हा एकदा देशातील औद्योगिक नकाशावर केंद्रस्थानी येण्याची शक्यता आहे.

टाटा-एअरबस प्रकल्प हा भारतातील संरक्षण व नागरी विमाननिर्मिती क्षेत्रातील पहिला मोठा खासगी उद्योग आहे. वडोदरा येथे सुरू झालेल्या या प्रकल्पाअंतर्गत सी-२९५ एमडब्ल्यू या आधुनिक परिवहन विमानांचे उत्पादन होणार आहे.

या विमानांच्या निर्मितीसाठी लागणारे अनेक घटक, सब-असेम्ब्ली व तपासणी यंत्रणा नागपूरमधील टाल प्रकल्पात विकसित करण्यात येतील.

यामुळे शहरात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक गुंतवणूक व कौशल्याधारित रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

अलिकडेच टाटा सन्सचे अध्यक्ष नागपूर दौऱ्यावर आले होते. त्यांनी सोलार ग्रुपच्या शस्त्र व दारुगोळा निर्मिती कारखान्याला भेट दिली. या भेटीदरम्यान संरक्षण क्षेत्रात टाटा समूह गुंतवणुकीचा विचार करत असल्याची चर्चा रंगली आहे. मात्र, अधिकृत घोषणा कंपनीकडूनच करण्यात येईल, असे सूत्रांनी सांगितले.

या भेटीसाठी राज्य सरकारने विशेष समन्वय साधला होता, अशी माहितीही समोर आली आहे. फडणवीस यांनी टाल प्रकल्पाच्या विस्ताराबाबत संकेत दिले. त्यांनी सांगितले की, गुजरातमधील विमाननिर्मिती प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी नागपूरमधील सुविधा मोठी भूमिका बजावतील. येथील प्रकल्पासाठी महत्वाचे सुटे भाग नागपुरातील टालमध्ये तयार केले जाण्याची शक्यता आहे. त्यासाठी टाल प्रकल्पाचा विस्तार होण्याची शक्यता आहे.

टाल मॅन्युफॅक्चरिंग सोल्यूशन्स लिमिटेड ही कंपनी भारतातील औद्योगिक यंत्रसामग्री आणि घटक उत्पादन क्षेत्रातील एक अग्रगण्य संस्था आहे. नागपूर येथील हा प्रकल्प टाटा समूहाच्या औद्योगिक सामर्थ्याचे प्रतीक मानला जातो.

कंपनी अत्याधुनिक तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण आणि नवोन्मेषी डिझाइनद्वारे देश-विदेशातील उद्योगांना उत्कृष्ट यंत्रसामग्री उपलब्ध करून देते.

नागपूरमधील या प्रकल्पामुळे स्थानिक तंत्रज्ञ, अभियंते आणि लघु उद्योगांना मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होत आहेत. मेक इन इंडिया उपक्रमाला चालना देताना टाल कंपनीने देशांतर्गत उत्पादन क्षमतेत भर घातली आहे.



■ नागपूर : भाऊबिजेचे औचित्य साधून आज गुरूवारी शहरात एका समुदायातर्फे गौरागौरी मिरवणूक काढण्यात आली.

## रौप्य महोत्सवी वर्षातील महानाट्य 'महासूर्य'

### सम्यक थिएटर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेल्थ ऑर्गनायझेशनच्या विद्यमाने विशेष प्रयोगाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील पहिले महानाट्य 'महासूर्य'चा विशेष प्रयोग 26 ऑक्टोबर रोजी कवीश्रेष्ठ सुरेशभट सभागृह, रेशीमबाग, नागपूर येथे दुपारी 3 वाजता. आयोजित करण्यात आला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील पहिले महानाट्य, अशी सांस्कृतिक इतिहासात नोंद झालेले 'महासूर्य' हे महानाट्य नागपूरकरांनी अत्यंत सामर्थ्याने निर्माण केले आणि ज्यामुळे नागपूरकर कलावंतांचे नाव सर्वदूर पसरले; त्या ऐतिहासिक कलाकृतीला आता 25 वर्ष पूर्ण होत आहेत.

'महासूर्य' या महानाट्याचे लेखक व दिग्दर्शक डॉ. सुनील रामटेके हे असून निर्मिती सम्यक थिएटरने केली आहे. सम्यक थिएटर या संस्थेनेही 25 वर्ष पूर्ण केली आहेत. या निमित्ताने सम्यक थिएटर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेल्थ ऑर्गनायझेशन या दोन्ही संस्थांनी मिळून या विशेष प्रयोगाचे आयोजन केले आहे.

25 वर्षांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर अशी भव्य कलाकृती निर्माण करण्याचे स्वप्न नागपूरकर रंगकर्मीनी पाहिले आणि ते यशस्वी झाले. अनेक अंगांनी ही कलाकृती अत्यंत सक्षम असल्याची पावती सर्व स्तरातून मिळाली आहे. एक अनोखी आणि सामाजिक, सांस्कृतिक व कलात्मक दृष्टिकोनातून उत्तम अशी कलाकृती निर्माण करण्याचे श्रेय नागपूरकर रंगकर्मीना नक्कीच आहे. या कलाकृतीचे सौंदर्य अजोड आहे.




सलग तीन तास प्रेक्षकांना खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य त्यात आहे. महासूर्य आणि सम्यक थिएटर यांच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन जानेवारीमध्ये करण्यात येणार आहे.

लोक सहभागातून हे संपूर्ण आयोजन करण्यात येणार असून त्यासाठीच 'महासूर्या'चा विशेष प्रयोग लोकसहभागातूनच आयोजित करण्यात आलेला आहे. प्रस्तुत महानाट्याच्या प्रयोग प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम, गिरीश गांधी, प्रसिद्ध न्यूरोलॉजिस्ट डॉ. संजय रामटेके, रातुम नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. माधवी खोडे, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव, इ. झेड. खोब्रागडे, डॉ. हिरेन नगराळे, अशोक गेडाम उपस्थित राहतील, अशी माहिती सम्यक थिएटरचे संयोजक नरेश साखरे यांनी पत्रपरिषदेत दिली. यावेळी डॉ.सुरेश चवरे, पी.एस. कुमार, डॉ.सुनील रामटेके, श्रीकृष्ण ढोले, इंजि. सुरेश खोब्रागडे, वैशाली गोस्वामी, लीलेश्वर जवादे, सुखदेव सोंडवले, छाया वानखेडे उपस्थित होते.

## हे तर राष्ट्रद्रोही..

### मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची टीका

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही राष्ट्रभक्ती, समाजसेवा आणि राष्ट्रनिर्माण यासाठी कार्य करणारी देशातील प्रमुख संस्था आहे. या संस्थेवर बंदी घालण्याची मागणी करणारे लोक मूर्ख आणि राष्ट्रद्रोही आहेत, अशी टीका महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे.



बावनकुळे म्हणाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने देशात राष्ट्रभावना निर्माण केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत' संकल्पनेत संघाची विचारधारा प्रतिबिंबित होते. त्यामुळे जो कोणी संघावर बंदी घालण्याचा विचार करतो, तो खरे तर राष्ट्रद्रोही आहे.

शेतकऱ्यांच्या बाबतीत बावनकुळे म्हणाले, महाराष्ट्राच्या स्थापनेपासून आजपर्यंत कोणत्याही सरकारने शेतकऱ्यांना 32 हजार कोटी रुपयांचं पॅकेज दिले नव्हते. हे पॅकेज शेतकऱ्यांना दिलासा देणारे ठरणार असून रब्बी हंगामासाठी आवश्यक भांडवल उभे करण्यास मदत करेल. आम्ही शेतकऱ्यांचे संपूर्ण नुकसान भरून काढू असे म्हणत नाही, पण हे पॅकेज शेतकऱ्यांना नव्याने उभे राहण्याची ताकद देईल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात गेल्याचा आरोप कॉंग्रेस नेते नाना पटोले यांनी केला होता. त्यावर प्रत्युत्तर देताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, महाराष्ट्र सरकारने दिवाळीपूर्वीच शेतकऱ्यांसाठी ठोस उपाययोजना केल्या आहेत. विरोधक फक्त टीका करतात, पण त्यावरील उपाय दाखवत नाहीत.

सध्या विरोधकांनी मतचोरीचा मुद्दा उपस्थित केला आहे. यावर प्रतिक्रिया देताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, नाना पटोले, विजय वडेट्टीवार आणि कॉंग्रेसचे इतर नेते खासगीत पराभव मान्य करतात. पण कार्यकर्त्यांना टिकवण्यासाठी ते लोकांसमोर मत चोरीचे आरोप करतात. आता जनता महायुतीच्या मागे उभी आहे, त्यामुळे विरोधकांना आपला पक्ष आणि कार्यकर्ते टिकवण्यासाठी अशा खोट्या गोष्टींचा आधार घ्यावा लागतो. संजय राऊत यांना उठल्यावर दिवसभर फटाके फोडायचे असतात. बाकी फटाके फोडण्याचे काम त्यांच्यावर सोडा, अशा शब्दात बावनकुळे यांनी खासदार संजय राऊत यांच्यावर टीकास्त्र सोडले.

## महामार्गावरील जाममुळे वाहनांच्या रांगा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
येथून भंडारामार्गे कोलकाताकडे जाणाऱ्या महामार्गावर नागपूर येथील उमिया औद्योगिक वसाहतीजवळ ट्रकच्या अस्ताव्यस्त पार्किंग आणि चुकीच्या वळणामुळे सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. परिणामी, या भागात वाहनांच्या लांब रांगा दिसून येत आहेत.

नागपूर शहराच्या बाहेर उमिया औद्योगिक वसाहत असून, महाराष्ट्रासह इतर राज्यातून मोठ्या संख्येने अवजड वाहने येतात. पारडीकडून किंवा आऊटर रिंगरोडने जाणारी वाहने चुकीचे वळण घेतात. त्यामुळे बराच वेळ वाहतूक खोळंबून राहते. या भागात चक्क रस्त्यालगत ट्रक उभे केले जातात. त्यामुळेही वाहतुकीला अडचण निर्माण होत आहे.

सद्धया दिवाळीच्या काळात गावाकडे जाणाऱ्यांची तसेच परतणाऱ्यांची संख्या अधिक आहे. मात्र, या भागातील अस्ताव्यस्त पार्किंग आणि चुकीच्या वळणामुळे येथे सातत्याने जाम लागल्याचे दिसून येते.

# इंडियन मेडिकल असोसिएशनतर्फे दिवाळी पहाट कार्यक्रम







■ महासागर प्रतिनिधी, सावनेर, दि. २३ :
हिवाळ्याची सुरुवात, गुलाबी थंड हवेची झुळ्क, पहाट' ची वेळ, आणि त्यात मनाला मोहीत करणारं संगीत कानावर पडलं.. की, अलगत मनाला चैतन्य प्रदान करतं... त्यात 'दिवाळी पहाट' कार्यक्रम म्हंटले तर मनाला हरपून टाकणारा तो बहरदार विलोभनिय क्षण आणि त्याचे सादरिकरण मनाचा ठाव घेणारा तसेच रोजच्या त्याच त्या कंटाळवाण्या जगण्याला एक नव संजिवनी व उभारी देणारा ठरतो.

असाच एक कार्यक्रम इंडियन मेडिकल असोसिएशन (आय. एम. ए.) सावनेर शाखेतर्फे नविन वर्षाच्या स्वागतासाठी आयएमएच्या लॉन मध्ये घेण्यात आलेला दिवाळीच्या पारंपरिक स्वागताचा 'दिवाळी पहाट' कार्यक्रम प्रफुल्लीत वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात आय. एम. ए. चे ज्येष्ठ सदस्य व माजी अध्यक्ष डॉ. विजय घोटे आणि डॉ. ज्योत्स्ना घोटे यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या प्रसंगी आय. एम. ए. सावनेरचे अध्यक्ष डॉ. परेश झोपे यांनी उपस्थितांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी त्यांनी आपल्या संदेशात वैद्यकीय सेवा ही मानवतेची खरी पुजा असल्याचे सांगितले. वैद्यकीय क्षेत्रातील सर्व घटकांनी परस्पर सहकार्याने समाजहितासाठी कार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे वैद्यकीय क्षेत्रातील विविध उपचार पद्धतीचे प्रतिनिधी एकत्र आले होते, नीमा शाखा सावनेर अध्यक्ष डॉ. छत्रपती मानापूरें विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते, तर होमिओपॅथी डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राहुल दाते यांनीही आपल्या उपस्थितीतून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

यावेळी आयएमचे सदस्य डॉ. स्मिता भूडे (उपाध्यक्ष) डॉ. अमित बाहेती (उपाध्यक्ष), डॉ. शिवम पुनियानी (कोषाध्यक्ष), डॉ. विशाल महंत (सहसचिव), डॉ. विजय घटे, नंदा घटे, डॉ. रवींद्र नाकाडे, डॉ. चंद्रकांत मानकर डॉ. अशोक देशमुख, डॉ. विनोद बोकडे डॉ. करुणा बोकडे, डॉ. निलेश कुंभारे, डॉ. सोनाली कुंभारे, डॉ. हेमंत पाटील, डॉ. उमेश जिवतोडे डॉ. प्राची भगत, डॉ. आशीष चांडक, डॉ. रेणुका चांडक, डॉ. विलास मानकर, डॉ. गौरी मानकर, डॉ. सचिन घटे, डॉ. अंकिता बाहेती, डॉ. अमित चेडे, मॅडम चेडे, डॉ. हर्षदा महंत डॉ. नितीन पोटोडे, डॉ. मोनाली पोटोडे, डॉ. रश्मी भगत, चित्रा झोपे, सतीश भुडे डॉ. सौरभ राठी आणि डॉ. नेहा राठी, उपस्थित होते.

नीमा शाखा सावनेर आणि होमियोपैथिक डॉक्टर्स असोसिएशन च्या वतीने सदस्य डॉ कृष्णराव भगत, डॉ मर्फी गजभिये, डॉ संजय दोरखंडे, डॉ मंजुषा दोरखंडे, डॉ रोशन निनावे, डॉ आकांक्षा निनावे, डॉ प्रशांत राजपूत श्रीमती राजपूत, डॉ स्वप्निल काले, डॉ श्रेया काले, डॉ नीरज दुबे श्रीमती दुबे, डॉ. श्रद्धा मानापुरे, डॉ. वैशाली दाते, डॉ. प्रशांत घोळसे, घोळसे मॅडम, डॉ पराग घाटोडे, डॉ. सुजाता घाटोडे, डॉ परेश पींगे, डॉ. कीर्ति पींगे, डॉ भीमराव कोहाड, डॉ. वैशाली कोहाड, डॉ. स्वप्निल कांबे, डॉ. शिवानी कांबे, डॉ. भरत मोटघरे आणि विनोद बोबडे उपस्थित होते.

आय. एम. ए. नीमा शाखा सावनेर आणि होमियोपैथिक डॉक्टर्स असो. असिएशनचे सर्व सदस्य या कार्यक्रमात सहभागी झाले होते. दिवाळी पहाट कार्यक्रमात अभंग, भजन आणि गीतांच्या सुरेल सादरीकरणाने वातावरण भक्तिमय आणि सांस्कृतिक रंगात न्हाऊन निघाले. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध व यशस्वीपणे पार पडले. आयएमचे सचिव डॉ. प्रविण चव्हाण यांनी आभार मानले. कार्यक्रमाला भरगच्च उपस्थिती होती.

# 'दिपावाली स्नेह मिलन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
'दिशा ३०' च्या वर्ष २०१८ ते २०२५ पर्यंत च्या बॅचचे विद्यार्थी व पालक यांच्या उपस्थितीत, दोन सत्रातुन संपन्न झाला. स्नेहमिलनाला, मा. प्रांत सहसंघचालक व डॉ हेडगेवार स्मारक समितीचे उपाध्यक्ष श्री श्रीधरराव गाडगे, प्रांत सेवा प्रमुख श्री सुनील जी मेहेर, महानगर सेवाप्रमुख श्री हरिनारायणजी येवले, डॉ हेडगेवार स्मारक समितीचे पदाधिकारी, चैतन्य क्लासचे श्री अमोल शेगोकर, विदर्भ प्रांत व नागपूर महानगर कार्यकारणी सदस्य, सेवा कार्यकर्ते उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन तसेच प्रास्ताविक श्री हरिनारायण जी येवले यांनी केले. विद्यार्थ्यांनी 'ईतनी शक्ति हमें देना दाता' गीत सादर केले. उद्घाटन सत्रातुन मा. श्रीधरराव गाडगे यांनी विद्यार्थी व पालकांसमोर डॉक्टर हेडगेवार यांचे जीवन चरित्र संक्षिप्त स्वरूपातून मांडताना, भारत वर्षात अनेक अनेक थोर पुरुष होऊन गेले ज्यांचे विचार आजही भारत मनावर स्पष्ट जाणवतात. डॉक्टरांचे जीवनात अत्यंत दयनीय आर्थिक परिस्थिती, बारा वर्षाचे असताना आई-वडिलांचे प्लेग आजाराने एकाच दिवशी छत्र हरपले. 'वंदे मातरम' जयघोष केल्याची शिक्षा म्हणून शाळेतून काढून टाकल्यानंतर, यवतमाळ येथून ११ पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. कलकत्त्याला जाऊन डॉक्टर झाले, त्यांची वैद्यकीय व्यवसायात कधीही रुची नव्हती. देश स्वतंत्र का नाही तो का पारतंत्र्यात गेला तो पुन्हा पारतंत्र्यात जाणार नाही. याची खात्रीपूर्वक व्यवस्था या चिंतनातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अशा वृक्षाची निर्मिती केली त्याचा आज वटवृक्ष झाला आहे. आज शतकपूर्ती वर्ष साजरे होत आहे. संघ, कोणा करता काही देताना, उपकार म्हणून कधीच देत नाही तर आज घेणारा हा देणारा कसा होईल, त्याचा पूर्ण विकास होण्यासाठी पारिवारीक, सामाजिक जीवनात तो स्वाभिमानाने कसा उभा राहील याचे चिंतन करीत असतो. **'देश हमे देता है सब कुछ, हम भी तो कुछ देना सीखे।।'** दुसऱ्या सत्रात चार गटांमधून मार्गदर्शन व अनुभव कथन, चर्चा सत्र झाले. नंतर विद्यार्थ्यांना मिठाईचे व भेटवस्तुंचे वितरण झाले व भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# निराधार व श्रावणबाळ योजनापासुन एकही लाभार्थी वंचित राहणार नाही : राजु भोस्कर

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २३ :
पारशिवनी तहसील अंतर्गत येणाऱ्या वराडा, वाघोली, नांदगाव आणि बखारी या गावांमध्ये संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ योजनेअंतर्गत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे अध्यक्ष संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष राजू भोसकर होते.
या शिबिरामध्ये, पात्र लाभार्थ्यांच्या डीबीटी (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) प्रक्रियेअंतर्गत आधार मॅपिंग, खाते पडताळणी आणि निष्क्रिय लाभार्थ्यांचे सक्रियकरण करण्याचे काम करण्यात आले. ज्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यात बदल झाले होते त्यांच्या बँक खात्यांची योग्य माहिती गोळा करण्यात आली.त्यांच्या बँकेत निधी पाठवण्याची प्रक्रिया सुनिश्चित करण्यात आली. शिबिरादरम्यान, ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये लाभार्थ्यांची यादी वाचून



दाखवण्यात आली. चौकशीनंतर, तीन मृत लाभार्थ्यांची नावे यादीतून वगळण्यात आली, तर गाव सोडून गेलेल्या दोन लाभार्थ्यांची चौकशी करण्यात आली. २० नवीन लाभार्थ्यांचे अर्ज भरण्यात आले. ज्या पात्र नागरिकांचा काही कारणास्तव योजनेचा निधी थांबवण्यात आला होता त्यांना पुन्हा लाभार्थ्यांच्या यादीत सामावून घेण्यात आले. अशा प्रकारे, शिबिराद्वारे एकूण ४५ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात आले.लाभार्थ्यांना योजनांचा लाभ देण्यात आला.एकही लाभार्थी निराधार व श्रावणबाळ योजनेपासुन वंचित राहणार असे समितीचे अध्यक्ष राजु भोस्कर यांनी सांगितले. यावेळी संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष राजु भोस्कर, निराधार विभागाचे कर्मचारी मंगेश सावरकर, वराडा, वाघोली, नांदगाव आणि बखारी येथील ग्रामसेवक, तलाठी, पोलिस निरीक्षक, पोलिस पाटील, गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, समाजसेवक तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष राजु भोसकर यांनी कार्यक्रमाची संपूर्ण माहिती दिली.

# दवलामेटीत नागपूर ग्रामीण तालुकास्तरीय वंचित बहुजन आघाडी कार्यकर्ता मेळावा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :
दवलामेटी येथे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी नागपूर ग्रामीण तालुकास्तरीय कार्यकर्ता मेळावा रविवारी उत्साहात पार पडला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष अजय सहारे होते. तर मार्गदर्शन पूर्व विदर्भ अध्यक्ष भगवान भोंडे यांनी केले.
व्यासपिठावर पूर्व विदर्भ संयोजक विवेक हाडके, प्रफुल माणके, जिल्हा कार्यालयीन सचिव वैभव येवले, जिल्हा सचिव सोनिया वानखेडे, देवराव भांगे, महिला आघाडीच्या उपाध्यक्षा महानंदा राऊत, माधुरी खोब्रागडे, माजी सरपंच रीताताई उमरेडकर, द्रुगधामना येथील ज्येष्ठ कार्यकर्ते अर्जुन बोरकर प्रामुख्याने उपस्थित होते. मेळाव्यात नुकत्याच गठीत झालेल्या दवलामेटी, बोरखेडी (फाटक )आणि बोकारा जिल्हा परिषद सर्कल कमेट्यांच्या नव्या पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यात वामन वाहने, विशाल मेश्राम, अभिजित मेश्राम, अमन मेश्राम, नागनाथ काटे, विकास



रामटेके, मित्रपाल पाटील, बळीराम चक्रे आदींचा समावेश होता.
गाव तिथे शाखा हे अभियान राबवून प्रत्येक कार्यकर्त्यांनी संघटनात्मक बांधणीसाठी पुढाकार घ्यावा. येत्या स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये वंचित बहुजन आघाडी नक्कीच बाजी मारेल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.
मेळाव्याचे आयोजन नागपूर ग्रामीण तालुका कार्याध्यक्ष नागेश बोरकर यांच्या नेतृत्वात करण्यात आले. त्यांना ग्रा.पं. सदस्य प्रकाश मेश्राम, विनायक घुमटकर, चंद्रशेखर पाटील, राजेश्वर पिलेवान, श्रीकांत रामटेके, प्रवीण अंबादे, दर्शन बेले, जय बरसागडे, दीपक कोरे, रमेश गजभिये, नितेश पुंडकर, राजेंद्र गजभिये, राहुल लामसोंगे आदींनी सहकार्य केले.कार्यक्रमाचे संचालन ग्रा.पं. सदस्य प्रकाश मेश्राम यांनी केले तर आभार तालुका कार्याध्यक्ष नागेश बोरकर यांनी मानले.
यावेळी दीपक गडपाल, स्वप्नील चारभे, भाऊसाहेब वासनिक, शेखर गणवीर, शैलेंद्र लामसोंगे, वासुदेव वानखेडे, संदीप सुखदेवे, नरेश गवई, बालाजी मुन, किशोर करवाडे, प्रभाकर कांबळे, रईस डोंगरे, ईश्वर राऊत, अन्वर अली, विशाल नेवारे, प्रशांत सोनवाने तसेच आदीसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिवाळी व छठपूजा उत्सवानिमित्त नागपूर विभागात तिकिटिंग व गर्दी व्यवस्थापनासाठी व्यापक उपाययोजना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
दिवाळी व छठपूजा उत्सवाच्या काळात प्रवाशांच्या संख्येत अपेक्षित वाढ लक्षात घेता, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने नागपूर रेल्वे स्थानकावर सुरळीत तिकिटिंग व्यवस्था व गर्दी व्यवस्थापनासाठी व्यापक उपाययोजना केल्या आहेत.
प्रवाशांच्या सोयीसाठी एकूण ६ ऑटोमॅटिक तिकीट व्हेंडिंग मशीन (अटतघी)- पश्चिमेकडे ३ व पूर्वेकडे ३- कार्यान्वित करण्यात आल्या आहेत, ज्याद्वारे प्रवासी अनारक्षित तिकीट सहज व लवकर घेऊ शकतात. याशिवाय, ६ मोबाइल अनारक्षित तिकिटिंग सिस्टम (च-णडछ) काउंटर- पश्चिमेकडे ४ व पूर्वेकडे २-सुरू करण्यात आले आहेत.
ज्यामुळे प्रवाशांना डिजिटल तिकीटिंगचा जलद व पेपरलेस अनुभव मिळेल.
जे प्रवासी मॅन्युअल तिकिट पसंत करतात, त्यांच्यासाठी ९ अनारक्षित तिकीटिंग सिस्टम काउंटर-पश्चिमेकडे ५ व पूर्वेकडे ३- कार्यरत ठेवण्यात आले आहेत. तसेच १ अतिरिक्त काउंटर ठेवण्यात आला आहे जो तात्काळ वेळेत तात्काळ काउंटर म्हणून व त्यानंतर नियमित UTS काउंटर म्हणून कार्य करतो, ज्यामुळे सणासुदीच्या काळात प्रवासी गर्दीचे प्रभावी व्यवस्थापन होऊ शकेल.
आरक्षण व रद्दीकरण सेवांसाठी एकूण ७ प्रवासी आरक्षण प्रणाली (झठड) काउंटर-पश्चिमेकडे ५ व पूर्वेकडे २-सुरू आहेत.
प्रवाशांना मदत करण्यासाठी, रांगेत शिस्त राखण्यासाठी व तिकिटिंग प्रक्रियेला गती देण्यासाठी पुरेसे कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. स्थानकावर योग्य सूचना फलक, प्रवासी माहिती प्रणाली आणि गर्दी नियंत्रणाची प्रभावी उपाययोजना केली गेली आहे. मध्य रेल्वे प्रवाशांना आवाहन करते की त्यांनी अटतघी आणि णडछ मोबाइल अॅप सारख्या डिजिटल तिकीटिंग सुविधांचा अधिकाधिक वापर करावा, ज्यामुळे वेळेची बचत होईल आणि रांगेत उभे राहण्याची आवश्यकता टळेल. सर्व उपाययोजना प्रवाशांना सुरक्षित, आरामदायक आणि सुरळीत प्रवास अनुभव देण्यासाठी करण्यात आल्या आहेत.

# महिलेची हँडबॅग हिसकावून १३ हजाराचा ऐवज पळविला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ : रस्त्याने जाणाऱ्या एका महिलेची हँडबॅग हिसकावून १३ हजाराचा ऐवज पळवून नेणाऱ्या हर्ष उर्फ एक्का महेंद्र रामटेके (२४) खैरलांजी रोड, तिरोडा (जि. गोंदिया) यास गुन्हे शाखा युनिट १ च्या पथकाने अटक केली.

लुटारू गजाआड



१८ ऑक्टोबर रोजी दुपारी १.१५ च्या सुमारास गोंडवानानगर, मनिषनगर येथे राहणाऱ्या अनुश्री अशोक हाडगे (६६) या त्यांच्या घरून मनिषनगरकडे पायी जात होत्या.
त्यावेळी दुचाकीवर आलेल्या दोन लुटारूंनी त्यांची हँडबॅग हिसकावून रोख ८ हजार रुपये, मोबाईल व इतर साहित्य असा १३ हजाराचा माल पळविला होता. याप्रकरणी बेलतरोडी पोलिस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा नोंदविण्यात आला होता.
युनिट १ च्या पथकाने मोबाईलच्या माध्यमातून हर्षचा शोध घेतला. खापरी पुनर्वसन येथून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याच्या साथीदाराच्या मदतीने त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. याशिवाय सक्करदरा हद्दीत जबरी चोरी आणि एमआयडीसी हद्दीत वाहन चोरी केल्याची कबुली दिली.
त्याच्या ताब्यातून सोन्याचे दागिने, दुचाकी व रोख ३ हजार रुपये असा १ लाख ४३ हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

# तीन ठिकाणी ईव्ही चार्जिंग स्टेशनचे काम पूर्ण

## पर्यावरणपूरक वाहनाना मिळणार चालना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
नागपूर शहरात पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी मनपातर्फे तयार करण्यात येत असलेल्या अकरापैकी तीन ठिकाणी नागरिकांसाठी ईव्ही चार्जिंग स्टेशनचे काम पूर्ण झाले आहे. शहरात इलेक्ट्रिक वाहनांना चार्जिंग सुविधा मिळाल्याने पर्यावरण पूरक वाहन चालविणे आता शक्य होणार आहे. यामुळे शहरातील २ व्हिलर, ३ व्हिलर व ४ व्हिलर ईव्ही गाडी चालविणाऱ्या नागरिकांना आता मोठा दिलासा मिळणार आहे.
मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार, शहरात सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून ११ विविध ठिकाणी इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन उभारण्यात येत आहे.
यामुळे नागरिकांना आपल्या गाड्या या ठिकाणी चार्जिंग करता येणार आहे. अलिकडे मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी यांच्या रहाटे चौक येथे या इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन उभारण्याच्या कामाचे भूमिपूजन हस्ते झाले होते. या नव्या ईव्ही चार्जिंग स्टेशनमुळे शहरातील ईव्ही गाडी चालवणाऱ्या नागरिकांना आता जलद गतीने गाडी चार्जिंग करता येणार आहे.
ई-वाहनांच्या खरेदीला प्रोत्साहन मिळावा आणि वाहनामुळे होणारे प्रदूषण कमी व्हावे, याकरिता महानगरपालिकेने हे पाऊल उचलले आहे. ११ ठिकाणी ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारण्याच्या कामे रिलायन्स बी.पी. इन्फ्रा लिमिटेड, मुंबई यांच्याकडून करण्यात येत आहे. ही माहिती कार्यकारी अभियंता श्री. राजेंद्र राठोड यांनी दिली,
सध्या रहाटे कॉलनी चौक (झुझत च्या जागेजवळ), पत्रकार भवन जवळील पार्किंगच्या जागे मध्ये यशवंत स्टेडियम जवळ आणि वाडी नाका अमरावती रोड या तीन ठिकाणी ईव्ही चार्जिंग स्टेशनचे कामे पूर्ण झाली आहे. उर्वरित आठ ठिकाणी लवकरच ईव्ही चार्जिंग स्टेशनचे कामे होणार आहे. इतर ठिकाणी ईव्ही चार्जिंग स्टेशनची कामे सुरु असणारे ठिकाणे जयताळा बाजार चौक (ऑरंज स्ट्रीट), राहाटे कॉलनी चौक (झुझत च्या जागेजवळ), दयानंद पार्क, पोलीस मोटर ट्रान्सपोर्ट सेक्शन काटोल रोड, फुटाळा रोड पोलीस चौकी जवळ, बुधवारी बाजार सक्करदरा पाण्याच्या टाकीजवळ, शांती नगर मेन रोड पाण्याच्या टाकीजवळ, अंजुमन कॉलेजच्या मागे मंगळवारी कॉम्प्लेक्स, सेंट्रल बाजार रोड वर तुली एम्पीरियर हॉटेलच्या पार्किंगच्या विरूद्ध बाजूला या ठिकाणी ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारण्यात येत आहेत.

# दिवाळीला गडमंदिरात ढोलताशांच्या गजरात लक्ष्मीपूजन : भाविकांची प्रचंड गर्दी

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २३ :
दिवाळी निमित्त रामटेक येथील श्रीराम गडमंदिरावर दरवर्षीप्रमाणे यंदाही लक्ष्मी पूजनानिमित्त भाविकांचा प्रचंड उत्साह उसळला. पहाटे ४ वाजेपासून दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. अंदाजे १२ हजार भाविकांनी भगवान श्रीरामचंद्राचे दर्शन घेतले. या वेळी भक्त परिवारतर्फे व मित्रमंडळ यांनी १०० किलो मिठाईचे वाटप केले, तर भारतीय जनता पार्टी तर्फे आलू-पोह्याचेवाटप करण्यात आले.



सकाळी ६ वाजता रामराज्य ढोल-ताशापथक व ध्वज पथकाने रामनामाचा गजर केला. पथकातील ७५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता. पथकाचे संचालन मोनू रघुवंशी यांनी केले. या सोहळ्यास राज्यमंत्री आशीष जयस्वाल, माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी आदी मान्यवर उपस्थित होते. भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे पार्किंगची व्यवस्था अपुरी पडली.
दोन व चारचाकी वाहने गडमंदिरापासून सुमारे दीड किलोमीटर अंतरावर उभी करावी लागली. दिवाळी उत्सवामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

# ई रिक्षाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ : ई रिक्षाची धडक बसल्याने दानिश नावाच्या दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना मेहंदीबाग पुलावर घडली. मृतक दानिश हा मो. वाहीद यासीन (४२) यांच्या डेकोरेशनच्या दुकानात लेबर म्हणून कामाला होता. यशोधरानगर येथील गोदामात तो राहत असे. २२ ऑक्टोबर रोजी रात्री ११.४५ च्या सुमारास हा डेकोरेशन मालक मो. यासीन यांची दुचाकी घेऊन गेला होता.
मेहंदीबाग पुलावरून राणी दुर्गावती चौकाकडे जात असताना ई रिक्षाचालक राजू श्रावण रामटेके (५०) वैशालीनगर याने त्याला समोरून धडक दिली. त्यामुळे तो गंभीर जखमी झाला. गंभीर अवस्थेत त्याला मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याप्रकरणी पाचपावली पोलिसांनी अपघाताचा गुन्हा नोंदविला आहे.

# कंट्रोल मशीन तोडणाऱ्या कैद्यावर गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
येथील मध्यवर्ती कारागृहातील छोटी गोल विभागातील एक क्रमांकाच्या बराकीत लावलेल्या टर्न गेट कंट्रोल मशीनची तोडफोड केल्याप्रकरणी धंतोली पोलिसांनी विकास रमेश खरात (१९) रा. गजाननगर, राजनोली, ता. भिवंडी या कैद्यावर गुन्हा दाखल केला आहे.
कैद्यांच्या सुरक्षेसाठी छोटी गोल विभागातील एक क्रमांकाच्या बराकीत टर्न गेट कंट्रोल मशीन बसविण्यात आली आहे.
२१ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.२० ते ८ वाजेदरम्यान आरोपी विकासने कंट्रोल मशीनची तोडफोड केली. सुरक्षा रक्षक दुर्गादास पवार यांनी मशीनची पाहणी केली असता ती तुटलेल्या अवस्थेत दिसून आली. पवारने ही माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली.
वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याठिकाणी लावलेले सीसी टीव्हीचे फुटेज तपासले असता विकास हा मशीनची तोडफोड करताना दिसून आला. याप्रकरणी पवार यांनी धंतोली पोलिसात तक्रार केली. या तक्रारीवरून पोलिसांनी विकासच्या विरोधात कलम ३(२) सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# शुक्रवार बाजारात चोरीच्या समस्या पोलीस बंदोबस्त वाढविण्यात यावे : बसपा

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २३ :
बहुजन समाज पार्टी कामठी शहराच्या वतीने मा. मुख्य पोलिस अधिकारी जुनी पोलीस स्टेशन कामठी यांना , बहुजन समाज पार्टी, कामठी शहरा मार्फत निवेदन करण्यात आले आहे .कामठी येथील शुक्रवारी बाजार अत्यंत मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. व कामठीच्या बाजार ठिकाणी जवळपासचे अनेक ग्रामीण क्षेत्रातून नागरिक येत असतात. त्यामुळे कामठी शहर येथे शुक्रवारी बाजारात गर्दीचे वातावरण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. या गर्दीच्या फायदा उचलून चोरी करणाऱ्यांची संख्या वाढलेली आहे . त्यामुळे शुक्रवारी बाजारात महिलांच्या



मूल्यवान वस्तूची चोरी होत आहे. आणि हे प्रमाण सातत्याने वाढत चाललेले आहे. तरी पोलीस प्रशासनाने या गंभीर विषयावर महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन शुक्रवारी बाजार येथे पोलीस बंदोबस्त वाढवुन तसेच जनजागृती अभियान करण्यात यावे, जेणेकरून बाजारात वाढत्या चोरीला थांबविण्यात येईल, अशी मागणी आज बहुजन समाज पार्टीचे मा.विधानसभा उमेदवार इंजि. विक्रांत मेश्राम , शहराध्यक्ष विनय ऊके व माजी नगरसेवक विकास रंगारी यांच्या वतीने करण्यात आली.

# अर्णिकाच्या रांगोळीने वेधले लक्ष

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :
दिवाळीच्या पार्श्वभूमीवर परिसरात विविध ठिकाणी रंगीबेरंगी रांगोळ्यांची सजावट करण्यात आली होती. त्यापैकी सर्वांचे लक्ष वेधून घेतले ती होती अर्णिका अमोल जवंजाळ या आठव्या वर्गात शिकत असलेल्या लहान कलाकारिणीने आपल्या कल्पकतेच्या जोरावर रांगोळी कलेतून अर्णिकाला लहानपणापासूनच तिला चित्रकलेची आवड आहे. तिने यापूर्वीही अनेक शालेय व जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळवली आहेत.
रांगोळी कलेद्वारे समाजात सकारात्मक संदेश पोहोचवणाऱ्या अर्णिकाच्या या प्रयत्नाचे सर्वत्र कौतुक होत आहे.




# अभिजित सोसायटीत काकड आरती

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :
एखाद्या विशिष्ट कापडापासून तयार केलेली ज्योत म्हणजे काकड ,पहाटेच्या वेळी काकड्याने ओवाळून देवाला जागविण्याची प्रथा म्हणजेच काकड आरती होय .ही प्रथा गेल्या अनेक वर्षापासून गावागावात सुरू आहे.
काकड आरतीच्या निमित्त लोक एकत्रित येऊन भक्तीभावाने मंदिरात भजन पूजन करीत असल्यामुळे काकड आरती मधून समाजात एकतेची भावना रुजत असते असे मत वसंतराव घडीनकर यांनी व्यक्त केले. अभिजित सोसायटी मधील हनुमान मंदिरात दररोज पहाटे ५



वाजता काकड आरती सुरू होते. ही काकड आरती त्रिपुर पोर्णिमेपर्यंत चालणार आहे. यावेळी ह.भ.प. निळकंठ सावरकर महाराज, गायन वसंतराव घडीनकर, मृदंग अशोक लोखंडे ,टाळकरी रमेश घोटे, नामदेव रामटेके, रामराव अवजेकर, शामराव घोडे, विठ्ठल किनकर, रमेश धारपूरे, नेमदास भोयर, प्रेमदास मस्के, परसराम भोयर, कार्तिक मेश्राम , माधुरी घडीनकर, लताताई हेडाऊ,दुर्गाबाई लोखंडे , मालू सावरकर, सुनंदा निमजे, चंद्रकला राऊत, सविता हटवार, विमल धारपूरे, शांताबाई तांदुळकर आदींसह नागरीक उपस्थित राहतात.

# बंटी शाहूवर आणखी एक गुन्हा

## पिस्तूलाच्या धाकावर मागितली ६० लाखांची खंडणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

जीएसटीचा बनावट व्यवहार आणि शाहू समाजाच्या नावावर कोट्यवधींचा भूखंड हडपण्याचा प्रयत्न करण्यासाठी चर्चित गुंड बंटी उर्फ संतोष रामपाल शाहू आणि त्याच्या साथीदाराविरुद्ध लकडगंज पोलिसांनी आणखी एक गुन्हा नोंदविला आहे. नवीन प्रकरण एका लोखंड व्यावसायिकाच्या तक्रारीवरून नोंदविण्यात आले आहे. बंटीने पिस्तूलाच्या धाकावर त्याला ६० लाखांची खंडणी मागितल्याचा आरोप आहे. आरोपींमध्ये बंटीसह राजदीप उर्फ गोल्डी शाहू (रा. लघु औद्योगिक क्षेत्र) आणि दोन अज्ञात आरोपींचा समावेश आहे.

फिर्यादी चंद्रशेखर शिवचरण प्रजापती (३८) रा. बिनाकी मंगळवारी यांची लघु औद्योगिक परिसरात शिव एंटरप्रायजेस नावाने लोखंडाची दुकान आहे. ३१ जानेवारी २०१८ रोजी प्रजापती यांनी गोपीचंद तोतवानी रा. खामला यांच्याशी लघु औद्योगिक परिसरात एनआयटी सीआरसी सेक्शनमध्ये १३५९ वर्ग फुट भूखंड खरेदीचा सौदा केला होता. त्या दोघांमध्ये ८५ लाख रुपयांत भूखंड खरेदीचा करारनामा झाला.

प्रजापतीने तोतवानी यांना टोकण म्हणून ३ लाख रुपये रोख आणि १७ लाख रुपयांचा धनादेश दिला होता. यासोबतच त्यांना भूखंडाचे ताबाही मिळाला आणि उर्वरित रक्कम रजिस्ट्रीच्या वेळी देण्याचे ठरले होते. गोपीचंद यांच्या मृत्यूनंतर त्यांची मुले रजिस्ट्री करून देणार होते. २५ मे २०२० च्या दुपारी बंटी आणि राजदीप हे दोन अज्ञात व्यक्तींसोबत त्यांच्या भूखंडावर आले.

शिविगाळ करून धमकावू लागले. प्लॉटवर स्वत:चा हक्क दाखवला. प्रजापती यांनी सांगितले की, भूखंडाशी संबंधित सर्व कागदपत्रे आणि तोतवानी यांच्याशी झालेल्या कराराचेही कागदपत्रही त्यांच्याकडे आहेत. याच दरम्यान बंटीने त्याच्या कारमधून पिस्तूल काढली आणि प्रजापती यांच्यावर रोखत ६० लाख रुपये घेऊन माझ्या कार्यालयात या. पोलिसांना सूचना देण्याची चूक करू नका, अन्यथा गंभीर परिणाम होतील अशी धमकी दिली. यामुळे घाबरलेल्या प्रजापतींनी पोलिसात तक्रार दिली नाही. आता बंटीला दोन प्रकरणात अटक झाल्यानंतर प्रजापती यांनी हिंमत करून लकडगंज पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी खंडणी वसुली आणि आर्म्स ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. बंटीला यापूर्वीही भूखंड हडपल्याप्रकरणी तुरूंगात जावे लागले आहे. लवकरच लकडगंज पोलिस न्यायालयातून प्रोडक्शन वॉरंट घेतल्यानंतर त्याला पुन्हा अटक करतील.

# अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ रामटेक द्वारे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ५७वा स्मृति दिनोत्सव साजरा

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २३ :



दिनांक १९ ऑक्टोंबर २०२५ ला सकाळी ७ वाजता तीर्थ स्थापना करण्यात आली, त्यानंतर सामूहिक ध्यान ,ग्रामगीता वाचन ,सामूदाईक प्रार्थना ,भजनी मेळावा आयोजित करण्यात आला.. सद्गुरु भजन मंडळ शितलवाडी, गुरुदेव आई भजन मंडळ परसोडा ,आई वाराणसी भजन मंडळ शनिवारी वार्ड ,गुरुदेव सेवा भजन मंडळ भोंदेवाडा ,गुरुदेव सेवा मंडळ रामटेक यांनी भजन सेवा दिली कार्यक्रमाचे संचालन ग्रामगीताचार्य मोरेश्वर माकडे यांनी केले.२० ऑक्टोंबर २०२५ ला सकाळी सामुदायिक ध्यान, ग्रामगीता वाचन व रामटेक शहरात दिंड्यासह रामधुन काढण्यात आली. त्यात गुरुदेव सेवा मंडळाची भजन सादर करण्यात आली. ह .भ . प.पांडुरंग महाराज शेंडे यांचे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जीवनावर काल्याचे किर्तन झाले . रामटेक नगरपरिषद मुख्याधिकारी पल्लवी राऊत मॅडम यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाला शुभेच्छा दिल्या. सामाजिक कार्यकर्तेया ज्योती कोल्लेपरा कार्यक्रमाला विशेष उपस्थिती दर्शवून सहयोग दिला..

कार्यक्रमाचे संचालन ग्रामगीताचार्य कांचनमाला माकडे यांनी केले. कार्यक्रमात विशेष उपस्थिती कैलास पुरी महाराज नागार्जुन टेकडी, केशव राऊत, रोकडे सर ,महाले गुरुजी प्राध्यापक गुजरकर , प्रफुल शेंद्रे,मिलिंद चोपकर ,अनिल मिरासे ,मनोहर बांढरे ,सेवक बनवे, विजय ठेंगडी ,ग्रामगीताचार्य मोरेश्वर माकडे ,मनोहर बावनकर, नंदनवार सर ,या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी मधुकर कुर्वे , मधुकर हेडाऊ,श्रीधर पुंड, राजू देशमुख, मोहोळ सर ,नंदू नेरकर ,धनराज महाजन, करण कटूकाळे ,सोहम महाजन ,विकी पुंड , सोहम देशमुख , प्रसाद महाजन,एकनाथ उईके ,सचिन भीलकर ,नंदकिशोर पापडकर, वाघाडे सर सतीश सुरसे , अनुज पुंड ,महेश सुरसे ,प्रकाश ठाकरे, मनोहर माकडे,,श्रीराम खोलकुटे, समर मोटघरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे समारोप राष्ट्रवंदना नी झाला .महाप्रसादानंतर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीधर पुंड यांनी केले.

# दिवाळी, छठ पूजेसाठी जाणाऱ्या प्रवाशासांठी अजनी, नागपूर रेल्वे स्थानकांवर सुविधा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :



दिवाळी आणि छठ पूजा हे देशातील महत्वाचे सण असून, या काळात मोठ्या प्रमाणावर प्रवासी रेल्वेमार्गे प्रवास करतात. संभाव्य प्रवासी गर्दी लक्षात घेता, मध्य रेल्वेच्या नागपूर व अजनी रेल्वे स्थानकांवर सुरक्षेच्या तसेच सुविधा सुधारण्याच्या दृष्टीने विशेष तयारी करण्यात आली आहे.सुरक्षा उपाययोजनानागपूर स्थानकावर एकूण २७६ आणि अजनी स्थानकावर ३१ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले आहेत. हे सर्व कॅमेरे रेल्वे सुरक्षा बल व व्यावसायिक विभागाच्या संयुक्त नियंत्रणात सतत निरीक्षणात ठेवले जात आहेत. यासाठी दोन नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत -एक थेट स्थानकावर, तर दुसरा मंडळ रेल्वे व्यवस्थापक कार्यालयातील वॉर रूममध्ये कार्यरत आहे. सुरक्षेची अधिक व्यवस्था म्हणून नागपूर स्थानकावर ७८ आरपीएफ व २८ जीआरएफ कर्मचारी चोवीस तास ड्युटीवर आहेत. विशेष गर्दी नियंत्रणासाठी दोन होल्डिंग क्षेत्रे तयार करण्यात आली असून, प्रत्येकी चार आरपीएफ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. हे कर्मचारी प्रवाशांना मार्गदर्शन, सहाय्य आणि अनुशासन राखण्याचे काम करत आहेत. प्रवासी सुविधांमध्ये वाढमंडळ प्रशासनाने सणाच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त रेल्वे गाड्या चालविणे, प्लॅटफॉर्मवर स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याच्या सुविधा वाढविणे, तसेच माहिती केंद्रांची कार्यक्षमता वाढविणे यावर भर दिला आहे. नागपूर आणि अजनी स्थानकांवर प्रवाशांसाठी बैठकीची सोय, स्वच्छतागृहे, डिजिटल अनाउन्समेंट सिस्टम्स आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्रवाशांची काळजीमध्ये रेल्वेने सणासुदीच्या काळात प्रवाशांच्या सुरक्षित, आरामदायी आणि वेळे-वर प्रवासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले आहे. प्रवाशांना आवश्यक माहिती, मदत व मार्गदर्शन मिळावे यासाठी स्वयंसेवक व अधिकाऱ्यांची विशेष टीम स्थापन करण्यात आली आहे. या सर्व उपाययोजनांमुळे दिवाळी व छठ पूजा सणात रेल्वे प्रवास अधिक सुकर व सुरक्षित होणार आहे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# लक्ष्मीपूजनाच्या दुसऱ्याच दिवशी सोन्याच्या दरात आपटी

■ महासागर प्रतिनिधी



नागपूर, दि. २३ : प्रकाशाचा सन असलेल्या दिवाळीतील धनत्रयोदशी आणि लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्ताला बरेच ग्राहक सोने-चांदीमध्ये बनलेल्या देवी- देवतांच्या मुर्तीसह दागिन्यांची खरेदी करतात. या दिवसांमध्ये सोन्याचे दर उंचीवर होते. परंतु लक्ष्मीपूजनाच्या दुसऱ्याच दिवशी मंगळवारी (२२ ऑक्टोबर २०२५) सोन्याच्या दर मोठ्या प्रमाणात घसरले आहे. त्यामुळे मुहूर्तावर दागिन्यांची खरेदी करणाऱ्यांचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे.दिवाळीच्या पहिल्या दिवशी वसु बारसला सोन्याचे दर विक्रमी उंचीवर होते. परंतु दुसऱ्या दिवशी धनत्रयोदशीला मात्र सोन्याच्या दरात घसरण झाली. त्यामुळे धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर सोने-चांदीची खरेदीसाठी बाहेर बडलेल्या ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात सोने- चांदीच्या दागिन्यांमध्ये पैसे गुंतवले. परंतु लक्ष्मीपूजनाच्या दुसऱ्याच दिवशी सोने- चांदीचे दर घसरल्याने मुहूर्तावर खरेदी करताना ग्राहकांना महागात पडलेले दिसत आहे. दरम्यान करोनानंतर सोने-चांदीचे दर नियंत्रणात येत नसल्याचे चित्र आहे. त्यानंतर सातत्याने सोन्याचे दर वाढत आहे. धनत्रयोदशीला नागपुरात सोन्याचे दर कमी झाल्यामुळे नागरिकांनी सुमारे १५० कोटींची सोने- चांदीची खरेदी केली. या दिवशी (१८ ऑक्टोबर २०२५) धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर नागपुरात सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी १ लाख २८ हजार ५०० रुपये, २२ कॅरेटसाठी १ लाख १९ हजार ५०० रुपये, १८ कॅरेटसाठी १ लाख २०० रुपये, १४ कॅरेटसाठी ८३ हजार ५०० रुपये होते. हे दर लक्ष्मीपूजनाच्या दिवशी (२१ ऑक्टोबर २०२५) प्रति दहा ग्राम २४ कॅरेटसाठी १ लाख २९ हजार ५०० रुपये, २२ कॅरेटसाठी १ लाख २० हजार ४०० रुपये, १८ कॅरेटसाठी १ लाख १ हजार रुपये, १४ कॅरेटसाठी ८४ हजार २०० रुपये होते. तर लक्ष्मीपूजनाच्या दुसऱ्या दिवशी घसरून (२२ ऑक्टोबर २०२५) सकाळी ११ वाजता प्रति दहा ग्राम २४ कॅरेटसाठी १ लाख २४ हजार ५०० रुपये, २२ कॅरेटसाठी १ लाख १५ हजार ८०० रुपये, १८ कॅरेटसाठी ९७ हजार १०० रुपये, १४ कॅरेटसाठी ८० हजार ९०० रुपये होते. त्यामुळे हे मागील काही आठवड्यातील निच्चांकी दर आहे. चांदीच्या दरातही मोठी घसरण: नागपुरात धनत्रयोदशीच्या दिवशी चांदीचे दर प्रति किलो १ लाख ७० हजार ५०० रुपये होते. हे दर लक्ष्मीपूजनाला २१ ऑक्टोबरला १ लाख ६८ हजार ७०० रुपये ते तर त्याच्या दुसऱ्या दिवशी २२ ऑक्टोंबरला प्रति किलो १ लाख ६३ हजार रुपये नोंदवले गेले.

# ६३८ वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर.** वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण ६३८ वाहन चालकांवर कारवाई करून ९८,००० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ३ प्रकरणात ३ आरोपींवर कारवाई करून ३,०८० रुपयांचा माल जप्त केला. तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ३ प्रकरणात २५ आरोपींवर कारवाई करून ६,४९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

# खेड्यातील युवकाने कम्प्युटर क्षेत्रात आकाश भरारी मारल्याबद्दल अभिनंदन



**भारतातील** नव्हे तर जगातील एका महान शास्त्रज्ञाचा आज वाढदिवस ज्यावेळी भारताने अणुचाचणी केली आणि अमेरिकेने भारतावर काही निर्बंध लादले, त्यावेळेस अमेरिकेने भारताला सुपर कॉम्प्युटर देण्यास नकार दिला .या नकाराचं संधीत रूपांतर करून *संपूर्ण देशी बनावटीचा पहिला सुपर कॉम्प्युटर बनवला तो आपले मराठी शास्त्रज्ञ डॉ. विजय पांडुरंग भटकर यांनी.

डॉ. विजय भटकर आज ७८ वर्षाचे होत आहेत. त्यांच्या जन्म ११ ऑक्टोबर १९४६ रोजी झाला.आज सुद्धा एखाद्या तरुणाला लाजवेल इतक्या ताकतीने कार्यरत आहेत.भटकर यांचे मूळ गाव हे अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील मुरंबा हे अडीचशे-तीनशेलोकवस्तीचे गाव. त्यांचे मूळ घर जनावरांचा गोठा आणि पडक्या भिंती असलेल्या जुनाट वाड्यात.

भटकर यांचे शालेय शिक्षण मूर्तिजापूर येथे झाले. त्यांनी विश्वेश्वरय्या रीजनल इंजिनीअरिंग कॉलेज, नागपूर येथून इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंगचे शिक्षण घेतले. त्यांना एम.टेक. साठी आयआयटी, मुंबईमध्ये प्रवेश मिळत होता.तसेच महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठ, वडोदरा येथेसुद्धा प्रवेश मिळत होता. त्यापैकी वडोदरा येथील विद्यापीठातून त्यांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले.त्यांनी आयआयटी, दिल्ली येथून पी.एचडी. प्राप्त केली. भटकरांनी शिक्षणाच्या काळात सर्व विषयांतील साधारणत: पन्नास हजार पुस्तके वाचली. शिक्षणानंतर, त्यांना परदेशी नोकऱ्यांची अनेक आमंत्रणे होती, पण त्यांनी भारतातच राहायचे ठरवले होते. विक्रम साराभाईच्या अध्यक्षतेखाली इलेक्ट्रॉनिक्स कमिशनची स्थापना १९६८ साली झाली. त्या कमिशनवर भटकरांनी दहा वर्षे काम केले. ते इंदिरा गांधींनी 'इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार' साठी १९७२ साली नेमलेल्या महत्त्वाच्या समितीचे सदस्य होते. त्यांनी त्रिवेंद्रममध्ये इलेक्ट्रॉनिक रिसर्च अँड डेव्हलपमेंट या भारतातील सर्वात मोठया प्रयोगशाळेची स्थापना केली. ते या संस्थेचे १९८० ते १९८७ या काळात ते संचालक होते. भटकरांच्या मार्गदर्शनाखाली केरळमध्ये अठरा कारखाने उभारले गेले. १९८२ च्या एशियाडच्या वेळी भारतात दूरदर्शनचे प्रसारण रंगीत असावे असे सरकारला वाटले. इतर ज्येष्ठ शास्त्रज्ञांच्या मते हे शक्य नव्हते, त्यावेळी पंतप्रधान इंदिरा गांधीनी ही कामगिरी भटकरांवर सोपवली. त्यासाठी केल्ट्रॉन आणि तिरुअनंतपूरमच्या इलेक्ट्रॉनिक्स संशोधन संस्थेने भटकरांच्या नेतृत्वाखाली प्रयत्नांची पराकाष्ठा करून हे उद्दिष्टपूर्ण केले. भटकरांनी इलेक्ट्रॉनिक्सची अनेक उपकरणे व प्रणाल्या विकसित केल्या. सुरक्षिततेच्या आणि उत्पादन क्षमतेच्या बाबतीत त्यांनी भिलाई प्लान्टमध्ये सुधारणा करून दिल्या. रस्त्यावरील वाहतूक नियंत्रण प्रणाली, उद्योगातील स्वयंचलित यंत्रणा, कलकत्ता भुयारी रेल्वेची संगणकीय प्रणाली त्यांनी विकसित केल्या. भटकर टाटा कन्सल्टन्सीत १९८७मध्ये उपाध्यक्ष झाले.डॉ.भटकरांनी १९९३ मध्ये परम-८०० आर १९९८ मध्ये परम-१००० हे संगणक बनवले. परम म्हणजे सर्वश्रेष्ठ. हा संगणक प्रति सेकंद एक अब्ज गणिते करू शकतो. अंतराळ संशोधन, भूगर्भातील हालचाली, तेलसाठे संशोधन, वैद्यकीय हवामान, अभियांत्रिकी, लष्करी अशा अनेक क्षेत्रांसाठी हा संगणक उपयोगी पडतो. विकसनशील देशातील असा हा एकमेव ९९ संगणक आहे. एवढ्या क्षमतेचा संगणक अमेरिका आणि जपान सोडता फक्त भारतात आहे. त्यांनी भारतातील सर्व भाषा संगणकांवर आणून साक्षरच काय पण निरक्षरही संगणक साक्षर व्हावा असा प्रयत्न केला. त्यांनी पुण्यातील सी-डॅकमध्ये (उशपीेश षेी ऊर्शींशश्रेिशिपीं ष अर्वींरपलशव उेािंळपस) प्रगत संगणकीय शिक्षण केंद्र सुरू करून हजारो मुलांना संगणकाचे शिक्षण दिले. तेथील मुले आज जगात भारताचे नाव उज्जवल करत आहेत. इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी ही पदव्युत्तर शिक्षणाची संस्था त्यांनी स्थापन केली. महत्त्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षेततेसाठी त्यांनी स्पेशल प्रोटेक्शन ग्रुपला संगणकीय प्रणाली बनवून दिली.

त्यांनी एसएमएस साठी भारतीय भाषांची प्रणाली विकसित केली. शाळेपर्यंत न पोचणाऱ्या मुलांसाठी 'एज्युकेशन टू होम' (ईटीएच) ही संकल्पना मांडून त्यासाठी १९९८-९९मध्ये ईटीए संशोधन शाळा सुरू केली. त्यामुळे कदाचित भारत हा जगातील सर्वात मोठा संगणक साक्षर देश बनेल. ग्रामीण भागात संगणक शिक्षणाचा प्रसार अधिक होण्यासाठी डिजिटल स्कूल काढून त्याद्वारे वीस लाख लोकांना शिक्षण दिले. त्यांनी घरात येणाऱ्या एकाच वायरमधून आपल्याला फोन-टीव्हीआणि संगणक चालवता येतील अशी ब्रॉडबँड प्रणाली विकसित केली. भटकरांनी महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन, डीव्हीनेट, मल्टिया, डिशनेट या संस्थाही स्थापन केल्या. असे हिमालया एवढे कार्य केलेले महान शास्त्रज्ञ जेव्हा या देशातील तरुणाईचे आदर्श बनतील त्यावेळेस देश महासत्ता झाल्याशिवाय राहणार नाही.

जगभरात भारताचे नाव गाजवणारे डॉ. विजय भटकर यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. डॉ .विजय भटकर यांच्या पुढील जीवनात सुयश मिळो, याकरिता कामठी येथील भ्रष्टाचार विरोधी जनआक्रोश महाराष्ट्र संघटनेने विशेष बैठक घेतली .या बैठकीत सर्वश्री सुरेश अढाऊ गुरूजी .हुसैन अली पत्रकार , मनोहर राव खुरगे , बाल्या बोरीकर , जफर भाई टेलर , मुमताज हैदरी वरिष्ठनेते , वकील तांबे , पुरूषोत्तम सेलोकर . सुबोध चांदोरकर , शंकरजी यादव , शहनशहा आदी उपस्थीत होते.

# बिनाकी मंगळवारी येथे १.३६ लाखांची चोरी



**नागपूर, दि. २३ :** बिनाकी मंगळवारी येथील विठ्ठल रूक्मिनी मंदिराजवळ राहणाऱ्या संगीता जयदेव खडतकर (३८) यांच्याकडे घरफोडी करून अज्ञात चोरांनी १ लाख ३६ हजाराचा ऐवज चोरून नेला. २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ च्या सुमारास आपले घर कुलूपबंद करून संगीता खडतकर या कामावर गेल्या होत्या.

अज्ञात चोरांनी मागील दाराचा कुलूपकोंडा तोडून घरात प्रवेश केला. बेडरूममधील कपाटात ठेवलेले रोख २५ हजार रुपये, सोन्याचे दागिने असा १ लाख ३६ हजाराचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी यशोधरानगर पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

# सोनसाखळी चोरट्यास अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३:

मॉर्निंग वॉक करीत असताना एका इसमाची सोनसाखळी लुटून नेणाऱ्या हर्षल धनराज चौधरी (२१) संजय गांधीनगर, हुडकेश्वर यास अटक केली.

२२ ऑक्टोबर रोजी सकाळी ६.४५ च्या सुमारास ही घटना घडली. घटनेच्या वेळी मुकुंद कृष्णाजी डोमळे (६१) रा. लवकुशनगर हे रिंग रोडने मॉर्निंग वॉक करीत होते. भाग्यलक्ष्मी हॉलसमोरून फिरत असताना दुचाकीवर आलेल्या हर्षलने त्यांच्या गळ्यावर थाप मारून सोनसाखळी हिसकावली. त्यापैकी सोन्याची साखळी तुटून खाली पडली. सोन्याचे लॉकेट हिसकावून हर्षल पळून गेला. याप्रकरणी हुडकेश्वर पोलिस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता. तपासात पोलिसांनी तांत्रिक पद्धतीने तपास करून हर्षल यास ताब्यात घेतले. त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्या ताब्यातून दुचाकी, सोन्याचे लॉकेट, मोबाईल असा १ लाख १४ हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

# बॅग लिफ्टिंग करणारा आरोपी गजाआड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

दिवसाढवळ्या मनीषनगर परिसरात एका महिलेची बॅग हिसकावून पसार झालेल्या आरोपीला गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने अटक केली. चौकशीत त्याने मित्रासोबत मिळून लुटपाट आणि वाहन चोरीसह ३ गुन्हे केल्याची कबुली दिली. हर्ष उर्फ इक्का महेंद्र रामटेके (२४) रा. खैरलांजी रोड, तिरोडा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

### ३ गुन्हे उघडकीस

फिर्यादी अनुश्री अशोक हाडगे (६६) रा. गोंडवाना कॉलनी, मनीषनगर ह्या गत १८ ऑक्टोबरच्या दुपारी मनीषनगर मार्गाने पायदळ जात होत्या. या दरम्यान दुचाकी वाहनस्वार २ आरोपी मागून भरधाव आले आणि त्यांची हॅण्डबॅग हिसकावून पसार झाले.

बॅगमध्ये मोबाईल आणि ८ हजारांची रोकड होती. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा नोंदविला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास युनिट एकचे पथकही करीत होते. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज आणि गोपनिय माहितीच्या आधारावर पोलींनी हर्षला खापरी पुनर्वसन परिसरात राहणाऱ्या त्याच्या नातेवाईकाच्या घरून ताब्यात घेतले.

चौकशीत त्याने मित्रासोबत मिळून गुन्हा केल्याची कबुली दिली.

त्याला अटक करून सखोल चौकशी केली असता त्याने सक्करदरा हद्दितही जबरी चोरी आणि एमआयडीसी हद्दितून वाहन चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी हर्षकडून रोकड, दुचाकी वाहन आणि सोन्याचे दागिने असा एकूण १ लाख ४३ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

त्याच्या फरार साथीदाराचा शोध घेण्यात येत आहे.

पुढील कार्यवाहीसाठी त्याला सक्करदरा पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले आहे.

# अपात्र व्यक्तींद्वारे त्वचा रोगावर उपचार : नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याने

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३:

नागपूरसह राज्यातील विविध भागात नियम धाब्यावर बसवून त्वचारोगाच्या रुग्णांवर उपचार सुरू आहेत. चुकीच्या उपचाराने नागरिकांच्या आरोग्यालाच धोका आहे. त्यामुळे त्वचारोग तज्ज्ञांच्या विदर्भ डर्मेटोलॉजिकल सोसायटीकडून महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेला (एमएमसी) तक्रार देत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. संघटनेकडून याबाबत महत्वाची माहिती एमएमसीकडे देण्यात आली. या प्रकरणाबाबत आपण जाणून घेऊ या.विदर्भ डर्मेटोलॉजिकल सोसायटीने महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे राज्यभरात अपात्र आणि अपंजीकृत व्यक्तींमार्फत त्वचारोग व सौंदर्यविषयक उपचार बाढत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. या संदर्भात सोसायटीच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे प्रशासक डॉ. विंकी रुघवानी यांची नुकतीच भेट घेऊन तक्रार दिली. शिष्टमंडळात सोसायटीच्या अध्यक्षा डॉ. आसरा खुमुशी होते. सोसायटीने सांगितले की, राज्यभरात वैद्यकीय पात्रता नसलेल्या व्यक्तींमार्फत लेझर थेरपी, बोटॉक्स, फिलर्स आणि केमिकल प्रक्रियां सारख्या आक्रामक उपचारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे.

महाराष्ट्रातील विविध भागात या अपात्र व्यक्तींद्वारे सुरू असलेल्या अनधिकृत उपचारांमुळे संबंधित रुग्णांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. सोसायटीने महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेला त्वरित अपात्र व्यक्तींवर कठोर कारवाईसह तपासणी मोहिम राज्यभर राबवण्याची विनंती केली. याप्रसंगी



डॉ. विंकी रुघवानी यांनी शिष्टमंडळाला सांगितले की, या गंभीर प्रकरणाला गांभिर्याने घेऊन दोषींवर कठोर कारवाईसाठी प्रयत्न केले जाईल. परिषदेने नागरिकांना डॉक्टरांची वैद्यकीय नोंदणी तपासता यावी यासाठी आपल्या डॉक्टरांना जाणा ही क्यूआर कोड असलेली मोहिम सुरू केली असल्याचेही सांगितले. त्यातून नागरिकांना डॉक्टरांबाबत अचूक माहिती कळून बोगस डॉक्टरकडे कुमी उपचार घेणार नसल्याचेही सांगितले.

शिष्टमंडळात डॉ. विक्रांत सावजी, डॉ. रिजवान हक, डॉ. अंशुल जैन, डॉ. आशीष पिंपळे, डॉ. धनराज पाटील, डॉ. ईशा अग्रवाल, डॉ. मोहन शेंद्रे, डॉ. नितीन बरडे, डॉ. रियाज अमीर, डॉ. सौरभ जैस्वाल, डॉ. शुभम चोपडा, डॉ. विनोद तितरमारे, डॉ. विशाल चड्ढा, डॉ. शशांक बन्सोड, डॉ. सुमित जग्यासी आणि डॉ. जेरिल बनाईत यांचा समावेश होता.महाराष्ट्र वैद्यकीय परिषद कारवाई करणार काय ?राज्यात अपात्र व्यक्तींद्वारे त्वचाशी संबधित रुग्णांवर नियमबाह्य उपचाराबाबत त्वचारोग तज्ज्ञांकडून महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, राष्ट्रीय वैद्यकीय परिषद, पोलीसांसह इतरही बऱ्याच संस्था व विभागाकडे तक्रारी केल्या गेल्या. त्यानंतरही दोषींवर ठोस कारवाई होत नाही. त्यामुळे या अपात्र व्यक्तींसी कुणा मोठ्या व्यक्तींचे साटं-लोटं आहे काय? हा प्रश्न त्वचारोग तज्ज्ञांच्या संघटनेकडून उपस्थित केला जात आहे.

## संरक्षण व एरोस्पेस उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून

# नागपूरची नवीन ओळख




### सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस प्रकल्पास मिहान येथे २२३ एकर भूखंडाचे वितरण

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :** मिहान आर्थिक क्षेत्रात सोलर डिफेंस अँड एरोस्पेस ही भारतातील अग्रगण्य उत्पादक कंपनी 233 एकर क्षेत्रात अत्याधुनिक संरक्षण व एरोस्पेस उत्पादनात प्रकल्प उभारणार आहे. या प्रकल्पासाठी मिहानतर्फे 233 एकर भूखंडाचे वाटप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

रामगिरी येथे आयोजित कार्यक्रमात मिहान संघ प्रकल्पातील आजपर्यंतच्या सर्वात मोठ्या भुखंडाचे वितरण मुख्यमंत्री यांच्या हस्ते कंपनीचे अध्यक्ष श्री. सत्यनारायण नुवाल यांना करण्यात आले. याप्रसंगी संरक्षण उत्पादन कंपनीचे मनीष नुवाल, राघव नुवाल, जे.एफ साळवे तसेच महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे व्यवस्थापकीय संपादक तथा जिल्हाधिकारी डॉ. विपीन ईटनकर, गौरव उपश्याम, संजय इंगळे आधी उपस्थित होते.

सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनी राज्यात 12 हजार 80 कोटींची गुंतवणूक करुन अत्याधुनिक संरक्षण व एरोस्पेस उत्पादन प्रकल्प उभारणार आहे. या प्रकल्पामुळे 6 हजार 800 प्रत्येक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. तसेच मिहान आर्थिक क्षेत्रात 680 कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक करुन विमान व संरक्षण उपकरण निर्मिती केंद्र स्थापन करणार आहे. या प्रकल्पामुळे 875 प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

प्रमुख संरक्षण एरोस्पेस उत्पादन केंद्र सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस प्रकल्प विकासासाठी देशातील प्रमुख संरक्षण व एरोस्पेस उत्पादन केंद्र म्हणून विकासासाठी मोठी मदत होणार आहे. हा उपक्रम महाराष्ट्राच्या मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत आणि औद्योगिक प्रगतीच्या विकासासाठी अधिक बळकटी देणारा ठरणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

मिहान सेझ प्रकल्पातील सर्वात मोठे भूखंड असून महाराष्ट्राच्या प्रगत, गुंतवणूकदार-अनुकूल धोरणांचा व अग्रगण्य उद्योगांचा वाढता विश्वास यावरून अधोरेखित होत असल्याचे यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

या प्रकरणामुळे संरक्षण उत्पादन उद्योग क्षेत्रात नागपूरला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळणार असून यामुळे विदर्भाच्या औद्योगिक प्रगतीत मोठी भर पडणार आहे.

शासन व महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे फलित असून, उच्च-मूल्य गुंतवणूक आकर्षित करणे, प्रादेशिक रोजगारनिर्मिती वाढवणे आणि संरक्षण व उत्पादन क्षेत्रात राज्याचे नेतृत्व अधिक दृढ करणे हा त्यामागील हेतू असल्याचे यावेळी एमएडीसीचे सह व्यवस्थापकीय संचालक डॉ. विपीन ईटनकर यांनी सांगितले.

## दिवाळी व छठपूजा उत्सवानिमित्त नागपूर विभागात

# तिकिटिंग व गर्दी व्यवस्थापनासाठी व्यापक उपाययोजना

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :** दिवाळी व छठपूजा उत्सवाच्या काळात प्रवाशांच्या संख्येत अपेक्षित वाढ लक्षात घेता, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने नागपूर रेल्वे स्थानकावर सुरळीत तिकिटिंग व्यवस्था व गर्दी व्यवस्थापनासाठी व्यापक उपाययोजना केल्या आहेत.

प्रवाशांच्या सोयीसाठी एकूण 6 ऑटोमॅटिक तिकीट व्हेंडिंग मशीन (अळस्टर)- पश्चिमेकडे 3 व पूर्वेकडे 3- कार्यान्वित करण्यात आल्या आहेत, ज्याद्वारे प्रवासी अनारक्षित तिकीट सहज व लवकर घेऊ शकतात. याशिवाय, 6 मोबाइल अनारक्षित तिकीटिंग सिस्टम काउंटर- पश्चिमेकडे 4 व पूर्वेकडे 2- सुरू करण्यात आले आहेत, ज्यामुळे प्रवाशांना डिजिटल तिकीटिंगचा जलद व पेपरलेस अनुभव मिळेल.

जे प्रवासी मॅन्युअल तिकिट पसंत करतात, त्यांच्यासाठी 9 अनारक्षित तिकीटिंग सिस्टम काउंटर- पश्चिमेकडे 5 व पूर्वेकडे 3- कार्यरत ठेवण्यात आले आहेत. तसेच 1 अतिरिक्त काउंटर ठेवण्यात आला आहे जो तात्काळ वेळेत तात्काळ काउंटर म्हणून व त्यानंतर नियमित वळर काउंटर म्हणून कार्य करतो, ज्यामुळे सणासुदीच्या काळात प्रवासी गर्दीचे प्रभावी व्यवस्थापन होऊ शकेल.

आरक्षण व रद्दीकरण सेवांसाठी एकूण 7 प्रवासी आरक्षण प्रणाली काउंटर- पश्चिमेकडे 5 व पूर्वेकडे 2- सुरु आहेत. प्रवाशांना मदत करण्यासाठी, रांगेत शिस्त राखण्यासाठी व तिकिटिंग प्रक्रियेला गती देण्यासाठी पुरेसे कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. स्थानकावर योग्य सूचना फलक, प्रवासी माहिती प्रणाली आणि गर्दी नियंत्रणाची प्रभावी उपाययोजना केली गेली आहे.

मध्य रेल्वे प्रवाशांना आवाहन करते की त्यांनी अळस्टर आणि वळर मोबाइल ॲप सारख्या डिजिटल तिकीटिंग सुविधांचा अधिकाधिक वापर करावा, ज्यामुळे वेळेची बचत होईल आणि रांगेत उभे राहण्याची आवश्यकता टळेल. सर्व उपाययोजना प्रवाशांना सुरक्षित, आरामदायक आणि सुरळीत प्रवास अनुभव देण्यासाठी करण्यात आल्याचे रेल्वेकडून सांगण्यात आले आहे.











महासागर Diwali special 2025 महासागर













